शनिवार । १४ मे १९७७

७५ पैसे

माणूस

# हमीद दलवाई

हिंदू–मुस्लिम ऐक्याच्या जुनाट वटवृक्षाला नवी पालवी फुटण्याच्या ऐन वसंतागमाच्या वेळीच हमीद दलवाई यांच्यासारख्या समाजसुधारकावर मृत्यूने झडप घालावी, ही एक परम दुःखदायक घटना आहे. मुस्लिम सत्यशोधक समाज स्थापना केल्यापासून अल्पावधीतच मुस्लिम समाजात नवविचारांचे त्यांनी जे वादळ उत्पन्न केले, त्यामुळे त्यांच्या भावी कर्तृत्वाविषयी सर्वांच्या मनात फार मोठ्या अपेक्षा निर्माण झालेल्या होत्या. जरी त्यांचे सहकारी व अनुयायी त्यांनी सुरू केलेले कार्य पुढे चालू ठेवणार असले तरी, व्यक्तीचा प्रभाव म्हणून काही असतोच. हमीदभाईंमुळे कार्याला वेगळाच उठाव येत राहिला असता आणि नवीननवीन विचारांची भरही त्यात पडत राहिली असती. आक्रमक लिखाण, धारदार वक्तृत्व, अभ्यास आणि मोठा मित्रपरिवार हे हमीदभाईंचे बळ होते. हे सर्व बळ एकाग्रतेने त्यांनी मुस्लिम समाज सुधारणेकडे लावले आणि पाहता पाहता एक चळवळ उभी राहिली. सुरुवातीला त्यांच्या भाषणातून आणि लिखाणातून मुस्लिमांच्या अलिप्त वृत्तीवर, पाकिस्तानधार्जिणेपणावर प्रखर टीका येत राहिल्याने शहरी हिंदू समाजात ते चटकन लोकप्रिय झाले. याचीच प्रतिक्रिया म्हणून मुस्लिम समाज मात्र त्यांच्यापासून दूर राहिला, त्यांना शत्रुस्थानीही मानू लागला. हा परिणाम हमीदभाईंना जाणवला असावा म्हणून पुढे पुढे त्यांनी मुस्लिम राजकारणाऐवजी मुस्लिम समाजकारणाकडे आपला मोर्चा वळवला व 'तलाक'सारखे या समाजाला ग्रासणारे एकेक सामाजिक प्रश्न हाती घेतले. केवळ परिषदा घेऊन लोकजागृती करण्यावर त्यांनी समाधान मानले नाही. तलाकपीडित महिलांच्या पुनर्वसन कार्याकडेही त्यांनी तितक्याच नेटाने लक्ष पुरवले. या कार्यामुळे मुस्लिम समाज, त्यातल्या त्यात त्यातील नवविचारांचे तरुण व काही प्रागतिक लोक त्यांच्याभोवती गोळा होऊ लागले होते. जुना दुरावा कमी झाला होता. आगरकर–सावरकरांच्या उदाहरणांमुळे आपले उगाचच असे एक मत बनले आहे की, समाजसुधारक म्हटला की, समाजाशी त्याचे नेहमी बिनसलेले असलेच पाहिजे, समाजाने नेहमी त्याला वाळीत टाकलेच पाहिजे. आणि त्या सुधारकानेही हातात नेहमी चाबूक घेऊन समाजाला फटकारीत राहिलेच पाहिजे. पण हे तितकेसे खरे नाही. आगरकर–सावरकर यांनी हिंदुधर्मातील दुष्ट रूढींवर जेवढे हल्ले चढवले त्यापेक्षा शतपटीचे कठोर हल्ले आगरकरांच्याच काळात, विवेकानंद प्रभृतींनीही चढवलेले आपल्याला दिसतील. आगरकर–सावरकरादिकांचे हल्ले तितक्याच जोमाने परतवले गेले. विवेकानंदादिकांची परंपरा आजही जीवंत आहे. कार्य सातत्याने चालू आहे. हमीदभाई स्वतः निरीश्वरवादी असले तरी अनेकदा म्हणत असत की, मुस्लिम समाजात एखादा गांधी निर्माण व्हायला हवा; यातील मर्म तरी दुसरे काय होते ? समाजाची आत्मश्रद्धा कायम ठेवून, आत्मतंतू तुटू न देता नव्या सुधारणा घडवून आणणे, तार्किक हल्ले चढवण्यापेक्षा कितीतरी अवघड आणि कौशल्याचे काम आहे. हमीदभाईंचा निरीश्वरवाद मुस्लिम समाजात मान्यता पावण्याची सुतराम् शक्यता नव्हती. त्यामुळे गांधी–विवेकानंदांचा समाजाची खोल धर्मश्रद्धेला उजळा देऊन नवे कार्य साधण्याचा पर्याय त्यांना वर्जच होता. उरले दोन पर्याय. मुस्लिम समाजावर हल्ले चढवून हिंदू समाजातच केवळ लोकप्रिय होऊन राहणे किंवा मुस्लिम समाजातील दुष्ट चालीरीती, रूढी घालवण्याचा विधायक मार्गाने प्रयत्न करणे. पहिला पर्याय त्यांनी लवकर बाद ठरवला हे त्यांचे मोठेपण होते. दुसऱ्या पर्यायावर हळूहळू ते स्थिरावत होते.

या पर्यायामुळे मुस्लिम समाजात त्यांना हक्काचे, आपुलकीचे स्थान प्राप्त झाले असते आणि कार्यविस्तारही हळूहळू वाढत राहिला असता. यासाठी खूप संयम आणि मर्यादांचे भान बाळगायची अवघड मानसिक तयारीही त्यांनी केल्यासारखी दिसत होती. एरवी गेल्या दोन तीन वर्षात त्यांनी धारण केलेल्या राजकीय अलिप्ततेचा उलगडा होऊ शकत नाही. एक व्यक्ती, ती कितीही मोठी आणि कर्तबगार असली तरी, सगळ्या आघाड्यांवर लढू शकत नाही. आणि तिने लढायचे ठरवले तर कार्याची हानी होते. ही हानी टाळण्यासाठी हमीदभाईंनी आपल्या मूळच्या राजकीय बंडखोर प्रवृत्तीला खूपच आवर घातल्याचे शेवटीशेवटी त्यांच्याशी बोलताना जाणवत होते. त्यांच्या प्रथमश्रेणीच्या सर्व बौद्धिक आणि मानसिक शक्ती त्यामुळे मुस्लिम समाजसुधारणेच्या एकाच कार्यासाठी उपलब्ध झाल्या होत्या. पण दुर्दैव. ज्यावेळी या सर्व शक्तींची अत्यंत आवश्यकता होती त्यावेळी काळाने जणू सूडच उगवला. नवे वारे सर्वत्र वाहू लागले असतानाच त्याने हा एक सुगंध त्यातून काढून घेतला.

पण या काळावरही माणसाला सूड उगवता येईल.

हा 'बटमोगरी' सुगंध ज्यासाठी वाहिला ते कार्य पुढे चालू ठेवून ! वाढवून !

श्री. ग. मा.

# यशवंतराव चव्हाण सत्तेचे राजकारण खेळत आहेत

स. न. वि. वि.

३० एप्रिल ७७ च्या साप्ताहिक माणूसमधील 'राज्य कोणाचे ?' हा 'माहितगार' यांचा लेख वाचल्यानंतर जे विचार मनात आले ते पत्ररूपाने 'माणूस'कडे प्रसिद्धीसाठी पाठवीत आहे.

गलिच्छ राजकारण खेळून महाराष्ट्रात शंकररावांचा बळी घेतला गेला आहे, आणि या गचाळ राजकारणाला यशवंतरावांनी खतपाणी घातले आहे. दोन वसंत आणि एक 'यशवंत' यांनी एकत्र येऊन चाळीसजणांचे 'मंत्रिमंडळ' बनविले आहे. परंतु यातून उद्ध्वस्त होत असलेली कॉंग्रेस पक्षाची धर्मशाळा किती प्रमाणात सावरता येईल, हे आगामी विधानसभेच्या पोटनिवडणुका दाखवून देतील. लोकसभेच्या ४८ पैकी २८ जागा गेल्या म्हणून शंकररावांचा राजीनामा मागणारे विधानसभेच्या १६ पैकी १० जागा गेल्या तर राजीनामा देतील काय ? शंकररावांचा अमानुष पद्धतीने बळी घेणे जितके सोपे आहे, तितके जनता लाट थोपविणे सोपे नाही, हे यशवंतरावांना भविष्यकाळ समजावून देईल.

आणीबाणीमुळे कॉंग्रेसचा पराभव झाला, असे यशवंतराव म्हणतात. मग ही आणीबाणी शंकररावांनी आणली काय ? आणीबाणीला यशवंतराव इंदिराजींइतकेच जबाबदार आहेत. कारण ते इंदिराजींच्या केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री होते. खरे तर देशात सर्वत्र कॉंग्रेसचा पराभव झाला आहे. उत्तर भारतात कॉंग्रेसने प्रचंड मार खाल्ला. अशा वेळी महाराष्ट्रात याचा फटका कमीअधिक प्रमाणात बसणे साहजिक आहे. खरे तर, संपूर्ण महाराष्ट्र शंकररावांच्या पाठीशी उभा करण्यात यशवंतरावांचे नेतेपद शोभून दिसले असते. शंकररावांचे मुख्यमंत्रिपद जाण्याने यशवंतरावांचाच पराभव झाला आहे. यशवंतरावांचा शंकररावांना पाठिंबा कधीच नव्हता. तसे असते तर, शंकरराव १९७२ लाच मुख्यमंत्री झाले असते.

लोकसभेच्या निवडणुका ऐतिहासिक होत्या. जनतेला लोकशाही पाहिजे होती भाकरी आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी पाहिजे होत्या. आणीबाणीत या देशातली लोकशाही संपुष्टात आली होती. आणीबाणीच्या काळात राज्यघटनेचा बोऱ्या वाजविला गेला. नसबंदीने जनावरांपेक्षाही वाईट वागणूक माणसांना मिळाली. यामुळे लोकांत तीव्र असंतोष होता. देशात सर्वत्र जनता लाट होती. अशा वेळी शंकररावांऐवजी कोणीही मुख्यमंत्री असते तरी, हेच घडले असते. यशवंतराव मुख्यमंत्री असते तरी, हेच घडले असते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात कॉंग्रेसचा पराभव झाला त्या वेळी यशवंतरावांनी राजीनामा दिला काय ?

नांदेड येथील जाहीर सभेत भाषण करताना यशवंतराव म्हणाले, 'उमेदवार अ आला काय किंवा ब आला काय, याच्याशी मला कर्तव्य नाही, याचा अर्थ काय ? याच सभेत यशवंतरावांनी जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीची चेष्टा केली. आता तरी यशवंतरावांना संपूर्ण क्रांतीचा अर्थ समजायला हरकत नाही. कॉंग्रेसचा पराभव म्हणजे जनतेचा पराभव हे यशवंतरावांचे म्हणणे खोटे ठरले आहे. कारण जनतेचा विजय झाला आहे आणि कॉंग्रेसचा पराभव झाला आहे.

यशवंतराव सत्तेचे राजकारण खेळत आहेत. यशवंतरावांनी शंकररावांवर अन्याय केला. लोक हे विसरू शकत नाहीत.

३।५।७७ राजा मुधोळकर, नांदेड


## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक पन्नासावा

१४ मे १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

# ‘ कुंडली ’ मुद्दाम चुकीची का मांडली गेली ?

## शे. का. प. आणि फुटीर काँग्रेसचे नवे ‘ जनता ’विरोधी राजकारण

माहितगार

१९६९ साली काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर या फुटीचे परिणाम इतर पक्षांवरही झाले. कोणताही पक्ष काँग्रेसच्या दुफळीनंतर संकटातून वाचला नव्हता. एखादा लहान पक्ष त्याच्या ध्येयधोरणांनुसार काम करत असतो तेव्हा त्याचे परिणाम दुसऱ्या पक्षांवर होत नसतात. पण अखिल भारतीय स्वरूपाचा पक्ष फुटतो किंवा एखादा नवा पक्ष निर्माण होतो तेव्हा, अनेक घटना घडत असतात. त्याचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पडसाद प्रत्येक पक्षात उमटतात. काँग्रेस फुटीचे परिणाम इतर पक्षांवर झाले तसेच परिणाम जनता पक्षाच्या रूपाने काँग्रेस पक्षावर होत आहेत. आणीबाणीमुळे चार विरोधी पक्षांचा एक पक्ष बनवण्याची प्रक्रिया अधिक गतीने आणि खळखळ न होता सुरू झाली. लोकसभेच्या निवडणुकीची घोषणा अचानक केली तर, विरोधी पक्षांना एक होण्याची संधी मिळणार नाही, प्रचारासाठी त्यांना अवसर मिळणार नाही, आणि मग आधीच खिळखिळ्या असलेल्या विरोधी पक्षाला कायमचे–किमान पुढच्या १०–१५ वर्षांकरता तरी–निकामी करून टाकावयाचे ! तसे झाले की, एकपक्षीय व त्यांतल्या त्यांतही आपल्याच हातात पक्षसूत्रे ठेवून एका व्यक्तीची राजवट प्रस्थापित करावयाची हा हेतू श्रीमती इंदिरा गांधी यांनी उराशी बाळगला होता. भारताचा गेल्या शेकडो वर्षांचा इतिहास पाहता हा देश कोणत्या ना कोणत्या एका व्यक्तीच्या हुकमतीखाली राहिलेला आहे. सत्ताधीश व्यक्तीचे स्तोम माजल्याचे आणि जनता ते स्तोम माजवत आल्याचेच दिसून येईल. भारतीय जनतेची ही मनोभूमिका इंदिरा गांधी यांनी ओळखून सर्व सत्ता आपल्या व आपल्यानंतर आपल्या मुलाच्या हातात एकवटावी अशी व्यवस्था करण्यास प्रारंभ केला होता. शंभर वर्षांच्या इतिहासाचा अभिमान बाळगणाऱ्या काँग्रेसनेत्यांना या गोष्टीला वेळीच प्रतिकार करावा असे वाटले नाही किंवा त्यांची तशी हिंमत झाली नाही. परंतु इतिहासाला कलाटणी देणाऱ्या घटना घडतात, म्हणूनच नवा इतिहास घडतो. लोकसभेच्या निवडणुका घ्यावयाच्या व लोकशाही मार्गाच्या आधाराने आपली एकछत्री राजवट प्रस्थापित करावयाची हा मनसुबा जनता पक्षाच्या निर्मितीने उधळला गेला. जनता पक्षाच्या निर्मितीचे चर्वितचर्वण करावे हा या लेखाचा उद्देश नाही किंवा जनता पक्षाचे समर्थन करणे हाही हेतू नाही. जनता पक्षाची निर्मिती होण्याची प्रक्रिया सुरू झाली. या पक्षाने लोकसभेत बहुमत मिळवले व नंतर १ मे १९७७ रोजी जनता पक्षाची रीतसर स्थापना झाली. या घडामोडींकडे काँग्रेस पक्षाचे नेते कोणत्या दृष्टीने पाहात आहेत, त्याचे मूल्यमापन कोणत्या हेतूने करत आहेत, जनता पक्षाच्या निर्मितीचे महाराष्ट्रात काय परिणाम होतील हे पाहणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे व लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी जनता पक्षाची कुंडली मांडली आहे. ती वस्तुस्थितीला धरून नाही. कुडमुड्या जोशीबुवांनी ज्योतीष सांगावे तसे यशवंतरावांनी मांडलेल्या कुंडलीचे स्वरूप आहे. आपण मांडलेली कुंडली वस्तुस्थिती लपवून मांडलेली आहे याची जाण यशवंतरावांनाही आहे. कुंडली मांडणे, जनता पक्षाच्या निर्मितीमुळे बदलणाऱ्या परिस्थितीचा आढावा घेणे हा हेतू यशवंतरावांचा नसल्यामुळे त्यांचे मूल्यमापन प्रामाणिकपणाचे झाले नाही. राजकीय डावपेचांचा भाग म्हणूनच त्यांनी मूल्यमापन केले आहे. जनता पक्षाचे सरकार केंद्रात आले आहे. देशात जनता पक्षाची लाट आहे. ही लाट कायम टिकणारी नाही हे खरे; पण आलेली लाट अनेक धक्के देऊन जाणार आहे. या धक्क्यांपासून महाराष्ट्र काँग्रेसला वाचवावे या प्रधान हेतूने यशवंतरावांनी जनता पक्षाचे धोपट मार्गाने मूल्यमापन केले आहे. त्यांच्या मूल्यमापनात अप्रत्यक्षपणे जातीय भावनांचा अंगार फुलवण्याचा हेतुतः प्रयत्न आहे. यशवंतरावांनी त्याचा आधार घ्यावा याचे दुःख होते !

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रात आपले नेतृत्व पुनः एकदा प्रस्थापित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्रिपदावरून काढून टाकले. या घटनेने महाराष्ट्राच्या काँग्रेसमधील तणाव केवळ कायम राहिले असे नव्हे तर, ते वाढले आहेत. महाराष्ट्र काँग्रेसमधील एक मोठा गट नाराज आहे, असंतुष्ट आहे. या गटाची भूमिका काय राहते, हा गट पक्षात राहणार की, काँग्रेसमधून बाहेर पडणार याविषयीचे चित्र तेवढे स्पष्ट झालेले नाही; पण हालचाली मात्र मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. आधीच जनता पक्षाची लाट पसरली आहे. त्या लाटेमुळे आणि काँग्रेसमधील एक गट पक्षातून बाहेर पडला त्यामुळे तर, महाराष्ट्र काँग्रेसच्या अस्तित्वाला जबरदस्त तडाखा बसणार आहे. असा तडाखा बसलेला पक्ष विधानसभेच्या आगामी निवडणुकीत बहुमत कायम राखील का ? राज्यात काँग्रेसला बहुमत मिळाले तरी ते आजच्याइतके हुकमी, राक्षसी असेल का ? जर हुकमी बहुमत न मिळता मार्जिनल– काठावरचे– बहुमत मिळाले तर, काँग्रेसची राजवट महाराष्ट्रात सह्याद्रीच्या पहाडाप्रमाणे अभेद्य राहील का ? या

साऱ्या प्रश्नांनी यशवंतराव चव्हाण यांना ग्रासले आहे. या प्रश्नांच्या उत्तरापासून महाराष्ट्राच्या कॉंग्रेसला वाचवण्याच्या हेतूमधून यशवंतरावांनी जनता पक्षाची कुंडली मांडली आहे आणि म्हणून ती प्रामाणिकपणाची नाही. त्यामध्ये प्रामाणिक मूल्यमापन नाही. जनता पक्षाचे धोरण पुरोगामी नाही, कल्याणकारी नाही, समाजवादाकडे वाटचाल करणारे नाही असे यशवंतराव म्हणत नाहीत. 'जनता पक्ष म्हणजे जनसंघच आहे' असे यशवंतराव म्हणतात. जनसंघाच्या ध्येयधोरणाला यशवंतरावांइतकाच, किंबहुना त्यांच्यापेक्षा थोडा अधिकच माझा विरोध आहे, त्यामुळे जनसंघाच्या धोरणाचे अथवा जनसंघाचे माझ्याकडून समर्थन होणार नाही याची कल्पना माझ्या मित्रांना तरी येईल !

जनता पक्षात संघटना कॉंग्रेस, भालोद, समाजवादी, जनसंघ व लोकशाही कॉंग्रेस असे पाच पक्ष असताना यशवंतराव जनता पक्षाच्या धोरणावर न बोलता जनता पक्ष म्हणजे जनसंघच आहे असे का म्हणतात ? संघटना कॉंग्रेस, भालोद व जगजीवनराम यांच्या लोकशाही कॉंग्रेसमधील पूर्वीचे कॉंग्रेसजन व समाजवादी यांचाच जनता-पक्षात भरणा आहे. समाजवादी पक्षाने समाजवादी कार्यक्रमासाठी नेहरूंजवळ आग्रह धरला होता. समाजवाद्यांच्या निष्ठांविषयी यशवंतराव खाजगीत बोलताना चांगलेच उद्‌गार काढतात. जनता पक्षातील पाच पक्षांपैकी या चार पक्षांबाबत यशवंतराव काही बोलत नाहीत. चार पक्षांचा प्रभाव जनता पक्षावर पडणार आहे असे माझ्याजवळच यशवंतराव म्हणाले होते. पण जाहीर वक्तृत्व करताना मात्र ते जनसंघाचा प्रभाव जनता पक्षावर राहणार, जनता पक्ष म्हणजेच जनसंघ असे म्हणतात. यात यशवंतरावांचा आपमतलबीपणा नाही तर, दुसरे काय म्हणायचे ?

कॉंग्रेसजनांना सत्तेशिवाय राहता येत नाही. पाण्याबाहेर काढलेली मासळी व सत्तेबाहेर राहिलेले कॉंग्रेसजन यांची तडफड सारखीच म्हणावी लागेल ! त्यामुळेच सत्तेच्या प्रवाहात राहण्याची बहुसंख्य कॉंग्रेसजनांची धडपड असते. जनता पक्षाची लाट निर्माण होताच कॉंग्रेसजन हळूहळू कॉंग्रेसमधून बाहेर पडू लागेल आहेत. ते प्रमाण येत्या काही दिवसात वाढीला लागेल. देशाच्या पातळीवर कॉंग्रेस-त्यागाचे प्रमाण वाढीला लागले की, तो वणवा महाराष्ट्रातसुद्धा सुरू होईल. केंद्राच्या व देशाच्या राजकीय नाड्या उत्तरेकडील ज्या राज्यांच्या हातात आहेत त्या राज्यांत जनता सरकार आले की, कॉंग्रेसची पडझड सुरू होईल. उत्तरेकडील राज्यांचा निवडणुकांनंतर १९७८ मध्ये महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होणार आहेत. साहजिकच उत्तरेच्या नऊ राज्यांतील निवडणुकांनंतरचा काळ महाराष्ट्र कॉंग्रेसच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. महाराष्ट्रात कॉंग्रेसला पडझडीपासून वाचवावयाचे असेल तर, आतापासूनच बुरुज बांधून ठेवले पाहिजेत, त्यांची डागडुजी केली पाहिजे, हे ओळखून यशवंतराव जनता पक्षाचे मूल्यमापन करत आहेत.

ब्राह्मणांचे वर्चस्व असलेला, नव्हे ब्राह्मणांचाच जनसंघ होता. चातुर्वर्ण्याचा हिरिरीने पुरस्कार करणारे ब्राह्मण कार्यकर्ते, अनुयायी जनसंघात होते. हिंदुत्वाचा अभिमान बाळगणारे नेते जनसंघात होते. महाराष्ट्रात बहुजनसमाज संख्येने अधिक आहे. जो समाज बहुसंख्य आहे त्याच्या हातात सत्ता गेली तर, अल्पसंख्य समाजाने ओरडण्याचे कारण नाही ( मराठा समाज बहुसंख्य आहे म्हणून त्या समाजाच्या नेत्याला मुख्यमंत्री करता कामा नये अशी भूमिका कॉंग्रेसनेत्यांनी घेतली होती तेव्हा 'माहितगारा'नेच माणूसच्या स्तंभांतून त्या भूमिकेला विरोध केला होता. ) बहुजनसमाज आज कॉंग्रेसच्या मागे उभा आहे. हा समाज ज्या पक्षाच्या बाजूला उभा राहील तो पक्ष महाराष्ट्रात प्रबळ होणार आहे. जनता पक्षाची लाट निर्माण झाली असून कॉंग्रेसजन सत्तेशिवाय राहू शकत नाहीत. त्यामुळे कॉंग्रेस कार्यकर्ते सत्तेसाठी व सामान्य जनता जनता लाटेमुळे जनता पक्षात मोठ्या प्रमाणावर जाण्याची शक्यता आहे. पक्ष बदलाची साथ थोपवण्याची खबरदारी यशवंतराव घेऊ लागले आहेत. बहुजनसमाजाशी ब्राह्मणवर्ग ज्या पद्धतीने वागत आला होता त्यामुळे बहुजन समाजाला ब्राह्मणांविषयी राग आहे आणि तो स्वाभाविक आहे. बहुजन समाजाला जनता पक्षापासून बाजूला ठेवायचे असेल तर, जनता पक्ष म्हणजे जनसंघच हीच मात्रा लागू पडेल असे यशवंतरावांना वाटत आहे, म्हणून ते त्यावर भर देत आहेत. यशवंतरावांनी मांडलेल्या कुंडलीला यापेक्षा दुसरा कोणताही अर्थ नाही. कॉंग्रेस कार्यकर्ते जनता पक्षात जाऊ नयेत असे वातावरण निर्माण करावयाचे असेल तर, जनता पक्षाला जनसंघच म्हणावयाचे हे यशवंतरावांनी ठरवले असले तरी, महाराष्ट्रातील इतर कॉंग्रेसनेत्यांनी यशवंतरावांचा सूर लावलेला नाही. हेही ध्यानात घ्यायला हवे.

**यशवंतरावांच्या प्रचाराचा परिणाम होऊन कॉंग्रेसजन जनता पक्षात गेले नाहीत, तरी कॉंग्रेसपुढचा धोका टळलेला नाही. कॉंग्रेसच्या काही माजी मंत्र्यांसह बरेच कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात जाण्याचा विचार करत असून लौकरच ही मंडळी शे. का. पक्षात सामील झालेली दिसतील. काही थोडे जनता पक्षातही जाण्याची शक्यता आहे.**

माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण कॉंग्रेसमध्ये राहणार नाहीत हे नक्की. आता ब्रह्मानंद रेड्डी कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले असल्यामुळे कॉंग्रेसमधून बाहेर पडण्याचा शंकररावांचा निर्णय थोडा लांबेल एवढेच ! पण सध्याच्या घडामोडींनुसार शंकरराव कॉंग्रेसमध्ये राहात नाहीत ! त्यांचे सहकारी मित्र बाळासाहेब सावंतसुद्धा शेतकरी कामगार पक्षात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शे. का.

पक्षाची स्थापना होण्यापूर्वी झालेल्या बैठकीला बाळासाहेब सावंत हजर होते, इतकेच नव्हे तर शेतकरी कामगार संघ असे नाव काँग्रेसांतर्गत पक्षाला द्यावे अशी सूचना सावंत यांनीच त्यावेळी केली होती. यशवंतराव चव्हाण यांच्या विरोधात असलेला काँग्रेसचा गट प्रामुख्याने शे. का. पक्षात जाईल. काँग्रेसचे सरकार पुढील निवडणुका येईपर्यंत स्थिर राहील का, असा प्रश्न काँग्रेस आमदारच विचारू लागले आहेत ! महाराष्ट्र काँग्रेसमध्ये सध्या अनिश्चिततेचे वातावरण आहे. शे. का. पक्षात काँग्रेसजन गेले तर, महाराष्ट्रात जनता-शे. का. यांचे संयुक्त सरकार होईल का ? असा प्रश्न पडावा एवढ्या मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते, आमदार काँग्रेसपक्ष सोडणार असल्याचे बोलले जात आहे. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याविषयीचे धोरणही वेगळे दिसत आहे. ५ मे रोजी पंतप्रधान देसाई मुंबईत आले तेव्हा युवक काँग्रेसने मोरारजी देसाई यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचे ठरवले होते. पण दादांनी युवक काँग्रेसला निदर्शनाच्या विचारापासून परावृत्त केले.

मोरारजींविरुद्ध होणारी युवक काँग्रेसची निदर्शने टाळण्याचा दादांनी प्रयत्न केला, परंतु महाराष्ट्रात जनता पक्षाविरुद्ध एक कट शिजू लागला होता आणि तो लोकशाही काँग्रेसमार्फत केला जाणार होता. त्याची वाच्यता होऊ लागताच जगजीवनराम यांनी अ. भा. राजकारणात आपल्याला अडचण होऊ नये यासाठी १ मे रोजी दिल्लीत तडकाफडकी लोकशाही काँग्रेस जनता पक्षात सामील होत असल्याची घोषणा केली. लोकशाही काँग्रेस पक्षाने जनता पक्षात सामील होण्याचा निर्णय अचानक घेतला आहे. त्याला महाराष्ट्रातील घटना कारणीभूत आहे.

लोकशाही काँग्रेस पक्षात महाराष्ट्रातील काँग्रेसजनांनी सामील व्हावयाचे. नंतर शे. का. पक्ष, आणि उजव्या कम्युनिस्ट पक्षातील काहीजण अशांचा मिळून एक डावा पक्ष तयार करावयाचा आणि जनता पक्षाला महाराष्ट्रात स्थान मिळू द्यावयाचे नाही असे काँग्रेसनेत्यांनी ठरवले होते. या कामी प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. बाळासाहेब सावंत हे पुढाकार घेत असून त्यांच्या या प्रयत्नाला यश आले नाही तर, मी वर म्हटल्याप्रमाणे ते शेतकरी कामगार पक्षात सामील होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रांत जनता पक्षाविरुद्ध लोकशाही काँग्रेस पक्षाने असे वर्तन केले असते तर, त्याचे पडसाद वरपर्यंत पोचले असते व त्यातून राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली असती. ते टाळण्यासाठी जगजीवनराम यांनी एच. एन. बहुगुणा यांच्याशीही फारशी चर्चा न करता जनता पक्षात विलीन होण्याचा निर्णय तडकाफडकी जाहीर केला. महाराष्ट्रातील काँग्रेसनेत्यांनी जो डाव खेळण्याचे ठरवले होते तो डाव जगजीवनराम यांनी उधळून लावला आहे. महाराष्ट्रात लोकशाही काँग्रेसमध्ये आलेले काँग्रेसजन शे. का. पक्ष व काही उजवे कम्युनिस्ट मिळून एक पक्ष बनवण्याचा प्रयत्न होता. म्हणूनच शे. का. पक्षाने आपण जनता पक्षात विलीन होणार नाही असा निर्णय घेतला. महाराष्ट्रात हे राजकारण यशस्वी झाले असते तर, इतर राज्यांत तो प्रयोग केला जाणार होता. पण जगजीवनराम यांचा काँग्रेसच्या नेत्यांविरुद्ध, विशेषतः यशवंतराव चव्हाण यांच्याविरुद्ध राग आहे. त्यामुळेच जगजीवनराम यांनी हा प्रयोग यशस्वी होऊ द्यावयाचा नाही असे ठरवले. लोकशाही काँग्रेस आता राहिलेली नाही. त्यामुळेच काँग्रेसजन शे. का. पक्षात जाण्याचे पसंत करतील.

या घडामोडी विचारात घेता महाराष्ट्रातील राजकारण स्थिर राहील असे दिसत नाही. जनता-शे. का. पक्ष समझोता राहणार, की शे. का. व फुटीर काँग्रेसजन यांचा समझौता होऊन महाराष्ट्रापुरते तरी जनता पक्षाचे राजकारण होऊ द्यावयाचे नाही या डावात काँग्रेसला यश येणार ?

शे. का. पक्षातही दोन गट आहेत. त्यांपैकी कृष्णराव धुळप, दि. बा. पाटील यांना जनता पक्षाबरोबर सहकार्य कायम ठेवावे असे वाटते, तर, बापूसाहेब लाड, उद्धवराव पाटील, केशवराव धोंडगे आदींना जनता पक्षापासून काही हात दूर राहावे असे वाटते. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाची दिशा मात्र म्हणावी तेवढी स्पष्ट होत नाही.

□

---

## वर्गणीदारांस सूचना

१ : अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२ : वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३ : तीन वर्षांची वर्गणी रु. १००/- आहे.

४ : रु. ३००/-ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

---

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## तप्त दिल्लीचे प्रखर दर्शन

दिल्लीहून येणाऱ्या राजकीय वार्तांनी साऱ्या देशाला गेल्या सप्ताहामध्ये खमंग खाद्य पुरवले. आणीबाणीच्या काळात मचूळ झालेली दिल्ली सध्या एकदम तेज झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर नऊ राज्यांच्या विधानसभांचे विसर्जन ही एक गृहित धरलेली गोष्ट होती. पण राष्ट्रपतींनी त्याला खो देण्याचा अवाजवी प्रयत्न केला. जनता पक्षाच्या निर्मितीसाठी विविध घटक पक्षांची जी अखेरची अधिवेशने चालू होती त्यांमध्ये राष्ट्रपतींच्या या खळखळीबाबत प्रतिसाद उमटले. हंगामी राष्ट्रपतींच्या या अवाजवी-तणावांचा एक फायदा झाला. वेगळी चूल मांडून बसलेले बाबूजी सरळ जनता पक्षामध्ये विलीन झाले. एक नवीन बलशाली पक्ष आकाराला आला. चंद्रशेखर अध्यक्ष झाले. कार्यकारिणीही घोषित झाली. जयप्रकाशजींचे एक स्वप्न आकाराला आले.

विधानसभा विर्सजित करण्याबाबतच्या शासकीय घोषणापत्रावर सही करण्यास हंगामी राष्ट्रपतींनी भरपूर खळखळ केली. हे त्यांचे वर्तन कितपत योग्य होते? एक्सप्रेसच्या संपादकांनी याबाबत टिपण लिहिले असून राष्ट्रपतींचे वर्तन सर्वथैव चुकीचे होते. इतकेच नव्हे तर, अगदी बेचाळिसाव्या घटनादुरुस्तीचा आधार घेतला नाही तरीसुद्धा राष्ट्रपतींना दिरंगाईचे हे नाटक खेळण्याचा कोणताही घटनात्मक अधिकार नव्हता. आणि आणीबाणीचे सारे अत्याचार शांतपणे खपवून घेणाऱ्या जत्तीसाहेबांच्या या भूमिकेला कोणतेही नैतिक पाठबळ नव्हते. जत्ती हे तत्त्वाचा पाठपुरावा करणारे गृहस्थ आहेत. एखादी गोष्ट त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला पटली नाही तर, ते त्या गोष्टीला कदापी मान देणार नाहीत असा घोषा काँग्रेस पक्षाने लावलाच होता. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर, मंत्रिमंडळाने जी एकमुखी शिफारस केली त्याला तात्काळ मान्यता देण्याचे बंधन असतानाही घटनात्मक बाबींचा अर्थ लावण्याची सारी जबाबदारी केवळ आपल्यावरच आहे अशी विक्षिप्त भूमिका राष्ट्रपतींनी स्वीकारली आणि मग सारी दिल्ली संतप्त झाली. त्यातूनही मंत्रिमंडळाचा सल्ला. आपल्याला मानवण्यासारखा नाही असे मत व्यक्त करून त्यांनी राष्ट्रपतीपदाची वस्त्रे खाली ठेवली असती तर, कदाचित त्यांच्याबद्दल थोडीफार तरी आदराची भावना राहिली असती. परंतु आपल्यावर दोषारोप करून जनता पक्ष सत्तास्थानावरून आपल्याला हुसकून काढू शकत नाही, त्यासाठी आवश्यक असणारी शक्ती या पक्षाजवळ आज तरी नाही, ही गोष्ट डोक्यात ठेवून त्यांनी आपले आडाखे आखले ही गोष्ट दुर्दैवाचीच मानावी लागेल. राष्ट्रपतींनी दिरंगाई करून का होईना–पण अखेरीस या महत्त्वाच्या वटहुकूमावर सही केल्याने तापत चाललेले वातावरण वेळीच निवळले. ही दिरंगाई जर आणखी चोवीस तासच लांबली असती तर, परिस्थिती विलक्षण स्फोटक बनली असती. विधानसभांचे विसर्जन लांबवण्यामागे काँग्रेस पक्षाचा हात होता काय? विद्यमान बहुमताच्या जोरावर आपल्या पक्षाचा राष्ट्रपती निवडून आणण्यासाठी हे नाटक खेळले गेले काय? यांसारखे प्रश्न न्यायमूर्ती गोस्वामी यांनी राष्ट्रपतींबाबत केलेल्या विधानांमुळे विशेष अर्थपूर्ण वाटतात.

विधानसभांच्या निवडणुकांची टांगती तलवार डोक्यावर भिरवतच अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन भरले, अपेक्षेप्रमाणे पुरेसे गाजले आणि दररोज होणाऱ्या फाटाफुटीतून वाटचाल करत अखेर एकदाचे पैलतिराला पोचले. एवढे रामायण होऊन सुद्धा काँग्रेस पक्ष व्यक्तिमहात्म्य विसरण्यास तयार नाही. अध्यक्षपदी ब्रह्मानंद रेड्डी विराजमन झाले आणि विजय निनाद बाईंच्या नावाने उमटले! देश अत्याचाराखाली भरडला जात असताना ब्रह्मानंदी टाळी लावून बसलेले हे रेड्डी अध्यक्षपदी विराजमान होताच प्रथम त्यांना घरचा आहेर मिळाला. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गळचात हारतुरे पडण्यापूर्वीच–ज्या आंध्र प्रदेशातून ते निवडून आले, त्या आंध्र प्रदेशचे मुख्य मंत्री जे. वेंगलराव यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला, तर माजी केंद्रीय मंत्री के. रघुरामय्या यांनी काँग्रेसपक्षालाच रामराम ठोकला. किरकोळ पडझड तर रोज चालूच आहे. या निवडणुकीमध्ये–ऐनवेळी करणसिंग येऊन उभे राहिले. त्याचे नेमके कारण काय? निवडून येणार नाही हे तर त्यांनाही माहीत होतेच. मग उभे राहिले कशाला? त्यांच्या या निर्णयामागे असलेली प्रेरणाशक्ती कोण? तसे करणसिंग ओळखले जातात बाईंच्या गटाचे म्हणून. लढत जर अगदीच अटीतटीची झाली तर, रेड्डींची मते करणसिंगांनी फोडावित असा एक हिशेब होता. पण तशी वेळच आली नाही. फारशी तकलिफ न होता रेड्डी आले. सिद्धार्थ रे हे यशवंतरावांचे स्नेही आहेत. साहेब बंगालमध्ये गेले की, त्यांचाच पाठपुरावा करतात. अगदी अलिकडील बंगाल भेटीमध्ये तर, सिद्धार्थ बाबूंच्या घरी उतरून त्यांनी पश्चिम बंगालमध्ये सिद्धार्थ बाबूंना विरोध करणाऱ्या मंडळींना–आपण आपली शक्ती कोणाच्या मागे उभी केली आहे याचे उत्तर देऊन टाकले होते. असे असताना साहेब, त्यांच्यामागे येणारा सारा महाराष्ट्र घेऊन रेड्डींच्या बाजूने का उभे राहिले? संसदीय काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आपल्याला मिळावे असे ब्रह्मानंदजींना वाटत होते. विशेषतः दक्षिणेमध्ये काँग्रेस पक्षाला जे यश मिळाले त्याचे प्रमाण पाहता हा मान आपलाच आहे अशी त्यांची समजून होती. पण सी. सुब्रह्मण्यम साहेबांच्या बाजूने उभे

पृष्ठ २९ वर

# दोन अधिवेशने

## काही शंका, काही इशारे

वा. दा. रानडे

जनता पक्षाची स्थापना परिषद आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक अशी देशातल्या दोन प्रमुख पक्षांची दोन अधिवेशने मेच्या पहिल्या आठवड्यात दिल्लीत झाली. जनता पक्षाची परिषद विजयोत्सवाच्या वातावरणात, तर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक पराभवाच्या छायेत भरली होती. विजयी पक्ष आणि पराभूत पक्ष आपली भावी धोरणे काय आखतात, कशी आखतात या दृष्टीने या अधिवेशनांना महत्त्व होते. दोन्ही अधिवेशनांबद्दल लोकांच्या काही अपेक्षा होत्या, त्या कितपत पुऱ्या झाल्या ?

जनता पक्षाची स्थापना घोषित करून पक्षाच्या नेत्यांनी जनतेला निवडणुकीपूर्वी दिलेले एक आश्वासन पुरे केले. चार पक्षांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व विसर्जित करणे ही सोपी गोष्ट नव्हती. यांपैकी समाजवादी आणि जनसंघ हे पक्ष २६–२७ वर्षे अस्तित्वात असलेले. इतक्या वर्षांच्या कार्याने त्यांच्या निष्ठा, कार्यपद्धती, ग्रह–पूर्वग्रह ठाम बनलेले. देशात काँग्रेसला पर्यायी पक्ष आपलाच, अशी या दोन्ही पक्षांच्या नेत्यांची आकांक्षा होती. सुरुवातीला तर, निवडणूक समझोते व संयुक्त आघाड्यांनाही या पक्षांचा ठाम विरोध होता. पण परिस्थितीने त्यांना निवडणूक समझोत्यांचे धोरण स्वीकारण्यास भाग पाडले. संयुक्त आघाडी, विधिमंडळात संयुक्त पक्ष या त्यापुढच्या पायऱ्या. पण काँग्रेसला पर्यायी पक्ष स्थापण्यास आणि तिची सत्तेची मक्तेदारी संपविण्यास ही पावले अपुरी आहेत, असे दिसून येताच आपले स्वतंत्र अस्तित्व विसर्जित करून नवा पक्ष काढण्याच्या कल्पनेने मूळ धरले. आणीबाणीतील कारावासात संघटना काँग्रेस व भालोदच्या नेत्यांशीही बोलणी झाली. त्यातून जनता पक्षाची कल्पना पुढे आली. निवडणुका घोषित होताच आणि आणीबाणीचे निर्बंध शिथिल होताच या पक्षांच्या नेत्यांनी लागलीच एकत्र येऊन जनता पक्षाची घोषणा केली. चारही पक्षांची अधिवेशने होऊन निवडणुकीपूर्वी नवा पक्ष स्थापन करण्याइतका वेळ नव्हता. पण निवडणुकीनंतर त्यांनी ते आश्वासन पुरे केले आहे. चार दिशांना चार तोंडे असलेले हे पक्ष कसले एकत्र येतात, ही काँग्रेसनेत्यांची टीका त्यांनी खोटी ठरविली आहे. जगजीवनबाबूंच्या लोकशाहीवादी काँग्रेस पक्षानेही जनता पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतल्याने एकजूट अधिक दृढ झाली आहे.

पक्षस्थापनेपेक्षा पक्षाच्या उभारणीचे काम अधिक अवघड आहे. पक्षाच्या कार्यपद्धती व लोकशाही प्रथा पाळण्याकडे प्रथमपासून कटाक्ष हवा. त्या दृष्टीने स्थापना परिषदेत काही गोष्टी खटकल्या. अधिवेशन संपल्यावर संध्याकाळच्या सभेत अध्यक्षांची निवड मोरारजीभाईंनी जाहीर केली. ही निवड करण्याची संधी प्रतिनिधींना का दिली नाही ? पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी सभासदांचा कल अजमावून पंतप्रधान व पक्षाचे अध्यक्ष यांची निवड करावयाची, सभासदांनी त्याला मान्यता द्यावयाची, ही काँग्रेसचीच पद्धत दोन्ही निवडीच्या बाबतीत अवलंबण्यात आली. सरळ मतदानाने या दोन पदांची निवड का करण्यात आली नाही ? पक्षाची घटना-स्थापना परिषदेतच मंजूर व्हायला हवी होती. प्रतिनिधींना त्यावर चर्चा करण्याची संधी का देण्यात आली नाही ? त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करून कार्यकारिणी अंतिम घटना तयार करणार आहे. वास्तविक ही घटना खुल्या अधिवेशनात मांडून प्रतिनिधींची तिला मंजुरी घ्यायला हवी. वास्तविक स्थापना परिषदेतच या गोष्टी व्हायला हव्या होत्या. कोणी याबाबत आग्रह कसा धरला नाही ? घटनेबाबत, अध्यक्ष निवडीबाबत पक्षात मतभेद होते का ? स्थापना परिषदेतच त्यांचे प्रदर्शन होऊ नये म्हणून अधिवेशनात या गोष्टी आल्या नाहीत का ? तसे असेल तर, ते योग्य नाही. काँग्रेसमध्ये केला जातो तसा एकजुटीचा खोटा देखावा नको. जनता पक्षात खरी एकजूट दिसली पाहिजे. आतापर्यंत स्वतंत्रपणे कार्य केलेले पक्ष एकत्र येतात तेव्हा महत्त्वाच्या प्रश्नांवरचे धोरण ठरविताना, निर्णय घेताना, कार्यक्रम आखताना मतभेद होणारच. खुली चर्चा होऊन बहुमताने निर्णय घेण्याची प्रथा जनता पक्षात सर्व पातळीवर पाडली गेली पाहिजे. लोकशाही कार्यपद्धतीने पक्षबांधणी करायची तर, याच मार्गाने जायला हवे. निर्णय घ्यायला वेळ लागेल, प्रगती मंद असेल, पण लोकशाही कार्यपद्धती स्वीकारावयाची तर, या गोष्टींना तयारी हवी.

पराभवानंतर काँग्रेस पक्ष काही धडा शिकला आहे का ? पूर्वीच्या चुका प्रामाणिकपणे मान्य करून तो नव्या मार्गाने जाणार आहे का ? अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीवरून तरी तसे काही वाटत नाही ? पराभवाची प्रामाणिक चिकित्सा अधिवेशनात झालीच नाही. पराभवाला मुख्य जबाबदार इंदिरा गांधी. त्यांच्यावर उघड टीका करण्याचे धैर्य कोणी दाखविले नाही. आणीबाणीचा निर्णय चुकीचा होता अशी स्पष्ट कबुली देण्याची काँग्रेसनेत्यांची अजूनही तयारी नाही. काँग्रेसची मूलभूत धोरणे चुकीची नाहीत, पक्ष या धोरणांपासून ढळला म्हणून पराभव झाला अशी मीमांसा काँग्रेसच्या ठरावात केली आहे. मूलभूत धोरणे कागदावर नुसती बरोबर असून काय उपयोग ? किंवा त्यांचा केवळ तोंडदेखला पुरस्कार काय कामाचा ? या धोरणांवर काँग्रेस कार्यकर्त्यांचा मनापासून विश्वास होता का ? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. भाषा लोकशाहीची, पण प्रत्यक्षात कार्यपद्धती हुकूमशाही थाटाची. मग त्या लोकशाहीच्या घोषणांना काय अर्थ राहिला ? श्रीमती इंदिरा गांधींनी हुकूमशाही पद्धतीने घेतलेल्या निर्णयांना विरोध करण्याचे धैर्य पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांपैकी कोणी कसे दाखविले नाही ? आणि आता लोकसभा निवडणुकीत जनतेने इंदिरा गांधींची धोरणे धुडकावून लावल्यानंतरसुद्धा त्यांचे नेतृत्व पक्षात अजून कसे मानले जाते ? केंद्रीय मंत्र्यांच्या फाईलीपर्यंत संजय गांधींना मुक्तद्वार कसे होते याचा गौप्यस्फोट माजी केंद्रीय मंत्री टी. एन्. पै यांनी केला, पण त्यांचे हे सत्यकथन बहुसंख्य प्रतिनिधींना रुचले नाही, त्यांनी पै यांच्यावरच टीका

केली. पै यांच्या हल्ल्याचाही मुख्य रोख इंदिरा गांधींवर नव्हता तर, संजय चौकडीवर होता. साऱ्या दोषांचे खापर संजय चौकडीवर फोडून इंदिरा गांधींना निरपराध ठरविण्याचा हेतुपूर्वक प्रयत्न केला जात होता. पण संजयने जे काही केले ते इंदिरा गांधींच्या पाठिंब्याने केले हे विसरून चालणार नाही.

पक्षावर इंदिरा गांधींची पकड अजून आहे हे अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरून दिसून आले. पण पकड अजून असली तरी, त्यांच्या नेतृत्वाला विरोध वाढत आहे. हेही स्पष्ट झाले. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत इंदिरा पुरस्कृत ब्रह्मानंद रेड्डींना दोन तृतीयांश व सिद्धार्थ शंकर रे यांना एकतृतीयांश मते मिळाली. एकतृतीयांश मते विरुद्ध जावीत हेही काही कमी महत्वाचे नाही. यशवंतराव चव्हाणांना इंदिरा नेतृत्व झुगारण्याचे धैर्य अजूनही होत नाही हेही या अधिवेशनात स्पष्ट झाले. पक्ष जुन्याच चाकोरीतून जात असून तो सुधारण्याची शक्यता नजीकच्या काळात तरी दिसत नाही. □

---

मुक्काम कलकत्ता

# कुणालाच काही करायचे नाही !

तारा पंडित

पश्चिम बंगालमध्ये एकूण नऊ विद्यापीठे आहेत. ह्या क्षणी पहाल तर, प्रत्येक विद्यापीठाच्या परिसरात अगदी शुकशुकाट दिसेल. उन्हाळ्याच्या सुट्यांना तर अजून अवकाश आहे. पण गेल्या पंधरा दिवसांपासूनच सर्व विद्यापीठांनी गळयात कुलूपांची भलीथोरली लॉकेट्स् घालून घेतली आहेत. याचं जबरदस्त कारण म्हणजे हरताळ – विद्यार्थ्यांचा नव्हे, कर्मचाऱ्यांचा. ( non teaching staff ). आपल्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले म्हणून कर्मचारी नाराज झाले. त्यांनी आंदोलन सुरू केलं. ऑफिसची यंत्रणाच बंद पडल्यामुळे नाइलाजास्तव अध्ययन-अध्यापन बंद ठेवावं लागलं. होस्टेलच्या विद्यार्थ्यांनाही घरी परत पाठवण्यात आलं. पण विद्यार्थी नाराज आहेत. कारण त्यांनी परिक्षेची तयारी केली आहे. विद्यापीठाचा कारभार बंद म्हणजे परीक्षा पुढे ढकलणं हे ओघाने आलंच. ही ढकलगाडी अशीच सारखी ढकलली जात आहे. काही परीक्षा तरी १९७५ पासूनच पुढे ढकलण्यात आल्या आहेत. काही १९७६ च्या बाकी आहेत. ह्या सर्व परिक्षा काही ना काही कारणामुळे घेतल्या जात नाहीत. पूर्वी अनेकदा विद्यार्थ्यांनीच त्या पुढे ढकलण्याची मागणी केली होती. कधी विद्यापीठालाच शक्य झालं नव्हतं, कधी प्राध्यापकांनी संप केले होते आणि आता ऑफिस कर्मचारी आंदोलन करू लागलेत.

गेल्या नोव्हेंबरमध्ये श्री. सुशीलकुमार मुखर्जी यांनी उपकुलगुरू म्हणून सर्व सूत्रे हाती घेतली तेव्हा, त्यांनी आल्याआल्याच जाहीर करून टाकले की, परीक्षा वेळचेवेळी घेतल्या जातील आणि निकालही वेळेवर जाहीर होतील, अशी खबरदारी घेणे हे आम्ही आमचे आद्य कर्तव्य समजतो. पण ही वचनबद्धता शब्दापुरतीच मर्यादित राहिली. ह्यावर्षी परिक्षांना झालेला कमालीचा उशीर विद्यापीठांच्या दृष्टीने अगदी लांछनास्पद ठरला आहे. पण कलकत्ता विद्यापीठाचे रजिस्ट्रार म्हणतात, विद्यार्थी, अध्यापकवर्ग आणि कर्मचारी आळीपाळीने करीत आलेल्या आंदोलनांमुळेच परीक्षा नाइलाजास्तव पुढे ढकलाव्या लागल्या ह्यात आमचा काय दोष? ह्यावेळी तर केवळ कलकत्ताच नव्हे तर, इतर सर्व विद्यापीठांचे कर्मचारी ह्या आंदोलनात सामील आहेत. परीक्षा घेणार कशा ?

ह्याच महिन्याच्या सुरुवातीला कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभाचेवेळी गव्हर्नरसकट सर्व बडया मंडळींनी विद्यापीठात माजलेल्या सावळ्या गोंधळाच्या दुष्परिणामांचा उल्लेख केला होता, विद्यार्थी व पालकांचा संताप बोलून दाखवला होता आणि सल्ला दिला होता की, विद्यापीठांनी कामात व्यत्यय आणणाऱ्या हरताळ, आंदोलन आदि गोष्टींपासून अलिप्त असावे. पण प्रत्यक्षात हे कसे शक्य आहे ? कर्मचारी आंदोलन करू लागले की, त्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव कमीच दिसते आणि विद्यार्थी हरताळ करतात तेव्हा त्यांना दूरदृष्टीच नसते असेच सदैव म्हटले जाते.

थोडक्यात सध्या जे चालले आहे त्याबाबत कोणालाच काही करायचे नाही. ऑफिस कर्मचारी आपला हट्ट चालवणारच. विद्यापीठांचा अधिकारीवर्ग 'आम्ही तरी काय करणार ' म्हणत आंदोलन संपण्याची वाट बघत बसणार. पालक 'कार्टयांचं नशीब ' म्हणून त्यांच्या नावाने बोटे मोडणार किंवा घरात बसून विद्यापीठीय अधिकाऱ्यांना शिव्या देणार.

मात्र ह्यात भरडले जात आहेत ते विद्यार्थी. थोडे नव्हेत–चांगले तीस हजार विद्यार्थी. त्यांनी काय करावे ? त्यांच्या हाती सत्ता नाही, आंदोलनाला पाठिंबा देता येत नाही ( कारण असे केल्याने स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे ), आणि पालकांच्या आशाआकांक्षा ते पूर्ण करू शकत नाहीत. आयुष्याचे दिवस फुकट घालवीत, आढ्याकडे पाहत ( किंवा सिनेमा पाहत ) कालक्रमणा करीत आहेत.

पण ह्यामुळे झाले काय, ग्रॅज्युएशनची परीक्षा नाही म्हणून पुढचे शिक्षण, नोकरीसाठी प्रयत्न किंवा इतर कॉम्पिटिटीव्ह परिक्षांना बसणे–सारेच थांबले. एम्. बी. बी. एस्. च्या परीक्षा नाहीत. लॉ च्या परीक्षा नाहीत. त्यामुळे डॉक्टर वा वकील होण्याची स्वप्नेही टांगून ठेवलेली आहेत. एकूण शिक्षणाच्या उच्च ध्येयाला जणू थट्टेचे स्वरूपच प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना असल्या गढूळ वातावरणात वावरण्याची इच्छा नाही. ते म्हणतात सरकारने ह्या बाबतीत हस्तक्षेप करावा आणि कोणत्याही परिस्थितीचा शिक्षणावर परिणाम होणार नाही अशी व्यवस्था करावी. त्याचबरोबर विद्यापीठीय अधिकाऱ्यांनी राज्यकर्त्यांची चमचेगिरी करू नये असेही त्यांना वाटते. कारण त्यांनी जर आपले धोरण राजकारणावर अवलंबून ठेवले तर, साऱ्या शिक्षणक्षेत्राचा खेळखंडोबा व्हायला वेळ लागणार नाही.

तर हे एकंदरीत असं आहे. जो तो आपापली बाजू मांडतो पण प्रत्यक्षात कुणालाच काही करायचे नाही. सारेजण नुसतेच डोके खाजवीत बसले आहेत. □

# भारतीय बँकांसाठी एक नवी धाडसी सुधारणा

चंद्रकांत अंबाडे

मी... एक सामान्य माणूस...सामान्य प्राप्ती असणारा व बेताचेच ज्ञान असलेला. तेव्हा ते जड जड इंग्लिश शब्द "प्रॉडक्टिव्हिटी अ‍ॅण्ड वेजेस" इ. इ. जरावेळ बाजूला ठेवूयात, कारण त्यांचे भाषांतराचे मराठी शब्द उत्पादनक्षमता आणि वेतनमान हे तरी मला कुठे पूर्णपणे समजले आहेत? मला समजते, दिसते ते हे की, काही वर्षांपूर्वी, मी शाळेत असताना, आमचेकडे धुणेभांडयास कामवाली बाई होती. तिला दरमहा दोनचार रुपये काहीतरी वडील देत असावेत. पुढे मी नोकरीला लागलो तसा घरांत माझाही पगार येऊ लागला. तेव्हा तीच कामवाली बाई घरात निवडण–दळण झाड-लोट बाजारहाट पाहू लागली. आईने तिला नक्कीच अधिक पगार कबूल केला असणार. पुढे माझं लग्न झाले...मी बापही (आपोआपच?) झालो आणि ती कामवाली बाई आता चोवीस तास आमच्या घरात राबू लागली. माझी पत्नीही मिळवती असल्यामुळे ह्या बाईचा दरमहाचा जेवणाचा खर्च व पगार आम्हाला परवडण्यासारखा होता. आता ती बाई धुणेभांडी करीत नाही. त्यासाठी दुसरीच म्हातारी आहे. ही पूर्वीची भांडेवाली आता स्वयंपाकासह सर्व घरकाम आणि मूल सांभाळण्याचे काम पाहते. लौकरच मी एक बागकामाचा माळी पार्ट–टाईम ठेवणार आहे. देवाच्या कृपेने (लॉटरी लागून) गाडी घेतलीच तर, आईमुलांना फिरवण्यास ड्रायव्हरही ठेवता येईल मला. आता तुम्ही म्हणाल स्वतःच्या बढाईची ही चढती भाजणी आमच्यासमोर कशाला?

माझे उत्पन्न जसजसे वाढत गेले, तसतसे मी माझ्या नोकरांना देत असणारे वेतनही वाढत गेले. माझी पैशांची उत्पादनक्षमता वाढली तर, भविष्यकाळात माझेकडील नोकरही वाढतील व त्यांना पगारही वाढेल. थोडक्यात उत्पादनक्षमता व वेतनमान एकमेकांवर अवलंबून आहेत. उद्या समजा माझी नोकरी सुटली तर, तत्क्षणी ती कामवाली बाईपण बंद होईल. म्हणजेच एकीकडे मी कुणाकडून पगार स्वीकारीत असतो, तर त्याचवेळी कुणाला पगार देतही असतो. तत्त्व एकच साधे की, माझ्या उत्पादनापेक्षा माझा खर्च जास्त होता कामा नये किंवा माझ्या उत्पन्नाचे केवळ काही टक्केच मी नोकरांवर खर्च करू शकतो. माझा पगार करणारा कारखानदारसुद्धा माझ्या बाबतीत हेच तत्त्व पाळीत असतो. मी स्वतः अधिकात अधिक किती खर्च करावा ह्याला मर्यादा नाही. माझ्या कुवतीनुसार मी वाटेल तितका खर्च करू शकतो. पण कमीत कमी किती करावा ह्याला मात्र किमान मर्यादा आहेत. माझी भांडेवाली दरमहा २५ पैशात भांडी घासेल का? किंवा माझ्या दुकानातील कारकून द. म. सात रुपयात येईल काय? तेव्हा हे झाले किमान वेतन. माझा खर्च भागवून वर भांडेवालीचाही खर्च भागविता यावा इतके माझे किमान वेतन. त्यासाठी माझा मालक मला जेवढा पगार देतो त्याचा मोबदला मी त्याला दिला तरच तो मला ठेवील ना? मला जर अधिक पगार हवा असेल तर, माझ्या मालकाला मी अधिक काम दिले पाहिजे. म्हणजेच माझी वेतनश्रेणी माझ्याच उत्पादनक्षमतेवर अवलंबून आहे ना?

समजा, तुमची भांडेवालीबाई तांबेपेले, वाट्यास राख तशीच ठेवते. तम्याचं बूड काळंच राहतं. कुकर धुता येत नाही व कपबशा फुटण्याची भीती वाटते म्हणे अशा कामवालीस तुम्ही लौकरात लौकर 'गुड्बाय' करणारच ना? का? तुम्ही दरमहा जो पगार देता त्याचा पुरेपूर मोबदला तुम्हाला मिळत नाही. अशा वेळी मार्ग दोन. (१) तिने स्वतःचे काम सुधारणे, म्हणजेच दुसऱ्या शब्दात उत्पादन वाढविणे. (२) किंवा त्याप्रमाणात तिच्या पगारातून पैसे कापणे. कारण हाच न्याय माझा मालक, मला पगार देताना लावीत असतो ना? (अपवाद: मालक 'पब्लिक सेक्टर' असले तरच) समजा, मी कुठल्या मशीनवर काम करीत असेन तर, संध्याकाळपर्यंत होणारे काम मोजता येते. समजा, ऑफीसमध्ये क्लार्क किंवा वॉच-अ‍ॅण्ड वॉर्डचा शिपाई असेल तर तो खर्च एकूण उत्पन्नावर लावतो. सारांश, मुख्य तत्त्व एकच की, जमेपेक्षा खर्च अधिक नको. खर्च वाढला की, उत्पादनाची किंमत वाढेल व त्याप्रमाणात ती वस्तू बाजारातील स्पर्धेमध्ये मार खाईल. ते टाळायचे असेल तर, तोटा सोसून वस्तू रास्त भावामध्येच विकावी लागेल. असा प्रकार सार्वजनिक क्षेत्रात घडू शकतो. खाजगी क्षेत्रात कटाक्षाने टाळला जातो. कारण तेथे उत्पादनक्षमता आणि वेतनमान ह्यांची सुयोग्य सांगड घालण्यात आलेली असते. ती कशी?

रामा आणि गोविंदा दोघांनाही समान पगार मिळतो–५०० रु.! रामाची सीता शहाणी आहे. ती बजेट तयार करते आणि ५० रु. शिल्लक दाखवते. प्रत्यक्षात १०।१५ रु. अवांतर खर्च होऊनही ३०।३५ रु. तिचे सेव्हिंग होते. अर्थात हे जोडपे खाऊनपिऊन सुखी आहे. गोविंदाची राधासुद्धा शहाणी आहे. तिलासुद्धा बजेट मांडावेसे वाटते, पण दरमहा तिच्या हातात नवरा पगार देतो फक्त १००।१५० रुपये. आणि त्यांत घरखर्चच भागत नाही, तर कसले सेव्हिंग अन् कसले काय? गोविंदाचा पगार देणेकरी–किराणावाला, दूधवाला, कापडवाला–एक तारखेलाच जणू हिसकावून घेतात, उरलासुरला चहापाण्यात जातो व बायकोपर्यंत १००।१५० रु. येतात. अर्थातच तो महिना भागविण्यासाठी ती बिचारी पुन्हा उधारी करते. आणि तिचे ते बजेट कागदावरच राहते. हे असे का घडते...?

रामाने प्रथमपासूनच विचारपूर्वक खर्च केलेला आहे. परवाचेच

ताजे उदाहरण पाहा ना. बोनसचे ४०० रु. दोघांनाही मिळाले. रामाने घरात थोडीच मिठाई आणली व एक सायकल–स्वतःसाठी ! गोविंदाने कर्जपाणी–देणी फेडण्यामध्येच अर्धे पैसे घालविले. उरलेल्या पैशात टेरिकॉटची पॅन्ट शर्ट जोडी बनविली. दोघेही रोज बसने कामावर जातात व प्रत्येक वेळी चार आणे बसभाडे भरतात. सायकलमुळे रामाचा दरमहा १३ रु. बसभाडे खर्च वाचला. सायकलीचा तेलपाणी पंक्चरचा खर्च दरमहा ३ रु. धरला तरी, त्याने दरमहा १० ची बचत केली. ह्या उलट गोविंदाने केलेले भारी कपडे पडूनच राहणार, उलट धुलाईचा खर्च वाढला. सारांश, रामाची प्रॉडक्टिव्ह गुंतवणूक झाली, तर गोविंदांची 'डेड इन्व्हेस्टमेंट !' साहजिकच गोविंदाच्या मागचे देणे–पुढं उधारी चुकती करणं–पुन्हा उधारी हे दुष्टचक्र कधी संपणारच नाही, उलट रामाचे सालीना १०० रु. वाचले तर त्यामधून तो टेरिकॉटचे कपडे करील. आज, आमच्या देशाला जरुरी आहे रामांची, पण सारीकडे बुजबुजाट झालाय गोविंदांचा. रामा भरपूर खातो, खूप काम करतो, पुरा पगार पदरात पाडतो, नियोजनबद्ध व्यावहारिक बजेट राबवितो आणि सुखानें संसार करतो. गोविंदाचा दिवस उजाडतोच मुळी टंचाईत. खायला अपुरे म्हणून काम कमी होते, म्हणून पगार कमी पडतो, म्हणून पुन्हा उधारी ! ! हे गोविंदाचे रहाटगाडगे तो 'राम' म्हणेपर्यंत चालणार आहे, कारण तो डेट इन्व्हेस्टमेंटच करीत गेला. रामाप्रमाणेच प्रॉडक्टिव्ह गुंतवणूक केली नाही; म्हणून तो पस्तावला.

रामा गोविंदा किंवा तुम्ही आम्ही व्यवहारांत पैसा खर्च करताना सदैव हा विचार करतो की, ही गुंतवणूक 'डेड' नाही ना ! त्या गुंतवणुकीपासून किंवा ह्या खर्चाचा पुरेपूर मोबदला परत मिळतो ना ? ह्राच विवाद उद्योगधंद्यामध्ये मालकवर्ग पावलोपावली करीत असतो. त्यामुळे त्यांच्या खर्चावर बंधन राहते व उद्योग नफ्याने चालतो. ह्याउलट तोच उद्योग पब्लिक सेक्टरमध्ये तोटचात चालतो. ह्याचे सध्याचे ताजे उदाहरण म्हणजे बँका !

राष्ट्रीयीकरणापूर्वी बँकांमध्ये एकमेकीत स्पर्धा होती. स्पर्धेतूनच आपोआप गिऱ्हाईकांची अधिक सेवा, कमी दरात काम, त्वरित पैसा उपलब्ध होणे अशा सोई जनतेस मिळत असत. व्याजाचा दर आकर्षक असे, तर काही बँका मुंबईवरील चेक्स मोफत वटवून देत. पण राष्ट्रीयीकरणानंतर बँकांमधील सर्वसाधारण स्पर्धा संपून, गलथानपणा, आळशीपणा व गिऱ्हाईकांबाबत बेपर्वाई दिसू लागण्यास सुरुवात झाली. कर्मचाऱ्यांमध्ये शिस्तीऐवजी 'पाटचा टाकण्याची' वृत्ती वाढू लागलीच, पण त्यांच्या संघटना ( युनियन्स ) एकत्र झाल्या व संप–पेन डाऊन– गो स्लो– घेराओ अशाही मार्गांनी त्यांनी कर्मचाऱ्यांचे पगार बेसुमार वाढवून घेतले. राष्ट्रीयीकृत बँकांना मिळणारा भरमसाठ ओव्हरटाईम इतरांच्या चर्चेचा विषय बनला. पगार बेसुमार वाढले आणि कार्यक्षमता कमी झाली व बँकिंगचा इतकी वर्षे नफ्यात चालणारा धंदा तोटचात येऊ लागला. परिणामी बँकांनी कामाचे दर वाढवून तो बोझा पूर्णपणे जनतेवरच टाकला. चार आण्यात मिळणारा डिमांडड्राफ्ट, रुपायास झाला, तर १० रुपयांचा लॉकर छत्तीस रुपयास झाला. जनतेसाठी बँका, की बँकांसाठी जनता हा संभ्रम पडला. लहानसहान गावातून बँकेत कौंटरच्या कस्टमर्सच्या बाजूला ३ गिऱ्हाईके, तर स्टॉकच्या बाजूला १२।१४ जण चकाटचा पिटणारे. अशी दृश्ये कमी अधिक प्रमाणात दिसू लागली. कारण एकच की, 'वेजेस लिंकड् वुईथ प्रॉडक्टिव्हिटी' हे तत्व सोईस्कररीत्या दुर्लक्षिले गेले. ते कसे ?

माझी स्वतःचीच केस घ्या. मला बँकेचा काहीही उपयोग होत नाही; कारण माझ्या ऑफिसच्या वेळा ज्या आहेत, त्याच वेळा बँकेच्याही. रविवारी मला सुटी, तर बँकाही बंद. माझ्याप्रमाणेच बहुसंख्य कामगार, नोकरदार, शिक्षकांना बँकेत जाणे जमत नाही. मग पत्नीस बँकेत पाठविणे किंवा स्वतःचे ऑफिसातून कामाच्याच वेळातून बँकेत जाऊन येणे हा मार्ग उरतो. परिणाम माझ्याप्रमाणे इतर लाखो पगारदार बँकेपासून चार पावले दूर राहतात किंवा नाईलाज म्हणून बँकेत जातात. अशा वेळी मला प्रश्न पडतो तो हा की, लोकांसाठी बँक की बँकेसाठी लोक ?

वास्तविक एकाच साधारण लोकवस्तीच्या तालुक्याच्या गावात आज सहा सहा, सातसात बँका एकाच वेळी, पाटचा लावून, ( माशा मारीत ) आहेत. त्यांच्यापेक्षा एकच राष्ट्रीयीकृत बँकेची शाखा, चोवीस तास किंवा किमान सोळा तास उघडी ठेवली तर ? रेल्वेस्टेशनची तिकिटांची खिडकी जशी सदैव उघडीच असते किंवा वीजपुरवठा, पाणीपुरवठा ह्याप्रमाणे बँकांची सेवासुद्धा आवश्यक समजून 'राऊंड-द-क्लॉक' ठेवली तर, जनतेची प्रचंड सोय तर होईलच पण बँकांचे खर्चातसुद्धा मोठचा प्रमाणात कपात होईल. बँका नफ्यात चालू लागतील आणि त्यांच्या टर्नओव्हरमध्ये आश्चर्यकारक वाढ होईल. आपापला व्यवसाय आणि नोकरी सांभाळून प्रत्येकाला बँकेची वेळ साधता येईल. दिवसपाळी, रात्रपाळी असूनही बँकेचा फायदा उठविता येईल. असे लाखो कस्टमर्स दरमहा १०।२० रुपये जरी शिल्लक ठेवू लागले तरी, कोटचावधी रुपयांची आपोआप बचत होईल. दुकानदार रात्री दुकाने बंद करून घरी जाता जाता गल्ला बँकेत भरूनच घरी जातील. सध्या तो गल्ला दुसरे दिवशीच सकाळी ११ वा. जातो.


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य । सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

रातोरात व्यापारी रेल्वेरसीदी सोडवून आणतील व वॅगनी खाली होतील त्याप्रमाणात वॅगन्सची टंचाई कमी होऊन भ्रष्टाचारही कमी होईल. वाटेल तेव्हा रात्री बेरात्री व रविवारीही पैसा उपलब्ध झाल्यामुळे, बेकायदेशीर सावकारी आपोआप बंद पडेल. देशाच्या अर्थकारणास एकाएकी गती मिळालेली दिसेल.

| सध्याची एक शाखा–फक्त ११ ते ३ किंवा मर्यादित वेळेत उघडी असणारी. | | राऊंड-द-क्लॉक–२४ तास चालणारी बँक–एका लाखाचे वस्तीस एकच बँक. | |
|---|---|---|---|
| मॅनेजर–१ | २००० | ३ मॅनेजर्स–३ पाळचांसाठी | ६००० |
| अकाऊंटंट–१ | १५०० | ३ अकाऊंटटस् | ४५०० |
| क्लार्क, कॅशिअर्स–१० | १०,००० | ३० क्लार्क्स / कॅशिअर्स | ३०,००० |
| चपराशी–२×५०० | १००० | ६ चपराशी प्यून्स | ३००० |
| झाडूवाला / भंगी १ | ५०० | झाडूवाला भंगी–२ जागा | १००० |
| पहारेकरी–२ | १००० | पहारेकरी ४ (रिलिव्हरसह) | २००० |
| जागाभाडे, वीजपाणी, | १००० | मोठी दुप्पट जागा–भाडे | ३००० |
| पोस्टेज, टेलिफोन | १५०० | पोस्टेज स्टेशनरी, छपाई–३ पाळचांना | १५०० |
| स्टेशनरी / छपाई इ. | ५०० | | |
| दरमहा बदली कामगार (रजेवर जाणाऱ्याचे जागी) | १००० | दरमहा बदली कामगार रजेवर जाणाऱ्यांचे जागी | ३००० |
| दरमहाचा खर्च | २०,००० | दरमहा खर्च. अशा | ५७,००० |
| २०,००० × १२ महिने | = २,४०,००० वार्षिक | बारा महिन्यांचा खर्च... | ६,८४,००० |
| फर्निचर, अलमारी, चतुर्थ श्रेणीचा युनिफार्म इ. इ. | १०,००० | फर्निचर अलमारी, क्लास फोर कर्मचाऱ्यांचे कपडे इ. | +१६,००० |
| एका शाखेचा वार्षिक खर्च | २,५०,००० | अशा प्रकारे एकच बँक २४ तास चालेल तर तिचा वार्षिक खर्च फक्त... | ७,००,००० |
| अशा ५ शाखा १ गावात साधारणपणे २,५०,००० × ५ = १२,५०,००० | | | |

वरील अंदाजावरून हे उघड आहे की, साधारण तालुक्याच्या गावीसुद्धा सालीना किमान पांच लाखाची बचत होऊ शकेल. आज देशातील किमान १००० गावांत हा प्रयोग केला तर, दरसाल पांच कोटींची बचत होईल. कित्येक गावात तीन पाळचांची म्हणजे २४ तास चालणारी बँक अनावश्यक भासेल. अशा ठिकाणी २ पाळचांची बँक, सोळा तासच काम करून साऱ्या गावातील लोकांना बँकेचा लाभ देऊ शकेल. सकाळी ६ ते रात्रौ १० ही वेळ पुष्कळ झाली. अशा ठिकाणी प्रत्येक गावामागे पुन्हा एकेक लाख रुपये वाचतील. शिवाय, कामाच्या वेळा सोईस्कर झाल्यामुळे बँकांचे गिऱ्हाईक वाढेल. त्याप्रमाणात ठेवी वाढून, टर्नओव्हर वाढून बँकांच्या नफ्यात वाढ होईल ती निराळीच. आज राष्ट्रीयीकृत बँकांमधून पत्ते–कॅरम–नाटयस्पर्धा–खेळांच्या स्पर्धा व त्याही हजेरी लावून, डयूटीचे वेळांतच ही प्रवृत्ती वाढती आहे, कारण? एम्प्टी माईंड=डेव्हिल्स वर्कशॉप!

अशाच प्रकारे 'उत्पादनक्षमतेवर वेतन' (वेजेस लिंकड् वुईथ प्रॉडक्टिव्हिटी) हे तत्त्व कठोरपणाने पोस्ट ऑफिसे, वीजमंडळे, विमा, परिवहन अशा खात्यांना लावले तर, देशाचा शेकडो कोटींचा फायदा होऊ शकेल. दोन दोन कोटींचे एकेक धरण जरी मग एकेका ठिकाणी बांधले तरी दोन दोन जिल्हे एकेका धरणामुळे सुजलाम् सुफलाम् होतील. त्यामधून आलेली सुबत्ता हेच खरे बाळसे असेल. अन्यथा सामाजिक विषमता–टंचाई–असंतोष वाढतच राहील. त्या आगीत महागाईचे, वाढत्या लोकसंख्येचे तेल दरसाल पडताच राहील. 'गरिबी हटाव'ची फुंकर किंवा 'दुर्बळ घटकास कर्ज वाटपाचे चमचाभर पाणी, त्या डोंबाला थोपवू शकणार नाही. □

[ महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या १९७४ च्या वार्षिक, निबंध स्पर्धेतील पारितोषिक-पात्र निबंध. संक्षिप्त स्वरूपात, चेंबरच्या सौजन्याने.
निबंधाचा विषय होता : WAGES LINKED WITH PRODUCTIVITY. ]

# एका खेडयातील निवडणूक अनुभव

गो. भा. वैद्य

इंग्लिशमध्ये एक म्हण आहे. यशासारखे यशस्वी दुसरे कोणीच नाही. nothing succeeds like success. याचा अत्यंत सुखद अनुभव, हो आता सुखदच; अनेकांनी जनता पक्ष विजयी झाल्यानंतर घेतला आहे. परंतु आजही ते दिवस आठवले म्हणजे मन कसे थरारून जाते. सत्य हे अद्भुतापेक्षाही अद्भूत असते याचा प्रत्ययकारी अनुभव यावेळी जसा आला तसा इतिहासात क्वचितच आला असावा.

जनता पक्षाची स्थापना, त्या आधीची आणीबाणीतील परिस्थिती इ. गोष्टी आता शाळेत जाणाऱ्या मुलांनाही पाठ झाल्या आहेत. त्यामुळे त्यांचे चर्वितचर्वण करण्याची येथे गरज नाही. परंतु एक गोष्ट मात्र निर्विवाद की, जनता पक्षामुळे जनताजनार्दनाच्या असंतोषाला वाचा फुटली. एखादा कोंडलेला जलप्रवाह ज्याप्रमाणे outlet मिळाल्यावर बाहेर यावा त्याप्रमाणे तत्कालीन राजवटीबद्दलचा क्षोभ, त्वेष, अपमानित अवहेलना यांना सहस्र मुखांनी वाचा फुटली.

आज मी हा जो लेखनाचा प्रपंच करीत आहे, तो एक सामान्य माणूस या नात्यानेच. मी काही राजकीय कार्यकर्ता नाही. किंबहुना आज वयाच्या चाळीसाव्या वर्षापर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाची बिकट वाट मी चाललो नाही. संसाराच्या 'धोपट' मार्गाचेच मला आकर्षण आहे. परंतु हे एक असेच काही वारे आले की, त्यात मी मी म्हणणारेही साफ पालथे झाले, तिथे माझ्यासारखा पालापाचोळाही उडाला यात काय नवल ? माझ्यासारख्या सामान्य मनुष्याला या 'नसत्या फंदात' पडण्याची अनेक कारणे आहेत.

मी खानदेशातल्या एका ना धड शहर, ना धड खेडे अशा गावात ५।६ वर्षांपासून स्थायिक आहे. व्यवसाय अर्थात शेती. गावात नावलौकिक पूर्वजांचा खूप चांगला. त्यामुळे पांच सात वर्षांपूर्वी जेव्हा तेथे राहवयास गेलो, तेव्हा कल्पनाही नव्हती की, गाव इतका बदलला असेल. कारण लहानपणी सुटीत आजोळी जात होतो त्यावेळी गाव बदलत चालला आहे हे कळलेही नाही, आणि तसा गावाशी संबंधही नव्हता. कदाचित, ते वयही याची फिकीर करण्याचे नव्हते असेही म्हटले तरी चालेल.

परंतु गावात राहवयास गेल्यावर एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात आली आणि ती ही की, आपली पदोपदी अडवणूक केली जात आहे आणि यात ग्रामपंचायतीचा प्रामुख्याने पुढाकार आहे. गावातील इतर सहकारी संस्था त्यांना मनापासून साथ देत आहेत आणि 'बिना सहकार नही उद्धार' ही म्हण नेमक्या उलट अर्थाने सिद्ध करीत आहेत. येथे माझ्या अडचणींचा पाढा वाचण्यात अर्थ नाही. पण काही नमुनेदार गोष्टी मुद्दाम नमुद करण्यासारख्या आहेत. त्या वाचूनच नुसती शितावरून भाताची परीक्षा होईल. संपूर्ण भाताचे भांडे उतरवावयास नको. त्यातील काही नमुनेदार धडे असे. १) माझी आजी निवर्तल्यावर तिच्या मृत्यूचा दाखलाही मला सहा महिनेपर्यंत ग्रामपंचायतीने दिला नाही. त्यासाठी बी. डी. ओ. गाठावा लागला. २) गावात नळ आले आहेत. मी नळ घेतला. माझ्या नळाचे पाणी कमी कमी होत दोन महिन्यांनी अजिबात बंद झाले, तेव्हा रेव्हेन्यू कमिशनर, कलेक्टर, पी. डब्ल्यू. डी., इंजिनिअर गाठावा लागला. ३) गावातील एका सोसायटीला सिमेंट वाटपाचा परवाना होता. इतरांना १००।१०० थैल्या देणाऱ्या सोसायटीने मला मात्र अंगठा दाखविला. शेवटी मला जिल्ह्याचे कलेक्टरकडे जावे लागले तेव्हा पाच थैल्या मिळाल्या. या व अशा असंख्य गोष्टी आहेत की, जेथे मला प्रत्येक गोष्टीसाठी सामना द्यावा लागला, तेव्हाच कामे झाली.

हळूहळू माझ्या लक्षात आले की, हे सर्व हेतुपुरःसर घडवले जात आहे. याच्या मागची कारणमीमांसा जेव्हा पाहिली तेव्हा लक्षात आले की, यात नुसताच जातीचा वाद नाही तर, त्याही पलिकडचे काही आहे. ते म्हणजे या पाठीमागे एका व्यक्तीची निश्चित प्रेरणा आहे; आणि ती व्यक्ती नुसती पुढारीच नव्हे तर, 'आपण गावचे मालक' असे मानणारी आहे. आता राजकारणी म्हटला की, त्यात सर्व गुणदोष आलेच. पण त्या व्यक्तीचा मोठा विशेष म्हणजे १९७२ पर्यंत विरोधी पक्षात राहून, कॉंग्रेसला यथेच्छ गालीप्रदान करून, कॉंग्रेसच्या सभा उधळून, एका सुप्रभाती भगवान बुद्धाला बोधीवृक्षाखाली जसा साक्षात्कार झाला, तसा यांना इंदिरा कॉंग्रेसच्या सुखद छायेत साक्षात्कार होऊन, ते अखेर कॉंग्रेसवासी झाले.

बरे गावाची परिस्थिती म्हणावी तर, 'गाव पडला टग्यांचा आणि बाई पडली भोळी' अशी. त्यामुळे सगळाच तोंड दाबून बुक्क्यांचा मार ! यांच्या हाताखाली सैन्य भरपूर. त्यामुळे कोणीही ब्र शब्द विरुद्ध बोलू शकत नाही. बोलल्यास बंदोबस्ताला सैन्य आहेच तयार. गावात कोणी यांना विचारल्याशिवाय दुसऱ्यास शेत विकायचे नाही, की घराची उठाठेव करायची नाही. अशा मशारनिल्हे ( नावात काय आहे ?–शेक्सपिअर ) माणसाशी गाठ. म्हटले ठीक आहे. ! ( आलीया भोगासी ) शक्यतोवर मी संबंध येऊ दिलाच नाही. पण जेव्हा आला तेव्हा मलाच नोकराकरवी दमदाटी. 'गावात राहाचे असले तर नीट रहा.' मी पण मुहतोड जबाब दिला. पण मनातून हबकलोच. कारण पूर्वी इतिहासात खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अमल कंपनीसावकारका असा प्रकार होता, त्याप्रमाणे दिल्लीला राज्य इंदिरा गांधींचे, महाराष्ट्रात वसंतराव धोरली पाती ( म्हणजे नाईक, पाटील नव्हे ) आणि गावात या

टेकोजीरावांचे. काँग्रेसशी दुसरा घरोबा असला तरी, 'वजन लई ढांडगं.' थेट 'साहेबांशी' हस्तांदोलन. नेहमी त्यांच्या भेटी गाठी. तसे फोटो जागोजागी भरात लावलेले. म्हटले आता बोल ! नाही खरे म्हणजे बोंबलाच ! मीही मग सावरून घेतले.

याचा कळस झाला आणीबाणीत ! त्यावेळी संघवाला म्हटला की, उचल को ठेव तुरुंगात असा Call him a dog and shoot प्रकार होता. या पुढाऱ्याच्या मनात आले यांना आता खरा दणका द्यावा. एका सुप्रभाती एका माणसाकडून फौजदाराकडे अर्ज रवाना. '.........श्री..........हे संघाचे काम करतात. यांना काही काम नाही. उगीच रिकामे फिरतात. गावात फार लोकांना यांचा त्रास होतो. इ. इ.' सुदैव इतकेच की, ते आणीबाणीचे सरते दिवस होते आणि मुख्य म्हणजे माझे नावच चुकीचे लिहिले होते. वास्तविक आमच्या तीन पिढ्या काँग्रेसच्या. आजोबा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे ब्रिटिशांच्या काळातही अध्यक्ष, वडील आयुष्यभर काँग्रेसचे. मी आयुष्यात संघाचे तोंडही पाहिले नाही. उलट लहानपणी राष्ट्र सेवा दलात होतो. पण मला खात्री आहे की, हे कोणीही पाहिले नसते. कारण पुढाऱ्यांची इच्छा. तशी 'साहेबांची' आणि माझी घसट नसली तरी परिचय होता. १९६२ साली दोन-तीनदा भेट झाली होती. वाटले टाकावे एखादे पत्र, पण विचार केला 'साहेब' आता दिल्लीला आणि पुन्हा आणीबाणी ! मग टाकले पत्र माननीय शंकररावजींना. त्यांचा खाक्या काही औरच. त्यांना भेटायला वेळच नाही. त्यांच्या पी. ए. साहेबांचे तसे पत्रच आले. मुंबईला जाऊन गाठ घ्यायचा प्रयत्न केला पण सबंध दिवस सचिवालयात बसूनही उपयोग झाला नाही. पी. ए. साहेब नुसते भेट देतो म्हणाले, पण शेवटी वाटाण्याच्या अक्षता. निराश होऊन परत आलो.

अर्थात पोलीस खात्यात माझे नाव बुद्धीपुरस्सर कळवण्याचा मोठेपणा या व्यक्तीने याआधीही केला होता. प्रसंग असा होता— महागाईविरोधी मोहिमेत श्रीमती मृणाल गोरे यायच्या होत्या. वास्तविक त्यावेळेपर्यंत त्यांना मी पाहिलेही नव्हते, की त्यांचे व्याख्यानही कधी ऐकले नव्हते. तसेच त्यांचा काय कार्यक्रम होता हे मला सुतराम माहिती असण्याचे कारणही नव्हते. परंतु त्या येण्याचे आधी मला पोलीस चौकीवर माझे घरगुती नावावर बोलावणे आले. मला त्यांचा संपूर्ण कार्यक्रम काय हे विचारले. मी आश्चर्याने थक्क झालो मग मला कळले की, हा या व्यक्तीचाच उपद्व्याप होता. आणि त्याहूनही आश्चर्याचा प्रकार म्हणजे प्रत्यक्ष भाषणाच्या वेळी यांचीच ओळख मृणालताईंशी जास्त दिसली. कारण हे निघाले पूर्वाश्रमीचे प्रजासमाजवादी. मग पहिला घरोबा एकदम कसा विसरता येईल ? याला म्हणतात राजकारण. अशा एक ना अनेक गोष्टी आहेत की, ज्यांची आज आठवणसुद्धा नको वाटते. याला पोलीशी भाषेत Fourth Measure नाव द्यावे असे वाटते.

परंतु शेवटी परमेश्वराच्या दरबारात 'देर है लेकीन अंधेर नही.' अचानक निवडणुका जाहीर झाल्या.जनता पक्षाची स्थापना झाली. काही पुढारी सुटले. आमच्या गावालाही जाग आली आणि या वेळी एकामागून एक तरुण जमा झाले. जागोजागी पोस्टर्स लागली, झेंडे आले, मलाही एक दिवस बोलावणे आले की, 'आज रात्री ८–३० वाजता अमुक अमुक ठिकाणी या. तेथे जनता पक्षाची मिटिंग आहे.' मी पण विचार केला आणि अखेर या निर्णयाप्रत आलो की, 'वाघ म्हटले तरी खातो आणि वाघोबा म्हटले तरी खातो मग वाघ्याच का म्हणू नये ?' मग मात्र सर्व सभांना नियमित हजर राहणे, मिरवणुकीत भाग घेणे, गावोगावी-खेडोपाडी फिरणे, प्रचार करणे इ. गोष्टी मनापासून केल्या. त्यावेळी गावातील अनुभव मोठे मजेदार होते. जनता पक्षाजवळ साधने कमी, पैसा नाही; काँग्रेसच्या मेटॅडोर्स, तर आमच्या सायकली. त्यांची पोस्टर्स भव्य—भपकेबाज, तर आमची चिटोरी. काँग्रेसच्या कार्यालयात गाद्या, तक्के, लोड, तर आमचे कार्यालय शेतकऱ्यांच्या घरात. धड बसायलाही जागा नाही. बैठकीत मुक्तपणे मिळायचे पाणी, पण जिद्द फार. बैठकीमध्ये चर्चा विनोद पण भांडणे नाहीत. शक्यतोवर रोज जमत, असू. उलट काँग्रेसच्या कार्यालयात सर्व मशारनिल्हेंचे सैन्य. त्यात निम्मे दारुडे, कार्यालयात पूर्णवेळ बसणारा अट्टल दारुडा, एकही चारित्र्यवान माणूस तेथे नव्हता. त्यांचे दुसरे एक पुढारी गेली ४० वर्षे काँग्रेसचे निष्ठेने काम करणारे माझ्या चांगल्या बैठकीतले. मी त्यांना विचारलेही की काहो, हा इसम तुम्ही येथे बसवून ठेवलात, याच्याकडे पाहून लोकांनी तुमच्या प्रचारात भाग घ्यायचा का ? वास्तविक हे चाळीस वर्षे काँग्रेसमध्ये म्हणून अधिकार यांचा पण हे पडले अल्पसंख्य जातीय. हे कसे चालतील ? त्या उलट परिस्थिती आमच्याकडे ! निवडणुका जाहीर झाल्यानंतर आमच्या गावात युवक काँग्रेसचीपण स्थापना झाल्याचे कळले. सभासद एकूण ३३; वय १६ ते ६० पर्यंतसुद्धा. एक मात्र बंधन कटाक्षाने पाळले गेले, ते म्हणजे सर्व एका विशिष्ट समाजाचेच लोक घेतले. जणू काही गावात त्या जमातीचे लोकच तेवढे तरुण, बाकी सर्व म्हातारे. त्यामुळे एकमात्र फायदा झाला. आधीच गावात त्यांचे वर्चस्व. लोक त्यांना कंटाळले होतेच. कारण त्यांच्यामुळे गावाची परिस्थिती तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी झाली होती. सभ्य भाषेत आणि अडाणी भाषेत 'ना हाक ना बोंब' झाली होतीच. कोणीही काँग्रेसकडे फिरकलेसुद्धा नाही.

जसजशी निवडणूक जवळ येऊ लागली तसतसा प्रचाराला जोर आला. आमच्या सभांना प्रचंड गर्दी, तर काँग्रेसच्या सभांना लोकांना बोलावून हात धरून बसवून ठेवावे लागत होते. बहुतांशी लोक हे ज्यांचे उदरनिर्वाहाचे साधन त्या पुढाऱ्याच्या हाती आहे असेच असत. आमच्या सभा २०-२५ झाल्या, तर काँग्रेसच्या मोजून तीन किंवा चार. परिणामी आमच्या सभांना गोंधळ माजवणे, वक्त्यांना प्रश्न विचारणे, सभा उधळून लावण्याचा प्रयत्न करणे, त्यांच्या मोटारीवर दगडफेक करणे इ. सर्व प्रकार त्यांनी केले. जिल्ह्याचे संघटना काँग्रेसचे एक पुढारी आले असताना त्यांच्या मोटारीवर दगडफेक केली गेली. तत्काळ मशारनिल्हे पुढारी, त्यांचे भाऊ वगैरे पुढे आले आणि वर मलमपट्टी सुरू केली. हा सर्वच प्रकार मला नवीन होता. राजकारणात चांगले लोक का जात नाहीत याचा मला चांगला अनुभव आला. गावातील इतर लोक हे काही वेळ बघ्याची भूमिका घेत, तर काही वेळा योग्य किंवा अनाहुत सल्लाही देत. माझ्या हितचिंतकांपैकी एका म्हाताऱ्याला मी म्हटले की, 'मी जनता पक्षाचा प्रचार करायचे ठरवले आहे.' तर ते म्हणाले, 'हे बघ आपण आहोत ब्राह्मण, तुला या गावाची माहिती नाही. तू 'जनताचा' प्रचार करू नकोस.' एका मित्राने तर मला सल्ला दिला की, 'आपण फक्त जो येईल त्याचे स्वागत करावे. आपल्याला काय करायचे ? कोणी का निवडून येईना.' प्रत्यक्षात मात्र तो प्रत्येक वेळी जिल्ह्याचे पालक मंत्री आले की, त्यांचा आदरसत्कार करी. त्यांना भेटायची एकही संधी तो दवडीत नसे. मशारनिल्हे पुढाऱ्यांचे वैयक्तिक डॉक्टर माझे मित्र. त्यांनी तर एक दिवस मला काँग्रेसच देशाचे कल्याण करील, तेव्हा मी काँग्रेसचाच प्रचार करावा

असा प्रेमळ सल्लाही दिला. त्यावर मी सुशिक्षित आहे, तेव्हा मला सांगू नकोस असा मुँहतोड जबाब दिला. प्रचार चालूच ठेवला. मशारनिल्हे पुढाऱ्यांचे भाऊ मला बोलवते झाले. 'का हो, हे कोणते निहाल करणार आहेत निवडून आले तरी ?' असे विचारते झाले. मी त्यांनाही योग्य उत्तर देऊन गप्प केले.

आम्ही बिल्ले लावून फिरू लागलो. माझ्या एका हितचिंतकाने मला विचारले, 'का हो तुम्ही उघडपणे बिल्ला लावून फिरता ? तुम्हाला या गावात राहायचे नाही वाटते ?' मी पण चिडलो. मी उत्तर दिले की, उद्या जर मी जनता पक्षाचा प्रचार केला म्हणून गाव सोडावे लागले, तर मी लगेच इस्टेटीचा एक वार, दोन वार, तीन वार करून शहरात जाईन. ' माझे उत्तर ऐकून तो सर्दच झाला असावा. त्याने मागाहून सारवासारव करायचा प्रयत्न केला. अर्थात त्याच्या हेतूविषयी मला शंका घेण्याचे कारण नव्हते. कदाचित त्याच्या मुखाने गावचे गुंडगिरीचे आजवरचे राजकारणही बोलत असावे.

इतक्यात एक दिवस बातमी आली, 'पोलिसांची यादी तयार झाली असून माझा त्यात १३ वा नंबर आहे. कोणी म्हणाले नाही दुसराच आहे.' नंबरात एकवाक्यता नसली तरी माझे नाव आहे, यात मात्र एकवाक्यता होती. म्हटले ठीक आहे. आता उखळात डोके तर घातले आहे. एक घाव बसेल किंवा दहा. अर्थात मनातून धास्ती होतीच. इतक्यात एका स्वयंसेवकाने घरात येऊन जनता पक्षाचा झेंडा गॅलरीत लावला. म्हटले चला आता आपण पक्के जनतावाले झालो. बोलो जय जनता.

निवडणूक प्रचाराचे वेळी खूप मजेदार अनुभव आले. आम्ही खेडोपाडी एक तत्त्व पाळले. जेथे आदल्या दिवशी काँग्रेसची सभा झाली असेल, तेथे लगेच दुसऱ्या दिवशी आमची सभा घेतली. लोकांना फारसे पटवून सांगावे लागले नाही. अगदी अडाणी समजल्या जाणाऱ्या बंजारी स्त्रियासुद्धा आम्ही 'नांगरालाच' मते देणार हे आपणहून सांगत होत्या, तर पुरुषवर्ग एकाधिकार कापूस, सक्तीची अल्पबचत, सक्तीची लेव्ही, अधिकारीवर्गाची अरेरावी, पुढाऱ्यांची मग्रूरी. इ. विविध कारणांमुळे पुरता वैतागला होता. त्यांना फारसे सांगावे लागलेच नाही. एका बंजारी तांड्याने तर त्यांना किती लांबून पिण्याचे पाणी आणावे लागते हे प्रत्यक्षच दाखवले.

महागाई हा तर ज्याच्या त्याच्या तोंडी विषय होता. सक्तीची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पण कोठे कोठे ऐकायला मिळाली. गेल्या पाच वर्षात आमचेकडे कोणी ढुंकूनही पाहिले नाही, हे तर प्रत्येकाचेच भरतवाक्य होते. एकाधिकार कापसाने तर सर्वांनाच चटके बसले होते. आपला माल असून आपणच चोर, पुन्हा भावही कमी हे सांगताना तर प्रत्येकाच्या तोंडातून त्वेषाचे अंगार फुलत होते. जनता पक्षाने या सर्व परिस्थितीचा उपयोग करून घेतला नसता, तर त्यांच्यासारखे मूर्ख तेच ठरले असते.

प्रत्यक्ष निवडणुकीचा दिवस उजाडला. आदले रात्री जमलेल्या कार्यकर्त्यांच्या उत्साहावरून तर आपण यशस्वी होऊ वाटत होतेच परंतु तरीही मतदान किती होईल हा प्रश्न होताच. मी त्या दिवशी सर्वत्र बिल्ला लावूनच फिरलो. काँग्रेसच्या बूथवर गर्दी – विशेषतः अल्पसंख्य लोकांची जास्त गर्दी– दिसली. मनात कोठेतरी पाल चुकचुकली. मला काही लोकांनी त्याचा अर्थही विचारला. पण मला त्यांच्या ( अल्पसंख्य ) पुढाऱ्याचे बोलणे आठवले. 'देखो हमे जो करना है वो बराबर करेंगे लेकीन दबानेसे हम तुम्हारे जैसे ओपन बिल्ला लगाके प्रचार नही कर सकते ' 'तुम कुछ फिकीर मत करो सब ठिक हो जायेगा ' हे शब्द आठवले. परंतु मनातून फार वाईट वाटले की, ज्या काँग्रेसने अव्याहत तीस वर्षे या देशात राज्य केले, ज्या स्व. जवाहरलाल नेहरूंमुळेच भारतात लोकशाही रुजली, त्या काँग्रेसच्या राजवटीत, त्या भारताच्या लाडक्या जवाहरलाल नेहरूंच्या कन्येच्या कारकीर्दीत लोकांना काय हे दिवस आले ? लोकांचे राजकीय स्वातंत्र्य कोठे गेले ? कधी हा गावगुंडीचा प्रकार संपणार ? या वातावरणातच निवडणुकीचा दिवस संपला आणि गुढीपाडवा आला. नवे वर्ष आले, निवडणुकीचा निकाल सुरू झाला आणि मन पुन्हा शंकित झाले. निकाल विरुद्ध गेला तर पुन्हा आणीबाणी येणार. पुन्हा ते अटकसत्र सुरू होईल. आपले नाव तर पोलीसात गेले आहेच. तेव्हा आपल्याला अटक होणार हे तर नक्कीच. नुसतीच अटक होईल का ? आपण तुरुंगात गेल्यावर आपल्या कुटुंबाचे रक्षण कोण करणार ? कदाचित गांधी वधोत्तर सूड उगवण्याचा प्रयत्न झाला तसा प्रकार तर आपल्या गावात होणार नाही ना ? आपण जनता पक्षाचा प्रचार केला यात आपले काही चुकले का ? मशारनिल्हे पुढारी आपला काटा काढायचा प्रयत्न करणार हे निश्चित होतेच. त्यांनी आपण संघाचे नसतानासुद्धा आपल्याविरुद्ध खोटा अर्ज तर करवला आहेच. त्याची चौकशी होईल का ? आपण आजपर्यंत राजकारणापासून अलग राहिलो होतो. मग याच वेळी आपल्याला ही बुद्धी का आठवावी ? ही 'विनाशकाले विपरीत बुद्धी' तर ठरणार नाही ना ? मध्यंतरी वर्तमानपत्रात मिसाखाली ज्यांना अटक झाली होती, त्यांच्या कथा वाचल्या होत्या. आपलाही तुरुंगात तसाच छळ होईल का ? राजकारण हे आपल्या प्रकृतीला, मनाला न मानवणारे आहे. राजकारण हा गुंडांचा धंदा आहे असे म्हटले जाते याचा प्रत्यय आपल्याला येणार का ? पुस्तकात आपण जे वाचले ते अनुभवावे लागणार. शेवटी मनाशी विचार केला आपल्यासारखे इतरही अनेक आहेत त्यांचे जे होईल तेच आपलेही होईल. आमच्यापैकी एकजण तर या काळात मुद्दाम गायवासराचा बिल्ला लावून फिरत होता, तो म्हणत असे 'उद्या मला कोणी मारायला आला तर कोणीही वाचवणार नाही. त्यापेक्षा हा बिल्ला लावलेला बरा.' मी त्याची टिंगल केली. पण माझी तरी परिस्थिती दुसरी काय होती ? रात्री स्वस्थ झोप नव्हती आणि मनाला स्वस्थताही नव्हती. एकापाठोपाठ एक निकाल आले तसे मनावरचे दडपण हळूहळू कमी होऊ लागले. आमचा उमेदवार निवडून आल्याचे जाहीर झाले. लोकांनी मग प्रश्न सुरू केले. काही पान टपरीवाल्यांनी मुद्दाम विचारले, 'काहो साहेब जनता पक्ष विजयी झाला ना ? मग पेढे काढा'. मी म्हटले, 'अरे जनता पक्ष विजयी झाला म्हणून तर मी तुम्हाला हा असा बाहेर दिसत आहे, नाहीतर आमचाही नंबर लागलाच असता.' त्याने पण 'काय म्हणता साहेब' असे हसून उत्तर दिले पण त्यालाही माहीत होतेच, की या गावात जिथे हे मशारनिल्हे पुढारी आहेत तिथे नेमके हेच घडले असते. कारण तो माझ्याहीपेक्षा गावात जुना होता. त्याला हा सर्व प्रकार तोंडपाठ होता.

हे सर्व लिहिण्याचे कारण काय ? कारण एकच. पुण्या–मुंबईच्या लोकांना जनता पक्ष खेड्यात विजयी झाला तो कसा ? लोकांना, विशेषतः खेड्यात काय अडचणी आहेत ? हे कधी समजणार नाही. आज आपल्या देशात सहा निवडणुका झाल्या. पण लोकांना, विशेषतः खेड्यातल्या लोकांना, स्वातंत्र्यानंतर काय मिळाले ? राजकीय स्वातंत्र्य म्हणजे काय ? लोकांनी मतदान कशासाठी करायचे ? या आणि असंख्य अशाच प्रश्नांची जाणीव व्हावी हाच उद्देश आहे. नुसते म. गांधी म्हणत होते खेड्यात चला असे सांगून, आपण मात्र शहरात राहून चैन करायची असे होऊ नये, हीच इच्छा ! त्या निमित्ताने एक सत्य मात्र उघड झाले की, जेव्हा खेडी स्वतंत्र होतील तेव्हाच भारत स्वतंत्र होईल. हेही नसे थोडके ! □

'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी, १९४८–४९' या पहिल्याच पुस्तकानें ख्यातनाम झालेले श्री. पु. ल. इनामदार यांनी आपल्या प्रदीर्घ वकिली व्यवसायाच्या अनुभवांतून वेचलेली ही आणखी एक सत्यकथा.

त्यांची पहिली कथा 'कायदा आंधळा असतो', 'माणूस' ९ ऑक्टोबर १९७६ अंकात प्रसिद्ध झाल्याचे वाचकांना आठवत असेलच.

उत्तर भारतात सर्वत्र जमीनदारी नाहीशी झाली असली तरी 'जमीनदारी मन' अजून बदललेले नाही. हे मन कसे आहे ?

# कल्याणसिंग

उजव्या बाजूच्या बोटावर दिसणारी थुंकीची ओली डाव्या बाजूच्या बोटावर गेलेली दाखविण्याचा खेळ मुले आपसात खेळतात. त्यांच्यातलाच एखादा डोळस मुलगा असल्या दृकभ्रमाने बुचकळ्यात न पडता, सारख्या दिसणाऱ्या तर्जनी नि अनामिकेमधला फरक लक्षात घेऊन खरे काय झाले आहे ते स्पष्ट करून सांगतो. तर्जनी किंवा अनामिकेवरचा एखादा ओळखता येण्यासारखा तीळ किंवा इतर काही डाग लक्षात ठेवून सत्य काय आहे ते सिद्ध करून दाखवतो. न्यायालयांमधूनसुद्धा सत्य सिद्ध करून दाखवायला किंवा असत्य उघडे करायला वकिलालाही अशीच डोळस दृष्टी ठेवावी लागते. वरवरणी सारख्या दिसणाऱ्या गोष्टींनाच महत्त्व देऊन एखादा असत्यालाच सत्याचे रूप देऊ लागला तर, प्रतिपक्षाला सगळ्या बारीकसारीक गोष्टींचा तपशील नीट लक्षात ठेवून सतर्क राहावे लागते व असत्याचा पाठपुरावा हिरीरीने करू पाहणाऱ्या पक्षाला, वेळ पाहून कोंडीत गाठावे लागते नि असत्य उघडे करून दाखवावे लागते. यासाठी नेहमी समयसूचकता आणि सतर्क संयम यांचा योग्य तोल सांभाळावा लागतो. अशा कामात उतावीळपणा करून चालत नाही. एरवी योजलेले डाव किंवा केलेले प्रयत्न फुकट गेलेले पाहावे लागतें व त्याचा फायदा प्रतिपक्षी घेतो. अशाच एका घटिताबद्दल ही गोष्ट आहे.

आशी बुंदेलखंडाच्या उत्तरेकडच्या भागात व चंबळ नदीच्या दक्षिणेकडील खोऱ्यात पसरलेल्या शिंदे सरकारच्या संस्थानातला बराचसा प्रदेश आहे. या प्रदेशात आधिक्याने ठाकूर लोकांची वस्ती आहे ठाकूर लोकांच्या पुष्कळ जाती आहेत. अगदी मारवाडातल्या सूर्यवंशीय, चंद्रवंशीय, सिसोदिया ठाकुरांच्या उच्चवर्णीय जातीपासून ते यादव-गवळी वंशाच्या गुजर ठाकुरांपर्यंतच्या जातीचे ठाकूर लोक असतात. वर वर्णन केलेल्या चंबळ नदीच्या दक्षिणेकडील खोऱ्यातले नि वेतवा नदी व बुंदेलखंडामधल्या दाट जंगलामधल्या प्रदेशातले गुजर ठाकूर लोक, मुळातून गवळी जातीतले शेतकरी, परंतु शिपाईगिरीचा व्यवसायही करणारे. हे 'गवालियें' ठाकूर म्हणून ओळखले जातात. गवालियें म्हणजे गवळी. ह्या गवळी शेतकरी लोकांचा हा शिपाईगिरीचा व्यवसाय गेल्या पाच-सहा शतकांपासून चालत आलेला आहे. हे गवालिये ठाकूर म्हणजे शरीराने शेती करणारे नि दुभत्या जनावरांची खिल्लारे बाळगणारे कष्टाळू शेतकरी. परंतु उच्चवर्णीयांच्या खानदानी कुटुंबाची संस्कृति-संयमाची वृत्ती नसलेले, म्हणून माथेफिरू शिपाई असे यांचे वर्णन करायला हरकत नाही. हे सामान्यतः गुजर ठाकूर म्हणून म्हणवतात. मोगलांच्याही पूर्वीच्या म्हणजे आठव्या–नवव्या शतकातला या भागातला राजा मानसिंग हा या गुजर ठाकुरांपैकीच होता. ग्वाल्हेरचा किल्ला म्हणजे गवालिये–गवळी जातीच्या राजाचा किल्ला होता व त्या किल्ल्यावर आजही राजा मानसिंगाचा महाल त्याच्या राण्यांचा गुजरी महाल, त्यांच्यातल्या सास-बहुचे महाल म्हणजे सासवा-सुनांचे महाल, अशा प्रेक्षणीय वास्तू आजही त्या किल्ल्यावर पाहायला मिळतात. ही गुजर मंडळी हाडाने गवळी शेतकरी, परंतु गेल्या ५-६ शतकांमधून शिपायीगिरीचाही व्यवसाय पत्करलेले अशा हाडा पेरा मनाचे निर्मळ लोक आहेत. या गुजर लोकांच्या नावांचेच काही नमुने सांगितले म्हणजे यांच्या हाडा-पेरा-मनाचे वास्तविक दर्शन आपणाला मिळू शकते ह्या लोकांची नावे त्यांचा पूर्वेतिहास बोलक्या शब्दांनी सांगतात. एकीकडे माधोसिंग, किशनसिंग, मोहरसिंग, मोहनसिंग, कल्याणसिंग, उधोसिंग, बिहारीसिंग, अशा नावांनी यादवकुलाचा वारसा सांगणारे; दुसरीकडे मानसिंग, महाराजसिंग, उमरावसिंग, दीवाणसिंग, सुभेदारसिंग, तहसीलदारसिंग, हाकिमसिंग, हुकूमसिंग, बालिस्टरसिंग इत्यादी नावांमधून आठव्या–नवव्या शतकातल्या राजा मानसिंगापासून ते एकोणिसाव्या शतकांपर्यंतच्या इंग्रजी शासनव्यवस्थेचे चित्रपट दाखवणारे, आणि जरनेलसिंग (म्हणजे जनरल श्रेणी), कर्नेलसिंग (म्हणजे कर्नल श्रेणी), कप्तानसिंग (म्हणजे कॅप्टन श्रेणी), जमादारसिंग, सिपाहीसिंग ही सैनिकी नावे आहेत. तसेच मजबूतसिंग, जोरावरसिंग, डोंगरसिंग, पहाडसिंग, बटरेसिंग, गब्बरसिंग, हिंमतसिंग या नावांनी आपल्या हाडा-पेरांची शक्ती व हिम्मतही सांगणारी त्यांची नावे आहेत. यांपैकी काही नावांनी चंबळ खोऱ्यातला किंवा बुंदेलखंडी जंगलातली डाकू मंडळीही प्रसिद्ध झालेली आहेत! या प्रदेशामधले काही ब्राह्मण जातीचे लोकही पिढ्या न् पिढ्या गुजर-

ठाकूर लोकात राहिले, वावरलेले, म्हणून त्यांचीही नावे मनोहरसिंग, मुर्लीसिंग, माधवसिंग, परमेश्वरीसिंग, नारायणसिंग, सूरजसिंग, हरिसिंग अशी आहेत व ही मंडळी 'दंडोतिये' ब्राह्मण म्हणून म्हणवतात !

या लोकांच्या शेतीवाडीची शासनव्यवस्था सम्राट अकबराच्या दरबारातल्या राजा तोडरमलाने घालून दिलेल्या जमीनदारी पद्धतीची होती. ( मी 'होती' यासाठी म्हणतो की, १९५० मध्ये ही जमीनदारी पद्धत कायद्याने समाप्त करण्यात येऊन भूमिस्वामी व काश्तकारी पद्धतीची शासनव्यवस्था झाली आहे.) जमीनदारी पद्धतीप्रमाणे राजाकडून गावा-खेडयातल्या शेतीजमिनीचा शेतसारा वसूल करायला त्या गावा-खेडयातलेच लोक–धनवान व प्रतिष्ठित लोक जमीनदार म्हणून असत. यांपैकी अधिकतः गुजर-ठाकूर मंडळीच जमीनदार असत. काही ब्राह्मण-मंडळीही असत. शेतकऱ्यांपासून शेतसारा वसूल करून ४०-६० किंवा ४५-५५ टक्केवारीने मोठा हिस्सा सरकारी खजिन्यात जमा करायचा (म्हणून हे जमीनदार) नि कमी हिस्सा स्वतःची मिळकत म्हणून ठेवायचा अशा पद्धतीची होती. त्यामुळेच गावचा जमीनदार हा त्या पंचक्रोशीतला राजाचा प्रतिनिधी म्हणजे स्थानिय राजाच असे. राजाच्या वृत्तीनेच वागत असे जमीनदारीच्या वाटण्या होऊ शकत नि त्यांचे आणे-पै हिश्श्याचे वाटेकरी असायचे. जमीनदार गाव विकले जाऊ शकत असे व गहाणवटसुद्धा होई. अशा हिस्सेवाटणीमध्ये सामान्यतः मोठ्या हिश्श्याचा वाटेकरी जमीनदार म्हणवायचा. ही जमीनदार व काश्तकार-शेतकरी मंडळी शिपाईगिरी करणाऱ्यांपैकीच असल्याने ही शरीरावरच्या कपडयालत्त्यांबरोबरच हातात पोलादाचे बेट लावलेली काखेच्या उंचीची लाठी वागवीत व कोणी कमरेला बरछी, हातात तलवार किंवा खांद्यावर दुनाली किंवा एकनाली बंदूकही वागवणारे असत. (अजून हे सर्व चालूच आहे.) या मंडळींमध्ये मानापमानाच्या एवढ्या तेवढ्या प्रश्नावरून ते शेतीवाडीच्या लहान लहान तुकड्यांपर्यंत मार्मेफिरूपणाने भांडणे दिवस-रात्र चाललेली असतात व अशा प्रश्नांवरून सुरू झालेल्या वादावादीमध्ये 'लाठी चल गयी', 'दस बारह लोगोंका सिर फूट गया', 'ढेर लहू बह गया', 'बंदूक फायर हो गया', 'दो लाशें बिछ गयी', या घटना नित्याच्या असतात. हेच मराठी भाषेत सांगायचे म्हणजे 'हाणमार झाली', 'दहा-बारा लोकांची डोकी फुटली', 'रक्ताचे पाट वाहिले', 'बंदुकीचे बार झाले', 'दोन माणसे जिवानिशी कोसळली', असे नेहमी होत असायचे. प्रत्येक गावा-खेडयामधून या घटना झालेल्या असायच्या. कुठे न कुठे होत असायच्या.

अशाच गुजर ठाकूर मंडळींच्या वस्तीचे एक गाव ग्वाल्हेर शहरातल्या उत्तरेकडल्या लष्करी छावणीपासून (मुरार कॅन्टोन्मेंटपासून) पाच-सहा मैलांवर पक्क्या सडकेच्या पश्चिमेकडे जवळच दोन-तीन मैलांच्या अंतरावर सडकेशी समांतर वाहणाऱ्या बारमाही ओहोळाच्या–पासवाली नदीच्या पलीकडे असणाऱ्या पासवाल्या टेकाडावर वसलेले एक ५०-६० घरांचे खेडे आहे. त्या गावाचे नावही 'पासवाले खेडे' अशा अर्थाचे आहे. मराठीत 'जवळवाडी 'च म्हणू या. पक्क्या सडकेपासून गावापर्यंतचा रस्ता पक्का नाही, कच्चाच आहे. जवळी नदी उतरून वरच्या अंगाला जायला एक निचसा पूल बांधलेला. नदीला चार फुटांचे पाणी चढताच गावाचा पक्क्या सडकेशी संबंध चार-चार, पाच-पाच दिवस न ठेवू देणारा असा होता. गावात अधिकतर घरे गुजर ठाकुरांचीच. आसपासची शेती, जवळी नदीच्या काठची, हळद, मिरचीपासून गहू, मका, मटार, तंबाखूही पिकवणारी. गावात गुजर मंडळींशिवाय चरणतीर्थ घेण्यासाठी दोन-तीन पंडितजी, तर चार-आठ दिवसांनी दाढी कलम करून घेण्यासाठी दोन-तीन न्हाव्यांची घरे. दोन-चार कारकुनी कलमांच्या कायस्थ पटवाऱ्यांची (तलाठ्यांची) घरे नि कुंभार, चांभार, महार, मेहेतर अशी १५-२० बलुतेदार मंडळी. गावच्या जमीनदारीमध्ये मोठ्या पातीचे हिस्सेदार जमीनदारीची व्यवस्था पाहात. लहान पातीची, आणे-पै हिश्याची आठ-दहा घरे होती. त्यांची वस्ती जमीनदाराच्या वाडयापासून फर्लांगभर दूर पूर्वेकडल्या उतारावरच होती. गावकऱ्यांची शेतीवाडी अधिकतर पूर्वेच्याच उतारावर नदीपर्यंत पोचणारी पसरलेली होती. या जवळगावचे पूर्वीचे जमीनदार महाराजसिंग 'भला माणूस' होते. ते होते तोवर गावात आबादीआबाद होती व गाव भरभराटीला आले होते. महाराजसिंगाचा मृत्यू वृद्धापकाळानेच झाला होता व त्यांच्या वारसामध्ये त्यांचा मुलगा कप्तानसिंग याचे नाव जमीनदार म्हणून कागदोपत्री लागले होते. हे कप्तानसिंग महाशय वयाने ३०-३५ वर्षांचे. लहानपणापासून लाडावलेले, म्हणून चढेल वृत्तीचे होते नि स्वतःच्या श्रीमंती, अधिकार आणि प्रतिष्ठा याच्या भरवशावर मस्तवाल वृत्तीने वागत होते. नेहमी खांद्यावर दुनाली बंदूक घेऊन व गळयात काडतुसाची माळ घालून फिरत असायचे. लहान पातीमध्ये जी आठ दहा घरे होती त्यांतले सर्वांत मोठे घर कल्याणसिंगाचे. हा ४५-५० वर्षे वयाचा, वृत्तीने मायाळू, पण कुलप्रतिष्ठेच्या नावाने उसळून वागणारा होता. त्याच्या मायाळूपणाच्या छत्राखाली लहान पातीची आठ-दहा घरे एकजुटीने वागत व कल्याणसिंगाची परोपरीने अदब ठेवीत. शहरी वातावरणाची चटक लागलेली मुलेही 'कल्याणसिंगबाबा 'समोर विडी प्यायची नाहीत, की त्याने 'बैठो !' म्हटल्याशिवाय बसायची नाहीत. बाबा समोर येताना डोक्याला फेटा बांधलेला नसला तर, चटकन खांद्यावरचा टॉवेलच डोक्यावर ठेवून उभे राहायचे. अशी अदब ठेवून घेणारा कल्याणसिंग मोठ्या पातीच्या जमीनदार कप्तानसिंगाच्या चढेल व 'बदतमीज' (बेमुर्वतखोर) वागणुकीने नेहमी कसा पेटत असेल हे सांगायला नको.

आणि कल्याणसिंगाला पेटवायला कारणही कप्तानसिंगाने उकरून काढले होते. लहान पातीच्या वस्तीमध्ये कल्याणसिंगाच्या घराला लागूनच दीड बिघे जमिनीचा उंचसखल तुकडा होता. एकरांच्या मोजणीत पाऊण एकराचा. ही जमीन लहान पातीच्या घरातली गुरे बांधण्यासाठी, गुरांचे शेणगळाठा रचून ठेवण्यासाठी, गाड्या व शेतीची औते ठेवण्यासाठी वापरली जाई. या तुकड्याच्या खालच्या अंगालाच नदीची उताराची बाजू होती व या जमिनीवरूनच लहान पातीची माणसे आपापली गुरे घेऊन आपापल्या शेतांकडे जात-येत असत. लहान पातीची शेती जमीनदार कप्तानसिंगाच्या तुलनेने लहानच होती व गुरेही मोजकीच होती. त्यामुळे या दीड बिघे जमिनीचा बराचसा भाग मोकळा, स्वच्छ ठेवलेल्या अंगणा-

सारखा वापरला जात असे. तरी सगळी जमीन गुजरी भाषेत 'गोंडा' म्हणून–म्हणजे गोठा म्हणून ओळखली जाई व वापरली जाई 'पूर्वीच्या जमीनदार महाराजसिंगाच्या काळात कल्याणसिंगाचे व महाराजसिंगाचे संबंध पृथकतेचे असले तरी समजूतदारपणाचे होते व ही गोठ्याची जमीन लहान पातीची असल्याबद्दल काही वाद नव्हता. पण महाराजसिंग मरून गेल्यावर नव्या जमीनदाराने त्या गोंड्याच्या उपयोगा–वापराबद्दल वाद उभा केला. आरंभाला कप्तानसिंगाने असे म्हणून पाहिले की, 'मला माझ्या शेतीकडे जायला या जमिनीवरून वाट ठेवण्याचा अधिकार आहे.' ह्या बोलण्याकडे कोणी लक्ष देत नाहीसे पाहून, काही दिवसांनी 'माझी गुरेही या जमिनीवर बांधण्याचा मला अधिकार आहे.' असे म्हणायला कप्तानसिंगाने सुरुवात केली. घटनाचक्राच्या वर्तमानकाळात तर त्याने 'हा गोंडा माझ्याच मालकीचा आहे. त्यातली सारी मोकळी जमीन–म्हणजे अर्ध्याहून जास्त जमीन–माझी एकट्याची आहे. त्या जमिनीवर मी कुणाला काही करू देणार नाही.' असेच म्हणायला आरंभ केला होता. खरे म्हटले तर, या गोंड्याच्या नदीकडल्या उताराची, म्हणजे पूर्वेकडची बाजू सोडून बाकी तिन्ही बाजूला लहान पातीचीच घरे होती. या आठ-दहा घरांच्या बैलगाड्या आणण्या–नेण्यासाठी म्हणून गावातल्या मुख्य सार्वजनिक रस्त्यावरून वाट होती व त्यासाठी सार्वजनिक रस्त्यापासून या जमिनीवर यायला घरगुती वाटही ठेवली होती. ही वाट अर्थातच सार्वजनिक नव्हती. केवळ लहान पातीच्या आठ-दहा घरांच्या वापरासाठीच होती. लहान पातीची माणसे आपापली गुरे सुटी सुटी घेऊन नदीच्या उताराच्या बाजूने उतरून आपापल्या शेतीकडे जात. पण गाड्या नेण्या-आणण्याकरता सार्वजनिक रस्त्याचाच वापर करीत व त्यासाठी आपल्या गोंड्यापासून सार्वजनिक रस्त्यावर आपल्या वाटेने जात. जमीनदार कप्तानसिंगाचे घर सार्वजनिक रस्त्यावरच होते. म्हणून काही लहान पातीच्या गोंड्यावर येऊन व तेथून नदीच्या उतारावर उतरून आपल्या शेतीवाडीकडे जाण्याची, किंवा आपली गुरे नेण्याची, किंवा आपली गुरे व गाड्या-ओते इत्यादी या गाड्याच्या जमिनीवर बांधण्याची किंवा ठेवण्याची कप्तानसिंगाला काही आवश्यकता नव्हती. काही अधिकारही नव्हता. अशा अधिकाराचा पूर्वाचारही नव्हता. गावची जमीन म्हणून या जमिनीचा उल्लेख शासकीय कागदोपत्री कुणाच्या नावे नसला म्हणून काही लहान पातीच्याच घरांनी वेढलेली, लहान पातीच्या आधिपत्यात व वापरात असलेली जमीन वा तिचा कोणताही भाग मोठ्या पातीच्या जमीनदाराच्या मालकीचा आहे असे म्हणायला काही आधार नव्हता. तरी सुद्धा कप्तानसिंगाने त्याबद्दल वादावादी आरंभ केली होती. खरे म्हणजे गावच्या जमिनीचा वापर हक्काने ताबा मागायला रीतसर दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणे योग्य व विधिसंमत झाले असते. पण मग अंगातले गुजरी रक्त व शरीरातली जमीनदारी मस्ती कशी शमणार ? कशी जिरणार ? कप्तानसिंगाने या विषयात जुलूम-जबरदस्ती करून गोंड्याचा कबजा घेण्याच्या योजनेचे धागेदोरे जुळवायला सुरुवात केली. अशा जुलूम-जबरदस्तीच्या योजनावस्त्राचे उभे दोरे म्हणजे पुलीस यंत्रणा पुलीसांच्या मदतीचा लांब हात मिळाल्याशिवाय योजनेचा माग कसा उभा राहणार ? त्यासाठी कप्तानसिंगाने त्या भागातल्या पुलीस-चौकीच्या शिपायांना–ठाण्याच्या दरोगाजींना–सबइन्स्पेक्टरसाहेबांना आपल्या कह्यात करून घेण्याचे ठरविले व त्यासाठी ठाणेदाराकडे जाणे–येणे सुरू केले. अशा योजनेचे आडवे दोरे म्हणजे आपली, आपल्या कच्छपी लागलेली मंडळी. आणि अशा उभ्या–आडव्या दोऱ्यांचा योजनेचा माग उभा राहिला म्हणजे त्या वस्त्राची कला-कुसर सजवण्याकरिता म्हणून एखाद्या चांगल्या फौजदारी वकिलाचा सल्ला घेण्याचेही ठाणेदाराच्या सल्ल्यानुसार ठरविले. ठाणेदारसाहेबांनी कोणत्या वकिलाचे नाव सुचवावे ?

या ठिकाणी गोष्टीशी वरकरणी विशेष संबंध नसलेली, परंतु कथाकाळातल्या त्यावेळच्या संस्थानी न्यायालयांतून फौजदारी प्रकरणांतून वारंवार त्रासदायक सिद्ध होणारी परिस्थिती ही सांगायला हवी. ती थोडक्यातच सांगतो. अशी परिस्थिती महाराष्ट्रातल्या न्यायालयांतून होती की नाही, सध्याही आहे की नाही, याची मला मुळीच माहिती नाही. म्हणून या गोष्टीमधली परिस्थिती महाराष्ट्रातल्या माजी व आजी फौजदारी न्यायालयांबद्दल किंवा वकिलांबद्दल अवहेलनात्मक आहे किंवा अपमानास्पद आहे असे कोणी समजू नये. कारण माझा तसा किंचिन्मात्र हेतू नाही. मी सांगत असलेली परिस्थिती हिंदी–देशी संस्थाने स्वतंत्र भारतीय गणराज्यात विलीन होण्यापूर्वी असलेल्या संस्थानी वातावरणातली आहे, व तेवढ्यापुरतीच समजावी. संस्थानच्या स्वर्गीय पूज्यपाद महाराजांच्या कारकीर्दीतले एक बंगाली विश्वासपात्र व सज्जन अधिकारी होते. त्यांचे चिरंजीव 'बडे बापके बेटे' म्हणून वडिलांच्या हयातीतच सरकारी नोकरीत मिश्रश्रेणी अधिकारी म्हणून चिकटवून दिले गेले होते. कथाकाळाच्या जमान्यात पूज्यपाद मोठे महाराज व त्यांचे विश्वासपात्र बंगाली अधिकारी दोघेही स्वर्गस्थ झाले होते व गादीवर आलेल्या अज्ञानदशेतल्या महाराजांच्या वयात येईतोवर जे रिजन्सी कौन्सल नेमले जाऊन त्यांची कारकीर्द चालू होती त्या काळात बरेचसे 'मुजरानबाज' खुशमस्करी लोक या न त्या कथित 'खानदानी' हवाल्याच्या शिफारशीवर, उच्चपदाच्या अधिकारावर पोचले होते. त्यातच वर वर्णन केलेले 'बडे बाप के बंगाली बेटे' ही होते. नि ते स्वतः बऱ्यापैकी अधिकाराची जागा सांभाळून होते. त्यांच्या जवळ राहून शिक्षण घेणारा त्यांचा एक भाचा होता. हे भाचेबाबू पुरते बंगाली बाबू होते ! हे मामाच्या देखरेखीखाली स्थानिक कॉलेजातून इंग्लिश विषय घेऊन बी. ए. झाले व पुढे आग्रा युनिव्हर्सिटीची एलएल. बी. परीक्षाही पास झाले होते. हे भाचेबुवा आपली ठेंगणीशी मूर्ती ढिल्या कासोट्याच्या धोतरात 'अंगातल्या बंगाली कुडत्यावर बंगाली पद्धतीने शाल किंवा चादर गुंडाळलेल्या वेषातही आपल्या 'हायर इंग्लिश' विद्येचा ऐट मिरवीत आपलीही उंची उंच करीत असल्याच्या आविर्भावाने रस्त्यांतून फिरायचे. कायद्याची भाषाही शेक्सपीअरच्या नाटकांतील उदाहरणे देत, तोंडाचा चंबू करून, रसोगुल्ला तोंडात धरून बोलल्यासारख्या आवाजाने, इंग्रजी शब्दांचा बंगाली उच्चार करीत. एवढेच काय, स्थानिक राज्यभाषा हिंदीही त्याच थाटाने बोलत. जंगलातल्या 'ज'चा उच्चार करीत, 'हॉजूर! ऑप गॉरीब परवर हॉय. इग्लैंडके शेक्स्पीयॉरने ऑपने ऑंग्रेजी ड्रॉमामे लिखा हॉय कि 'लॉज डोले...' वगैरे. त्यांच्या बोलण्याचा हा नमुना देण्याचे कारण असे की, भाचे-

बाबू एल्‌एल्‌ बी. होताच पुरस्कार मामूजींनी भाचेबाबूंना वकिलीची सनद काढून दिली व ते बाररूममधे येऊ लागले. पण बाररूमधेही नवीन वकिलाने कसे यावे, काय बोलावे याचे शिक्षण पुरे होण्याच्या आतच म्हणजे वर्षा दीड वर्षातच त्यांची नियुक्ती पुलीस विभागामधे पुलीस प्रॉसिक्युटरच्या जागेवर 'मामूजींच्या' वशिल्याने झाली होती. भाचेबाबूंनी आठ-दहा वर्षे पुलीस खात्याचे प्रॉसिक्युटर म्हणून न्यायालयांतून काम करण्याचा अनुभव मिळवला. पण तेवढ्या अनुभवाची पुंजी घेऊन त्यांनी प्रॉसिक्युटरीचा राजीनामा दिला व बाररूममधे फौजदारी वकिली करायला म्हणून येऊ लागले होते. पुलीस खात्यामधे आठ-दहा वर्षे काम करून त्या भागात काम केलेल्या अनेक ठाणेदारांचे ते मित्र झाले होते व ठाणेदारांच्या कार्यकलापामध्येही आपल्या इंग्रजी नाटकातल्या माहितीची विद्या पाजळत ते आपल्या कामामधे पूर्ण नाटकी देखाव्याने वकिलाचे काम करायला शिकले होते. पुलीस फौजदारांची दाट ओळख व वागण्याचा बंगाली बम्बॉस्ट! 'सोन्याला सुगंध' पैकी प्रकार होऊन हे भाचेबाबू फौजदारी वकील म्हणूनही लवकरच नावारूपाला याला लागले व भाचेबाबूंचा प्रभाव त्या क्षेत्रातल्या लाठी-तलवारीची भाषा व कृती करणाऱ्या गुजर ठाकुरांमधे पसरायला वेळ लागला नाही! 'यह उकील कितना होशियार, चालाक है! हाकिमको (मॅजिस्ट्रेटको) कलम पकड़ लेता है! क्या लढता है हमारा उकील! सामनेवाले उकील को नंगा कर देता है!' अशा शब्दात गुजर ठाकूर वस्तीप्रधान खेड्यापाड्यांतून भाचेबाबूंचा फौजदारी वकील म्हणून बोलबाला व्हायला लागला नि त्यांची फौजदारी वकिली जोरात फोफावायला लागली होती. 'लाठी चल गई! सात सिर फूट गये! दो लाशे बिछ गई!' च्या सेशन्स केसेसमधे हे बंगाली भाचेबाबू ठाणेदारांच्या माहितीचा फायदा घेऊन जबर फी देऊ शकणाऱ्या जमीनदारांच्या वतीने वकील असलेले दिसू लागले होते. कारण ही जमीनदार मंडळी खेड्यापाड्यांतल्या भांडणामधे कोर्टात कधी अभियोगी–फिर्यादी म्हणून किंवा कधी अभियुक्त–मुलजिम–एक्यूज्ड म्हणून स्वतःच असणे किंवा जमीनदारांचे कोणी जवळचे आप्तमित्र असणे क्रमप्राप्त असायचे. बांगला बाबूच्या स्टीम रोलर थाटाच्या वकिलीपुढे मॅजिस्ट्रेट श्रेणीचे गिट्टी खडे मुरुम केव्हाच दबून जायचे. एखाद्या निष्पक्ष नि निडर सेशन्स जजचा खोडा वगळता साधेसुधे सेशन्स जजही विचारे गप्प बसायचे. तात्पर्य एवढेच की, बंगाली भाचेबाबूंची फौजदारी वकील म्हणून ख्याती जिकडे तिकडे पसरलेली असल्याचे ते दिवस होते व जवळवाडीच्या कप्तानसिंग जमीनदाराचे व या बंगालीबाबूंचे 'हमारे खास उकील–खास मुवक्किल' (वकील–अशील) म्हणून नाते जुळले होते व त्यामुळेच जवळवाडीच्या गोंडा प्रकरणात कप्तानसिंगाने ठाणेदाराच्या मदतीबरोबरच बंगाली उकिलाच्या सल्ल्याने आपला गोंड्याचा कब्जा जबरदस्तीने करण्याचा योजनेचा भाग उभा केला असावा व त्याकरिता सुरुवातीपासूनच जवळवाडीच्या प्रकरणामधे हे भाचेबाबू अभियोगपक्षाकडून म्हणजे फिर्यादी पक्षाकडून वकील असल्याचे पुढे दिसले होते. या भाचेबाबूंचा खरोखरीच ठाणेदाराला अगोदरपासून काही सल्ला दिला होताच असे माझे म्हणणे नाही. कारण स्वतः ठाणेदार मंडळीच यासंबंधात माहीतगार अनुभवी असतात.

परंतु जवळवाडीच्या खुनाच्या प्रकरणाची जी घटना कथा पुलिसांकडून कोर्टात आली, तीवरून ठाणेदाराच्या अक्कलहुशारीचे उभे दोरे, कप्तानसिंगाच्या बाजूच्या साक्षीदारांचे आडवे दोरे नि वकिली सल्ल्याची सजावट केव्हापासून व किती प्रकारची झाली असेल हा ज्याच्या त्याच्या तर्काचा विषय होता. न्यायालयामध्ये पुलीस–अभियोगी पक्षातर्फे उभा राहिलेला वकील बेफिकीरीने, बेजबाबदारीने वागत असलेला दिसला म्हणजे दोन प्रकारचे तर्क संभवतात: एक तर, त्या वकीलसाहेबांचा ठाणेदाराच्या अक्कलहुशारीवर फाजील विश्वास असावा. किंवा स्वतःच्या वकिली विद्येचा नि कर्तृत्वाचा त्यांना ज्वलन्त अभिमान असावा. असो.

पुलिसांकरवी आरोपपत्रामधे–चार्जशीटमधे वर्णिलेली घटना अशी होती:–घटनेच्या दिवशी दुपारपासूनच 'आज गोंड्याच्या मालकीबद्दल कल्याणसिंगाची पार्टी काही तरी दंगा-फिसाद करणार,' असा कप्तानसिंगाला संशय आला होता. कारण दुपारी कप्तानसिंगाने काटेरी तारांची दोन बंडले व लाकडाचे दहाबारा खांब वादग्रस्त गोंड्याच्या जागेवर ठेवायला पाठवले होते. काळजी घ्यायची म्हणून कप्तानसिंगाने संध्याकाळी सात वाजताच ठाण्यावर मनुष्य पाठवून, 'दंगा–झगडा होण्याची भीती आहे. रात्री कल्याणसिंग आणि पार्टी कप्तानसिंग आणि पार्टीला मारपीट करणार आहेत, असे वाटते. तरी तातडीने मदत घेऊन जवळवाडीला यावे, असा रिपोर्ट पाठवला होता. व त्याप्रमाणे ठाणेदारसाहेब पाच बंदूकधारी पुलीस शिपाई घेऊन जवळवाडीजवळच्या पक्क्या रस्त्यावर असलेल्या चौकीवर पोचले होते. तेथून अंधार पडल्यावर जरा उशीरानेच जवळवाडीला जायला निघाले. गावात संध्याकाळची डाळरोटी खाऊन कप्तानसिंग व त्याचे चार साथीदार म्हणजे एक न्हावी, दोन जाधव (महार) व एक कायस्थ कारकून कप्तानसिंगाच्या वाड्यासमोरच्या तीन फूट उंचीच्या चबुतऱ्यावर वाड्याच्या दर्शनी दाराजवळच हुक्का–चिलीम पीत बसले होते. त्यांची ही बैठक रात्री नऊ वाजेपर्यंत चालली होती. नऊ वाजल्यानंतर कल्याणसिंग आणि त्याचे तीन भाऊ, एक मुलगा, चार पुतणे व एक नोकर लाठ्या व एक बंदूक घेऊन कप्तानसिंगाच्या वाड्याकडे आले व तेथे या दहा लोकांनी चबुतऱ्यावर चढून येऊन, कप्तानसिंगाला व त्याच्या साक्षीदारांना मारले. त्यांना रोखण्यासाठी कप्तानसिंगाने स्वतःच्या बंदुकीचे दोन बारदेखील हवेत काढले. पण कल्याणसिंगाने व त्याच्या भावापुतण्यांनी लाठ्या फिरवून कप्तानसिंगाला झोडपले. त्यामधे कोणीतरी एक लाठी कप्तानसिंगाच्या डोक्यावर पोलादी वेटाच्या बाजूने मारली. ती कप्तानसिंगाच्या डोक्यात पाठीमागून शेंडीच्या खालच्या बाजूस लागली. त्यामुळेच कप्तानसिंग चबुतऱ्यावर त्याच्या वाड्याच्या दर्शनी दरवाज्यासमोर चार-पाच फूट अंतरावर, दाराकडे डोके व चबुतऱ्याच्या पायऱ्याकडे पाय अशा रीतीने उताणा कोसळला. ते पाहून कप्तानसिंगाचे हुक्का-चिलीम पिणारे साथीदार लोक तेथून पळून गेले. कप्तानसिंगाचा मृत्यू कल्याणसिंगाने मारलेल्या लाठीच्या माराने झाला. मयताच्या अंगावरही काळेनिळे डाग होते व काही डागांच्या जागी सूज होती. ठाणेदारसाहेब आणि पार्टी गावात १०॥-११ च्या सुमारास पोचली. त्यांनी रीतसर घटनास्थळाच्या जागेचा म्हणजे कप्तानसिंगाच्या

धाब्यासमोरील चबुतऱ्याचा पंचनामा केला. मयतांच्या शरीराचा आँखो देखा पंचनामा केला. मयताच्या शरीरावर 'मुंदी चोटें' म्हणजे मुक्या माराच्या जखमांचे डाग दिसले. कपडे धुळीने भरले होते. तोंडातून रक्त वाहिले होते, वगैरे माहितीचा उल्लेख आरोपपत्रकांत केला होता. तीन साक्षीदार घटनास्थळी मयताबरोबर बसले होते. त्यांनी पुलिसांना आपापले कथन लिहवून दिले. पुलीस पार्टीने कप्तानसिंग मयताचे शव मरणोत्तर शवतपासणीसाठी उजाडायच्या आतच गाडीत घालून ग्वाल्हेरच्या मोठ्या सरकारी इस्पितळात पाठवून दिले. पुलिसांनी अभियुक्तांचा शोध घेतला, तेव्हा कल्याणसिंग स्वतःच्या घरी आजाऱ्याचे सोंग करून निजला होता, त्याला अटक केली. कल्याणसिंगाच्या अंगात त्यावेळी 'मामुली हरारत' होती. बाकी अभियुक्तांपैकी कल्याणसिंगाचा मुलगा जोरावरसिंग घरीच सापडला. त्याला अटक केली. अटकेच्या वेळी जोरावरसिंगाच्या कपाळावर एक जखम होती व त्यातून रक्त वाहत होते. दोघांनाही सकाळी मुरार छावणीच्या इस्पितळात इलाजासाठी पाठवले. कल्याणसिंगाचे तीन भाऊ व नोकर हरकू ढीमर घरीच सापडले. त्यांनाही अटक केली. चार पुतणे सकाळपर्यंत लपले होते. त्यांना उजाडल्यावर शोधून पकडले. त्यांच्या खिशात चार सिनेमाची जुनी तिकिटे सापडली. कल्याणसिंग व इतर पाच आरोपींच्या घरातून पाच पोलादी बेटाच्या लाठ्या, चार साध्या लाठ्या व दुनाली बंदूक 'बरामद' जप्त केली. त्यांचा रीतसर पंचनामा केला. चार सिनेमाच्या तिकिटांचा पंचनामा केला. ती तिकिटे मुरार छावणीच्या 'श्री' सिनेमाची आहेत त्यांचे नंबर...असे आहेत. शवाची रीतसर तपासणी झाली. त्याचा रिपोर्ट डॉक्टरांच्या सहीचा ताब्यात घेतला, त्याप्रमाणे 'डोक्यावर पोलादी बेटाच्या लाठीचा मार बसल्यामुळे डोक्याचे मेंदूजवळचे हाड फुटले व मेंदूस इजा होऊन आतून रक्तस्राव झाला. तोंडात बरेच रक्त साकळलेले होते. मृताच्या अंगावरचे कपडे धुळीने भरले होते. मृताच्या कुडत्याच्या खिशात दोन चुरगळलेले कागद सापडले. ते एका लिफाफ्यात सीलबंद करून डॉक्टरसाहेबांनी दिले आहेत. व उत्तरीय तपासणीचा रिपोर्टही दिला आहे. मारामारीची वेळ रात्री ११ ते १२ च्या दरम्यानची होती. मृत शरीराच्या कोठ्यात न पचलेले अन्न निघाले, त्यावरून मृत्यूची वेळ ११ वाजण्याचे सुमारास असावी. वगैरे माहिती आरोपपत्रकात लिहिली होती व संदर्भित जप्त केलला माल, कागद व डॉक्टरी रिपोर्ट, पंचनामे, साक्षीदारांची नावापत्त्यानिशी सूची आदी लेखी व मुद्देमालाचा पुरावा आरोपपत्रकासोबत न्यायालयात दाखल झाला होता.

चौकशी मॅजिस्ट्रेट महोदयांच्या कोर्टात चौकशीचे काम चालले. अभियुक्त म्हणून दहा बंदी मॅजिस्ट्रेटसाहेबांसमोर उभे केले गेले. त्याच वेळी मला बंदी आयुक्तांतर्फे वकीलपत्र देण्यात येऊन मी अभियुक्तांच्या वतीने कोर्टात उभा राहिलो व कामाचे पहिले आन्हिक म्हणून आयुक्तांना, सगळ्या कुटुंबियांना विनाकारण पकडले आहे, त्यांच्या घरात कोणी पुरुष माणूस उरले नाही, त्यांच्या शेतीच्या कामाचे फार नुकसान होत आहे, चारी मुले घटनेच्या रात्री गावात नव्हती, त्यांना दुसरे दिवशी सकाळी गावात परतल्यावर पकडले आहे, मुले वयाने लहान आहेत वगैरे मुद्दे लिहून त्यांना सर्वांना जमानत मुचलक्यावर मोकळे करण्यात यावे, अशा विनंतीचे प्रार्थनापत्र कोर्टात दिले. तोवर अभियुक्त कल्याणसिंग बरा झाला होता. जोरावरसिंगच्या कपाळावरची जखम भरून आली होती, परंतु जखमेची निशाणी शिल्लक उरली होती त्या दोघांना व इतर भाऊ व ढीमर हरकूला प्रकरणाची सर्व माहिती विचारून घेतली. ती ऐकून व त्यावर नीट विचार करून अभियुक्तांचा बचाव काय, कसा व कोणत्या कोर्टात करावयाचा त्याची रूपरेषा ठरवून अभियुक्तांचे वतीने 'अभियोगपक्षाची केस खोटी आहे, अभियुक्त निर्दोषी आहेत, सविस्तर जबाब सेशन्स कोर्टात सांगण्यात येईल' अशी अभियुक्तांकडून उत्तरे देवविली. जमानतीच्या प्रश्नावर सुनावणीच्या दिवशी पुलीस प्रॉसिक्युटरच्या मदतीला म्हणून बंगाली भाटेबाबू चौकशी मॅजिस्ट्रेटसमोर आले व त्यांनी बंगाली थाटात, 'केस क्रिस्टल क्लीयॉर हॉंय, मुलजिमान मौकापर रंगे हॉंथ पकडे गये हॉंय ...' म्हणजे केस स्फटिकाच्या खड्यासारखी स्वच्छ पारदर्शक आहे. अभियुक्त सगळे घटनास्थळीच रंगलेल्या हाताचे पकडले गेले आहेत. जोरावरसिंग व ही मुलेच जास्ती दंगेखोर आहेत, जोरावरसिंगाने मयत कप्तानसिंगाला डोक्यात पोलादी बेटाची लाठी मारली आहे. मयताच्या चबुतऱ्यावर सगळ्या अभियुक्त मंडळींनी आक्रमण करून मयताला व त्याच्या पार्टीच्या लोकांना मारले आहे, वगैरे आशयाचे वादविवादाचे भाषण केले. मी जास्ती काही न म्हणता प्रार्थनापत्रात लिहिल्याप्रमाणे मुद्दे सांगितले. चौकशी मॅजिस्ट्रेट महोदयांनी अभियोगपक्षाने कोर्टापुढे ठेवलेल्या व आणलेल्या पुराव्याचे वर्णन करून जमानतीची प्रार्थना फेटाळून लावली. चौकशी मॅजिस्ट्रेटसाहेबापुढे अर्थातच डॉक्टर साक्षीला आले नाहीत. मयत कप्तानसिंगाचा न्हावी व दोन जाटव म्हणजे चांभार साक्षीदार पुरावा द्यायला आले व सर्वांनी आम्ही मयत कप्तानसिंगाच्या चबुतऱ्यावर रात्रीच्यावेळी बसलो असता सगळ्या अभियुक्तांनी चबुतऱ्यावर आक्रमण करून कप्तानसिंगाला मारले आम्ही मयताच्या बीच बचाव करण्याचा प्रयत्न केला, तर आम्हालाही मारले. मयताच्या डोक्यात पोलादी बेटाची लाठी जोरावरसिंगाने मारली. आम्ही बीचबचाव करायला म्हणून अभियुक्तांवर आमच्या काठ्या उगारल्या होत्या पण कप्तानसिंगाने बंदुकीचे दोन बार काढले. त्यामुळे भिऊन सगळे अभियुक्त तेथून पळून गेले.' वगैरे 'आंखो देखा हाल' म्हणून साक्षी दिल्या. मी हेतुपूर्वकच कुणाही साक्षीदाराला कूटपरीक्षण – उलटतपासणीचे प्रश्न विचारले नाहीत. चौकशी मॅजिस्ट्रेट महोदयांनी सगळ्या पुराव्याची शोटक चर्चा करून दहाही आरोपींच्या विरुद्ध दंगेखोर आक्रमणाचा व मनुष्यवधाचा आरोप लावून संपूर्ण चौकशीसाठी जिल्ह्याच्या म्हणजे ग्वाल्हेरच्या सेशन्स कोर्टाकडे सुपूर्द केले – कमिट केले.

अभियुक्त मंडळींच्या सुदैवाने सत्र न्यायालयात – सेशन्स न्यायालयातला खटला फारसे कालहरण न होता लवकरच सुनावणीस बोर्डावर आला. एवढेच नव्हे तर, त्यावेळी जिला एवं सत्र न्यायाधीश म्हणून – डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन्स जज्ज म्हणून जे अधिकारी न्यायाधीश होते त्यांचे समोरच सुनावणीस निघाला. हे न्यायाधीश महोदय ४५–५० वर्षे वयाचे, जातीने कायस्थ गृहस्थ; परंतु आचारविचारानें सात्त्विक व धार्मिक चालीरीतीचे व वृत्तीचे सज्जन गृहस्थ होते, हे मला माहीत झाले होते. त्यांच्याच कोर्टातल्या

लिपिक, शिरस्तेदार, लघुलेखक, चपराशी वगैरे मंडळींकडून हे सगळे मला माहीत होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हे न्यायाधीश महोदय रोज सकाळीच लवकर उठून स्नान वगैरे आटोपून श्रीरामचंद्राच्या पंचरसी धातूच्या मूर्तीसमोर बसून अगरवत्तीच्या सुवासी वातावरणात गोस्वामी तुलसीदासजींच्या रामचरितमानसामधले रोज दहा दोहे–छंद व त्यावरच्या सगळ्या चौपाया वाचीत आणि मगच दैनंदिन कामास सुरुवात करीत. रात्रीच्या वेळीदेखील हातपाय धुऊन श्रीरामजींच्या मूर्तीवर तीसमोर ठेवलेल्या रामचरितमानसावरही फुले वाहून आरती ओवाळीत व तोंडाने 'जयजगदीश हरे' ची प्रार्थना व आरती 'श्री रामायणजीकी' ही रामायणाची गोस्वामी तुलसीदासरचित आरतीही म्हणून मगच रात्रीचे भोजन करीत. न्यायालयात आल्यावरसुद्धा हे न्यायाधीश महोदय न्यायालयीन खुर्चीवर बसायच्या पूर्वी न्यायपीठाला नमस्कार करूनच मग त्यावर आसीन होत ! त्यांचा हा नेम मी स्वतःच कित्येक वेळी कोर्टात बघितला होता. याचमुळे त्यांच्या कोर्टात मला खराखुरा व पूर्ण न्याय मिळेल याबद्दल यत्किंचितही शंका नव्हती.

सत्र न्यायालयात – सेशन्स कोर्टात अभियोग सुनवाई आरंभ होताच मी चार मुलांच्या वतीने पुन्हा प्रतिभूती – जमानतीवर नि वचनपत्रा – मुचलक्यावर मोकळे करण्याबद्दल रीतसर प्रार्थनापत्र दिले व पकडले जाताच अभियुक्त मुलांच्या खिशातून मुरार छावणीच्या 'श्री' सिनेमाची घटना दिवशीच्या रात्रीच्या खेळाची नंबर असलेली चार तिकिटे सापडली आहेत, याकडे लक्ष देववूनच श्रीमान न्यायाधीश महोदयांना विनविले की, हे अभियुक्त घटनेनंतर फरार झाले होते हे अभियोग पक्षाचे म्हणणे खोटे आहे, हे मी श्री सिनेमाच्या मालकांना साक्षीत बोलावून सिद्ध करीन. मुलांनी काही मारामारी केल्याबद्दल स्पष्ट पुरावा नाही. तसे काही करण्याचे त्यांचे वयही दिसत नाही. ही मुले त्या घटनेच्या रात्री तिसरा खेळ बघून मुरार छावणीपासून जवळवाडीलाच आठ मैलांचे अंतर चालून उजाडायच्या सुमारास खेड्यात परतली होती. त्यांना गावच्या शिवेवरच पुलिसांनी पकडले आहे. त्यांना घरातून पकडले अशी खोटी बतावणी केली आहे व मुले निर्दोषी आहेत. घरातील सगळी पुरुष मंडळी पकडली गेल्यामुळे शेतीवाडीची फार हानी होत आहे, वगैरे विनवणी करून जमानतीच्या प्रार्थनापत्राबद्दल सांगितले. या चारी मुलांची वये १४ पासून १८ वर्षे वयाची होती. सगळ्यांत लहान मुलाचे नाव 'मुन्ना', तर रूप खरोखरीच बाळरूप होते. सावळ्या, तरतरीत नि गुबगुबीत गोल चेहेऱ्यावर निरागस हसरा भाव नि लख्ख चमकणारे डोळे ! त्याचा चेहरा बघूनही न्यायाधीश महोदय विरघळले असावेत. एवढेच नव्हे तर, या प्रकारात पोलिसांनी केलेल्या पक्षपाताचा व अभियुक्तांविरुद्ध धरलेल्या आकसाचा त्यांना वास आला असावा ! त्यांनी चारी मुलांच्या एक हजार रुपयांच्या जमानती व मुचलक्यावर चारी मुलांना कैदेतून मोकळे करण्याची आज्ञा दिली. अभियुक्त कल्याणसिंग, त्याचे तीन भाऊ, जोरावरसिंग मुलगा व नोकर हरकू ढीमर यथावत कैदेत राहिले

रीतसर अभियोगपक्षाचा पुरावा आरंभ झाला. परंतु त्यापूर्वीच मी कोर्टासमोर असलेल्या पुराव्यांच्या कागदपत्रांचे व विशेषेकरून मयताच्या उत्तरीय शवतपासणीच्या डॉक्टरी रिपोर्टाच्या कागदांचे बारकाईने निरीक्षण करून घेतले होते व आवश्यक त्या कागदांच्या प्रमाणित प्रतिलिप्याही कोर्टातून प्राप्त केल्या होत्या. अभियोग पक्षाचा पहिला साक्षीदार आला तो मयत कप्तानसिंगाचा पंधरा वर्षांचा मुलगा. तो दिसायला अगदीच बावळट होता व बुद्धीनेही अगदीच साधारण होता–अर्धवट होता, हे मला अगोदरच कळले होते. त्याने कोर्टात सुरवातीस सांगितले की, तो घटनेच्या दिवशी रात्री सात वाजताच जेवून 'कलेऊ' करून झोपला होता. त्याला रात्री ११ वाजता उठवले. तेव्हा त्याच्या पिताजींची 'लाश'–प्रेत–चबुतऱ्यावर दारात पडले होते व पुलिसांची लिखापढी चालली होती. त्याच्या पिताजींचे व कल्याणसिंगबाबा आणि पार्टीचे गोंड्याबद्दल भांडण होते. त्यावरून ही घटना घडली होती. दुपारपासूनच, रात्री मारामारी होणार, अशी शंका होती. कूटपरीक्षणात–उलट–तपासणीत त्या मुलाला इतर काही न विचारता मुख्यतः दोन प्रश्नांबद्दल विचारले होते. त्या प्रश्नांची जी उत्तरे त्या बावळट मुलाने दिली ती प्रश्नोत्तरे अशी –

**प्रश्न** : गोंड्याच्या जमिनीवर ठेवलेले काटेरी व तारांचे बंडल व खांब तू पाहिलेस का ? ते कुणाचे होते व गोंड्यांच्या जमिनीवर कोणी ठेवले ?

**उत्तर** : ते माझ्या पिताजींनी घटनेच्या आदल्या दिवशीच आणवले होते व त्यांच्याच हुकुमावरून मी व एका नोकराने ते गोंड्यावर नेऊन दुपारीच ठेवले होते. आम्ही तेथे त्या खांबाचे दोनतीन खड्डेही खोदले होते. पण कल्याणसिंगबाबाने आम्हाला बघून 'ऐतराज'–केला–आपत्ती केली व मी त्याचे ऐकले नाही म्हणून माझ्या मुस्कटात मारून त्यांनी मला व नोकराला पळवून लावले होते. मी हे सर्व माझ्या पिताजींना सांगितले होते.

**प्रश्न** : तू सिनेमा पाहातोस का ? मुरार छावणीला कुणाबरोबर जातोस ? का एकटाच जातोस.

**उत्तर** : हो पहातो ना ! कधी कधी त्या घरातल्या मुन्नाबरोबर जातो. आदल्या दिवशीच मुन्ना मला म्हणत होता की, सिनेमा पहायला चल म्हणून. पण मी गेलो नाही. कारण तो व इतर मुलं रात्रीचा खेळ बघणार होते. परत यायला उशीर झाला असता.

यानंतर अभियोगपक्षातर्फे मयताचे नापित महाशय साक्षीला आले. त्याने सांगितले की, 'मी व दोन जाटव जमीनदारसाहेबांच्या चबुतऱ्यावर चिलीम पीत बसलो होतो. जमीनदारसाहेब त्यांच्या तख्तावर बसून हुक्का पीत बसले होते. आम्ही जेवून-खावून कलेऊ करून'च बसलो होतो. रात्रीच्या १० वाजण्याच्या सुमारास कल्याणसिंग, जोरावरसिंग, तसेच कल्याणसिंगांचे तीन भाऊ व चार पुतणे आणि हरकू ढीमर लाठ्या-काठ्या-बंदूक घेऊन आले व चबुतऱ्यावर चढून जमीनदारसाहेबांना शिव्यागाळी करू लागले. कल्याणसिंगाच्या हातात बंदूक होती. जोरावर व त्याचे तीन चाचा मंडळी हातात पोलादी बेंटाच्या लाठ्या घेऊन होते. हरकू ढीमर व मुलांच्याजवळ साध्या काठ्या होत्या. सर्वजण नाला लावलेले फौजी बूट घालून आले होते. त्यांनी जमीनदारसाहेबांवर हल्ला केला तेव्हा जमीनदारसाहेबांनी त्यांच्या तख्तावर हाताशीच ठेवलेली बंदूक घेऊन पहिला फायर हवेत केला. पण हल्लेखोर आणखीच हल्ला करू लागले. 'खूब लाठी

चली. हमको भी मार पडी. तो हमने भी लाठी चलाई. जाटव लोक भी पिट गये. कल्याणसिंग और जोरावरसिंग आगे थे इनमेसे वोह आगे बढतेही जमीनदारसाहेबने दुसरा फायर किया. तो किसीने उनके सिरमे लाठी मारी, सो वह दरवाजेपरही चित गिर गये. दूसरा फायर होनेके बाद सब हमलावर भाग गये.' ( खूप लाठीमार झाला, मलासुद्धा मार बसला. म्हणून मीसुद्धा लाठी फिरवली. चांभार लोकांनासुद्धा मार बसला. कल्याणसिंग व जोरावरसिंग पुढे होते. ते समोरून जवळ येताच जमीदारसाहेबांनी दुसऱ्यांदा बंदुकीचा बार काढला. तेव्हा कोणी तरी त्यांच्या डोक्यात लाठी मारली. तेव्हा ते ( जमीनदार ) दरवाज्यातच पाठीवर उताणे पडले. दुसरा बार ऐकून हल्लेखोर पळून गेले. ) पुढे परीक्षणात त्याने पंचनामे, अभियुक्तांची धरपकड वगैरे रीतसर माहिती सांगितली. त्याला कूटपरीक्षणाचे–उलटतपासणीचे–प्रश्न विचारताना मी आरंभीच त्याला विचारून घेतले की, जमीनदारांच्या चबुतऱ्यावर त्या दिवशी रात्री कोठे गुराचे शेण पडले होते का ? तर त्याने, उत्तर दिले की 'छे छे ! असे कसे होईल ? चबुतऱ्यावर गाई–म्हशी कशा येतील ? तो चबुतरा तर जमीनदारसाहेबांची बैठकच आहे. रोज स्वच्छ मातीने सारवला जातो. तेथे एका भिंतीशी जमीनदारसाहेबांचे बसायचे तखत–तख्त–लाकडी बैठक आहे.' माझ्या पुढच्या प्रश्नांच्या उत्तरात त्याने सांगितले की, तेथे 'हाणमार चालली होती. जमीनदारासमोर जोरावरसिंग लाठी मारीत होता. त्याचीच लाठी जमीनदारसाहेबांच्या डोक्यावर लागली असावी. जोरावर जमीनदारसाहेबांच्या समोरून लाठी मारीत होता, त्यान जमीनदारसाहेबांच्या पाठीमागे जाऊन त्यांच्या डोक्यात लाठी मारली असे नाही झाले. कल्याणसिंग जोरावरच्या आणखी मागेच होता. जोरावरसिंगाच्या डोक्यात कोणी लाठी मारली हे मला दिसले नाही. अंधार झाला होता. आम्ही सगळेच लाठ्या फिरवीत होतो. आम्ही जमीनदारसाहेबांचा बचावबचाव करण्याकरिता लाठी चालवली होती. जमीनदारसाहेबांच्या हातात लाठी नव्हतीच. त्यांनी तख्तावर ठेवलेली त्यांची बंदूक हातात घेतली होती, वगैरे. माझ्या पुढल्या प्रश्नांची मालिका व त्यांची उत्तरे पुढीलप्रमाणे.

प्रश्न : जमीनदार कप्तानसिंग व तू नि दोन जाटव त्या दिवशी रात्री अंधार पडल्यावर कल्याणसिंगांच्या गोंड्यावर तार लावायला म्हणून गेला होतात ?

उत्तर : नाही. आम्ही नाही गेलो.

प्रश्न : तेथे जोरावरसिंग, त्याचे तिघे काका व हरकू ढीमर शेणगळाठा रचून ठेवण्याचे काम करीत होते ?

उत्तर : नाही.

प्रश्न : जोरावरसिंग वगैरेंना भिववून पळवून लावण्यासाठी कप्तानसिंगने बंदुकीचे दोन फायर केले ?

उत्तर : गोंड्यावर नाही काढले.

प्रश्न : जोरावर कप्तानसिंगाची बंदूक हिसकावून घेण्यासाठी पुढे आला तेव्हा तू जोरावरसिंगाच्या डोक्यात लाठी मारली ?

उत्तर : नाही. मी नाही मारली. जोरावरसिंगाला लाठी कुणाची व केव्हा लागली हे मला अंधारात नीट दिसले नाही.

प्रश्न : कल्याणसिंग कोठे होता ?

उत्तर : प्रथम कोठे होता हे मला कळले नाही. मग थोड्या वेळाने मी त्याला जोरावरसिंगाच्या पाठीमागे पाहिले. त्याच्याजवळ लाठी होती. त्याची लाठी कप्तानसिंगाला लागली नाही. जोरावरनेच कप्तानसिंगाला समोरून लाठी मारली.

प्रश्न : कप्तानसिंग जेथे पडला तेथे गोंड्याचे शेणपाणी पडले होते?

उत्तर : नाही. तेथे शेणपाणी वगैरे मुळीच नव्हते. तेथे चबुतऱ्याची तांबड्या–पिवळ्या मातीची धूळ झाली होती.

प्रश्न : मारामारीच्या वेळी तेथे चारी मुले नव्हती ?

उत्तर : असे नाही झाले. त्या गर्दीत सगळे कुटुंब आले होते मारामारी करायला.

प्रश्न : कप्तानसिंगाला लाठी तुम्हा लोकांची मागून लागली ?

उत्तर : नाही. असे नाही झाले. जोरावरची लाठी समोरून लागली.

प्रश्न : दरोगाजी–ठाणेदारसाहेब व पुलीस आल्यावर तुम्ही लोकांनी मयत कप्तानसिंगाला गोंड्यावरून उचलून चबुतऱ्यावर नेलेत व मारामारी चबुतऱ्यावर झाली अशी खोटी केस बनवली ?

उत्तर : नाही. असे नाही झाले ?

प्रश्न : त्या दिवशी कल्याणसिंग त्याच्या घरी फणफणून ताप आलेला खाटेवर निजला होता ?

उत्तर : कल्याणसिंग त्या दिवसात आजारी होता. पण मारामारी करायला तोही लाठी घेऊन आला होता.

प्रश्न : गोंड्यावर तारांचे बंडल कोणी नेले ? तूच नेलेस ना ?

उत्तर : ते मला माहीत नाही. मी नेले नाही. ते बंडल कोणाचे होते ते मला माहीत नाही.

प्रश्न : दोन्ही जाटव साक्षीदार व तू कप्तानसिंगाबरोबर गोंड्यावर गेला होतात व तेथे अंधारात गोंड्यावर काटेरी तारांचे कुंपण लावण्याचा तुमचा विचार होता ?

उत्तर : नाही. असे नाही झाले.

या न्हावी साक्षीदाराला त्याच्या म्हणण्याप्रमाणे सगळे हल्लेखोर चबुतऱ्यावर 'फौजी बूट' घालून का आले होते ? कशावरून ते फौजी बूटच होते ? तुला अंधारात दिसले का वगैरे प्रश्न विचारण्याचा मला मोह झाला होता. पण मी स्वतःला आवरून त्या मुद्द्यावर गप्प बसलो.

अशाच तऱ्हेने दोन जाटव साक्षीदारांची साक्ष झाली. दोघा जाटवांनी पुलिसांच्या आरोपपत्रकाची री ओढली व कूटपरीक्षणात, 'आम्ही घटनेच्या दिवशी रात्री कल्याणसिंगाच्या गोंड्यावर गेलो नाही. कल्याणसिंग गोंड्यावर शेणामुतात पडला नाही. आम्ही कल्याणसिंगाबरोबर गोंड्यावर जबरदस्तीने तार लावायला रात्री गेलो होतो असे झाले नाही. ... कल्याणसिंगाला लाठी चबुतऱ्यावर जोरावरसिंगाने मारली. कल्याणसिंग पाठीवर उताणा कोसळला. तेथे शेणमूत काही नव्हते. लोखंडी नाला लावलेले बूट घालून चबुतऱ्यावर, हमलावर लोकांनी – आक्रमणखोरांनी दंगा केला. म्हणून सारवलेल्या चबुतऱ्यावर तांबड्या-पिवळ्या मातीची धूळ झाली होती. तेथेच धुळीत जमीनदार कोसळला होता !' वगैरे सांगितले. हे जाटव लोक चांभारचौकशा करणारे लोक जे ठरले ! त्यांनी आक्रमकांच्या पायतणांची कहाणी रंगवून सांगितली, याची मला गम्मतच वाटली होती. तरी त्या कहाणी-

सले तथ्य मला त्यावेळी उमगले नव्हते. जाट्व साक्षीदारांनंतर रीतसर तीन-चार साक्षीदार, एक हेडकॉन्स्टेबल पुलीस, तीन पंच साक्षीदार साक्ष देऊन गेले. पुलीस हेडकॉन्स्टेबल साक्षीदार, मयताचे शव उत्तरीय तपासणीसाठी सरकारी इस्पितळात घेऊन जाणे, उत्तरीय तपासणीचा डॉक्टरी रिपोर्ट आणणे वगैरे साक्ष देऊन गेला. नेमलेल्या तारखेवर डॉक्टरसाहेब कोर्टात हजर झाले नाहीत. चौकशी करणारे ठाणेदार साहेबांशिवाय इतर कोणी साक्षीदार उरले नव्हते. म्हणून श्रीमान सत्रन्यायाधीश महोदयांनी चौकशी-ठाणेदाराला साक्षीत उभे राहायला म्हटले. ठाणेदारसाहेब प्रथम टाळाटाळी करीत होते. पण न्यायाधीश महोदयांनी जरा करड्या आवाजात साक्षीला उभे राहण्याबद्दल म्हणताच ठाणेदारसाहेबांना साक्षीदाराच्या पिंजऱ्यात त्याच दिवशी उभे राहावे लागले. त्यांची साक्ष अचानकच सुरू झाली होती ! दरोगाजींनी आपली साक्ष कुरकुरत नोंदविली. मयताच्या उत्तरीय शवतपासणीचा रिपोर्ट मी आणवला. मयताच्या कपड्यांत कुडत्याच्या खिशात डॉक्टरांना सापडलेल्या कागदांचे सीलबंद पाकीट डॉक्टरांनी मला दिले. ते मी तसेच सीलबंद ठेवले. कारण मला ते कागद महत्त्वाचे वाटले नाहीत. जोरावरसिंगाच्या कपाळावरच्या जखमेचा रिपोर्ट मी आणवला. जोरावरच्या कपाळावर दोन इंचाची जखम होती जखमेवर पांच टाके घालावे लागले. कल्याणसिंगाला पकडले तेव्हा त्याच्या अंगात ताप होता म्हणून त्याला इलाजासाठी मुरार छावणीच्या इस्पितळात चार दिवस ठेवले. कल्याणसिंगाचा ताप तीन दिवसांनी उतरला म्हणून चौथे दिवशी ठाण्यात आणले. मयताचे कपडे रक्ताचे डाग पडलेले व गर्दीमुळे झालेल्या चबुतऱ्यावरच्या धुळीने माखलेले होते, वगैरे प्रारंभिक साक्ष ठाणेदारसाहेबांनी दिली.

येथे घटनासूत्र थांबवून एक अगोदरचे सूत्र सांगायला हवे. म्हणजे ठाणेदाराच्या साक्षीतल्या कूटपरीक्षणाच्या—उलटतपासणीच्या-प्रश्नोत्तरांचा वाचकांना नीट उलगडा होईल. पुलिसांनी आरोपपत्राबरोबर दाखल केलेल्या मयताच्या शवाच्या उत्तरीय तपासणीबद्दलचा डॉक्टरी रिपोर्ट,- पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट—मी बारकाईने निरीक्षण केला होता. त्यावेळी मला पुलिसांची आरोपपत्रात लिहिलेली कहाणी व माझ्या पक्षकारांनी मला सांगितलेली कहाणी यांमधले अंतर व विरोध चांगलाच जाणवला होता व त्याच-दृष्टीने मी मयताच्या शरीरच्या तपासणीचा रिपोर्ट बारकाईने पाहिला होता. त्यामधे मला दिसलेल्या गोष्टींपैकी पहिली गोष्ट मला जाणवली ती म्हणजे मयताच्या शरीरावरची एकच जखम व ती त्याच्या डोक्यावर पाठीमागच्या बाजूला झालेली जखम बाकी शरीरावर कोठेही दुसरी इजा, जखम किंवा मुका मार कशाचाच काही उल्लेख नव्हता. ज्या शवाची चोवीस तासाच्या आत परीक्षा झाली, त्यानंतर असल्या खुनाजर तो मार लागला होता असे म्हटले तर, दिसावयास हवा होता. दुसरी गोष्ट मला जाणवली की, मयताच्या कोठ्यामध्ये न पचलेले अन्न मिळाले. याचा अर्थ डॉक्टरी विद्येप्रमाणे मयताने अन्न खाल्ल्यावर दोन तासांच्या आत त्याला मृत्यू आला असला पाहिजे. म्हणजे कल्याणसिंगाने संध्याकाळचा 'कलेऊ'-जेवण ७॥-८ वाजता केले होते असे म्हटले तर त्याचा मृत्यू ९-९॥ ला झालाच असला पाहिजे. डॉक्टरी रिपोर्टाचे हे दोन्ही भाग माझ्या पक्षकारांच्या कहाणीशी अगदी 'फिट' बसत होते ! तिसरी गोष्ट मात्र मला बुचकळ्यात पाडीत होती. डॉक्टरी रिपोर्टमधे मयताच्या कपड्यावरील डागचिन्हाबद्दल जे लिहिले होते ते असे : मयताच्या शरीरावर चार कपडे, धोतर, लखनवी कुडता, बनियान व टॉवेल, टॉवेल रक्ताने भिजलेला, कुडत्याचा गळा रक्ताच्या डागांचा आणि धोतर व कुडत्याचा शेवट... ने लडबडलेले, असे वर्णन होते. डॉक्टरी रिपोर्ट इंग्लिशमधलाच ! त्यातले इंग्लिश शब्द होते, 'टॉवेल अँण्ड कॉलर ऑफ कुरता ब्लडस्टेण्ड. धोती अँण्ड एँण्ड ऑफ कुरता सॉईल्ड बाय...' इंग. शेवटच्या इंग्लिश शब्दांची इंग्लिश अक्षरे नीट वाचता येत नव्हती. डॉक्टरसाहेबांच्या सर्वपरिचित अवाच्य लिपीमधली अक्षरे होती. अगदी 'आप लिखे खुदा बाचे' पंकीच. पण मला माझ्या पक्षकारांनी सांगितलेले माहीत होते वाचताना माझ्या मनात होतेच. म्हणून त्याच संदर्भाने मी तो शब्द वाचला. अगदी सहज असा वाचला. कारण माझ्या पक्षकारांचे म्हणणे होते की, कल्याणसिंग गोंड्यावर-गोठ्यात मारला गेला. तो गोठ्याच्या जमिनीवर कोसळला होता. तेथे गुरांचे शेणमूत्र असणारच, इत्यादी मनात असताना मी तो शब्द वाचला. 'काउडंग' ! त्या शब्दाचे पहिले अक्षर स्पष्ट दिसत होते ते 'सी'च होते. शेवटची अक्षरे यू-एन्-जी का आय-एन्- जी एवढाच प्रश्न पडण्याइतकी गिचमीड होती. मधली अक्षरे मात्र कशाचीच कशाला काना-मात्रा दाखवीत नव्हती ! तेव्हा मी अक्षरे मोठी करून दाखवणाऱ्या भिंगातून ती अक्षरे तपासून वाचली ' तर शब्द सी-ओ-डबल्यू-डी-यू-एन्-जी अशा अक्षरांची डॉक्टरी लिपी चटकन दिसली ' काऊडंग—गाईचे शेण ! माझ्या पक्षकारांचे म्हणणे डॉक्टरी रिपोर्ट सिद्ध करीत होता याने मी आनंदलो. पण मला हे कळेना की ठाणेदाराने, पोलीस प्रॉसिक्युटरने हा शब्द काय व कसा वाचला ? पुलिसांचे साक्षीदार प्रत्येकजण चबुतऱ्यावर मातीची धूळ झाल्याचे सांगत होते. एक जाट साक्षीदार तर त्या नाल ठोकलेल्या फौजी बुटाचा संबंध चबुतऱ्यावरल्या धुळीचे कारण म्हणून सांगत होता ! धुळीचा रंगही तांबड्या पिवळ्या मातीचा होता असे साक्षीदार सांगत होते. हे सगळे माहीत असूनसुद्धा मला माझा बुचकळा स्पष्ट करता आला नाही. शेवटी ठाणेदार महोदय हे कोडे कसे सोडवतात याची वाट मी पाहत होतो व त्याच मनातल्या विचाराशिशी मी कूटपरीक्षणाचे प्रश्न विचारले होते. माझ्या कोटाच्या खिशामध्ये मोठे अक्षर दाखवणारे भिंग होतेच. चौकशी अधिकारी ठाणेदाराची प्रश्नोत्तरे खाली दिल्याप्रमाणे झाली.

प्र. : 'तुमचे शिक्षण किती झाले आहे ? कुठे झाले आहे ?'

उ : 'मी अजमेर बोर्डाचा मॅट्रिक पास आहे. माझे शिक्षण उज्जैनच्या बानर्जी कोचिंग क्लासमधे झाले.'

( उज्जैनचा बानर्जी कोचिंग क्लास त्या दिवसात 'तीन सालमें शर्तीया मेट्रिक पास ! न होने पर पूरी फी वापसी की गेरंटी ! (तीन वर्षांत हमखास मॅट्रिक पास ! न झालात तर सारे फीचे पैसे परत देण्याची खात्री !-) अशा ख्यातीचा होता. पुण्यश्लोक बानर्जी गुरुजींनी ठाणेदार महोदयांना शिकवलेल्या इंग्रजी विद्यादानविषयी माझी उत्सुकता शिगेला पोचत होती ! तर ती आवरून धरीत पुढले प्रश्न विचारले.

प्र : 'मयताच्या शवाची उत्तरीय तपासणी घटनेच्या चोवीस तासांच्या आत झाली ना ?'

उ : 'हो.'

प्र : 'डॉक्टरी रिपोर्टात मयताच्या अंगावर एकच जखम–त्याच्या डोक्यावर, पाठीमागे, मानेजवळची आहे ना ?'

उ : 'हो.'

प्र : 'मग तुम्ही गावात 'आंखो देखा' पंचनामा बनवला तेव्हा मयताच्या शरीरावर मुक्या माराचे डाग, सूज वगैरे कसे पाहिले ?'

उ : रात्रीच्या अंधारात कंदिलाच्या उजेडात मला व पंच साक्षीदारांना तसे डाग मयताच्या शरीरावर दिसले होते व तेथे सूज वाटली होती म्हणून लिहिले.'

प्र. : 'की, सगळ्या अभियुक्तांनी मारले हे सिद्ध करण्यासाठी लिहिले ?'

उ. : 'नाही, तसे नाही झाले.'

प्र. : 'धोतरावरचे व कुडत्याच्या शेवटावरचे डाग तुम्ही पाहिलेत का ? ते कशाचे आहेत ?'

उ. : 'ते चबुतऱ्यावरच्या लाल, पिवळ्या मातीचे आहेत.'

प्रश्न : त्या डागांचा वास घेऊन पाहिलेत का ? अजूनसुद्धा वास येतो की नाही ?

उत्तर : 'मी वास घेऊन पाहिले नाही.'

साक्षीदाराला कपडे नाकासमोर धरून वास घ्यायला सांगितले. साक्षीदाराने नाक मुरडीत वास घेण्याचे नाटक केले. पण उत्तर दिले, 'अजूनसुद्धा वास येत नाही.'

प्रश्न : शवाच्या उत्तरीय तपासणीच्या रिपोर्टात कपड्यांबद्दल काय लिहिले आहे ते वाचलेत का ?

उत्तर : 'हो. वाचले आहे.'

प्रश्न : कोर्टासमोर पुन्हा वाचा पाहू ?'

डॉक्टरी रिपोर्ट हातात घेऊन दरोगाजी साक्षीदाराने वाचले–मोठ्याने वाचले.

उत्तर : 'टोवेल एण्ड कोलर ऑफ कुरता ब्लड स्टेन्ड. धोती अॅण्ड एण्ड ऑफ कुरता साइल्ड बाइ क्राउंडिंग !'

मी तर चाटच पडलो ! मी पुन्हा म्हटले, 'अहो ! ते काऊडंग आहे !'

साक्षीदाराने पुन्हा वाचल्यासारखे हावभाव केले. स्वतःची मान व डॉक्टरी रिपोर्टाचा कागद यामध्ये निरनिराळे दृष्टिकोन साधून पुन्हा पुन्हा वाचले. पण उत्तर दिले, 'मला तर ते क्राउंडिंगच दिसते !' मी पुन्हा पुन्हा त्यांना समजावीत होतो की, शेवटची अक्षरे यू–एन–जी आहेत. तरी त्यांचा ठेका क्राउंडिंग शब्दाचाच राहिला. म्हणून मी 'शिरसि मा लिख 'च्या त्राग्याने गप्प बसणार होतो. पण माझी हार बघून पुलिसांचे वकील पुढे होऊन त्यांनी रिपोर्ट स्वतः वाचला. नि मुकाट्याने शेजारीच बसलेल्या 'भाचेबाबू 'च्या हातात दिला. 'भाचेबाबू' रिपोर्ट पाहत–पाहतच राहिले ! पण तोंडाने तो शब्द 'क्राउंडिंगच आहे' असे म्हणू लागले. म्हणून माझ्याने न राहवून मी माझ्या खिशातले भिंग 'भाचेबाबू 'च्या हातात दिले व त्यांना पुन्हा नीट बघून वाचावयास विनंती केली. 'भाचेबाबू 'नी रिपोर्टाची अक्षरे भिंगातून बघितली. त्यांचा चेहरा पडला ! पण ते कबूल न करता त्यांनी आपल्या 'हायर इंग्लिश 'चा आसरा घेतला नि सुरू केले, 'हॉजूर ! इट 'इऽऽस' क्राउंडिंग ! शेक्सपीयॉर हॅज यूज्ड दिस वर्ड एज व्हर्ब इन हिज ड्रामा–आय फॉरगेट दी नेम ऑफ दी ड्रामा–दॅट हीरो ओफ शेक्सपीयॉर ह्...' मी त्रासून भाचेबाबूंना तो डॉक्टरी रिपोर्ट व भिंग श्रीमान सत्रन्यायाधीश महोदयांना देण्यास म्हटले व भाचेबाबू ते द्यायला काकू करीत आहेत, असे वाटून मीच ते दोन्ही भाचेबाबूंच्या हातातून घेतले व श्रीमान न्यायाधीश महोदयांच्या टेबलावर त्यांच्यासमोर ठेवले. श्रीमान न्यायाधीश महोदयांनी तो रिपोर्ट हातात घेऊन प्रथम उघड्या डोळ्यांनी वाचला नि नंतर भिंगातून बघूनही वाचला व शांतपणे ती दोन्ही भाचेबाबूंकडे सारीत म्हटले, 'मिस्टर...प्लीज बी फेअर टु युवर डिग्री ऑफ हायर इंग्लिश एण्ड टु युवर नॉलेज ऑफ शेक्सपीरियन ड्रामा !' भाचेबाबूंचा चेहरा इतका पडला की, ते आपल्या खुर्चीवर बसूनदेखील 'जमिनीवर चारी खाने चित लोळवल्यासारखे' चेहऱ्याने व शरीराने बसलेले दिसले !

माझे काम झाले होते ! मी कल्याणसिंगाच्या आजारीपणाचा मुरार छावणी इस्पितळाचा डॉक्टरी रिपोर्ट ठाणेदार महोदयांना दाखवला व त्याबद्दल प्रश्न विचारताच ठाणेदारांनी कबूल केले की, कल्याणसिंग पकडल्यानंतरही तीन दिवस चढत्या तापाने आजारी होता. पण चौथ्या दिवशी त्याचा ताप उतरला होता. पुढे मी साक्षीदाराला 'तुम्ही चौकशीच्या वेळी किंवा अजूनपर्यंत गोंड्यावर गेलात का ? व तेथली तारांची दोन बंडले व लाकडाचे खांब पाहिलेत का ? अजून ते तेथेच पडले आहेत !' असे म्हटले. त्यावर त्या ठाणेदाराने 'मला तेथे जाण्याची आवश्यकता नव्हती व मी ते पाहिले नाहीत !' असे ठसक्यात उत्तर दिले ! ते ऐकताना न्यायाधीश महोदयांचा रागाने लाल झालेला चेहरा बघून मी घाबरलोच होतो. मला तर वाटले होते की, न्यायाधीश महोदय आता म्हणणार की, 'अरे कम्बख्त ! इतने बेहया ? अभीभी इतना गरूर ? मराठीत, 'अरे हलकटा ! इतका मुर्दाड ! अजूनही इतका गर्व ?' पण ते तोंडाने काहीच बोलले नाहीत. मी आपली उलटतपासणी तेथेच संपविली.

दुसऱ्या दिवशी डॉक्टरसाहेब कोर्टात साक्षीला आले. त्यांनी रीतसर मयताचे शव एक पंच व एक हेडकॉन्स्टेबल यांनी ओळखल्याचे सांगून त्याची उत्तरीय तपासणी त्यांनी रिपोर्टात लिहिलेल्या तारखेला व उल्लेख केलेल्या वेळी केल्याचे सांगितले व त्या तपासणी रिपोर्टावर आपली स्वाक्षरी असल्याचे प्रमाणित केले. 'रिपोर्टात लिहिल्याप्रमाणे सर्व गोष्टी मी स्वतः पाहिल्या. मयताच्या शरीरावर केवळ एकच जखम होती, ती डोक्याच्या पाठीमागील बाजूस मानेजवळ उजव्या कानाकडे असलेली. ही जखम अती कठीण धातूच्या बोथट हत्याराच्या मारामुळे झाली असावी. अशा हत्यारात पोलादाचे बेट लावलेली लाठीही असू शकते. मयताच्या कपड्यांना रक्ताच्या डागाशिवाय गुराच्या शेणामुताचे डाग आहेत. मी तपासले त्या वेळी धोतर ओले होते व ते शेणाचे डाग दाखवत होते व मुताचा वास मारीत होते. डोक्याच्या जखमेमुळे मेंदूजवळच्या हाडाचा तुकडा फुटून मेंदूला इजा झाली व रक्तस्राव आतल्या आत झाला. त्यामुळे

तोंडातून रक्त निघाले. मयताचा मृत्यू याचमुळे झाला. तपासणीच्या वेळी मयताच्या कोठयात न पचलेले अन्न सापडले. यावरून मयताचा मृत्यू जेवल्यानंतर पावणेदोन–दोन तासांत झाला असावा. तपासणीच्या वेळेपासून १०–१२ तास पूर्वी म्हणजे साधारणतः आदल्या रात्रीचे ९ ते १० च्या दरम्यान झाला असावा. मयताच्या डोक्यात बोथट हत्याराचा मार मयताच्या पाठीमागून मयत उभा असताना त्याच्या डाव्या बाजूने मारला असावा,' इत्यादी सांगितले. माझ्या उलटतपासणीत जोरावरसिंगाच्या जखमेबद्दलही रिपोर्टावरून सांगितले व ती जखम कपाळावर समोरच्या बाजूने बोथट हत्याराने मारल्यामुळे झाली असावी. जखमेवरून व तपासलेल्या माणसाच्या जन्मखुणेवरून तो माणूस कोर्टात अभियुक्तांच्या पिंजऱ्यात उभा असलेला जोरावरसिंग आहे, वगैरे सांगितले. या पुराव्यानंतर अभियोगपक्षाचा पुरावा संपला.

त्यानंतर अभियुक्तांचे एका पाठीमागून दुसरा अशा क्रमाने जबाब नोंदविले गेले. कल्याणसिंगाने सांगितले की, घटनेच्या दिवशी मी तापाने फणफणून आजारी होतो व घरात खाटेवर निजून होतो. दुसऱ्या दिवशी उजाडताच मला माझ्या घरात ताप असतानाच पकडले व त्यानंतर मुरार छावणीच्या इस्पितळात ठेवले. तेथे ताप उतरल्यानंतर ठाण्यामध्ये कैदेत राहिलो व संध्या कारागृहात न्यायिक बंदीगृहात कैदेत आहे. जोरावरसिंगाने सांगितले की, घटनेच्या दिवशी रात्री ८॥–९ च्या दरमियान कप्तानसिंग जमीनदार, न्हावी, दोन जाटव व आणखी दोन लोक बरोबर घेऊन त्यांच्या गोठ्यावर आला व तारांचे खांब खोदलेल्या गड्ड्यांत उभे करू लागला. मी तेथे गुरांचे शेण सावडीत होतो. माझे तीन काकाही चाऱ्याचा गळाठा रचून ठेवीत होते. हरकू ढीमर गुरांना पाणी दाखवीत त्यांना वेगवेगळ्या खुंटांना बांधीत होता. कप्तानसिंगाला बघून मी पुढे झालो व त्याला कुंपणाचे खांब तेथे उभे न करण्याबद्दल हात जोडून विनवू लागलो, तर कप्तानसिंगाने मला शिव्या देऊन 'भाग जावो' म्हणून हातातल्या बंदुकीचा हवेत बार उडवला व म्हणाला की, 'नहीं भागोगे तो एकेकको गोलीसे उडा दूंगा!' मी घाबरून माझी लाठी शोधू लागलो तर, न्हाव्याने पुढे होऊन माझ्या डोक्यात लाठी मारली. माझ्या कपाळावर मोठी जखम झाली. भळाभळा रक्त वाहून मला दिसेनासे झाले. माझे तीन काका व हरकू ढीमर माझ्या मदतीला म्हणून पुढे झाले, तर त्यांनाही कप्तानसिंगाच्याबरोबर आलेल्या लोकांनी मारले. मला नीट दिसत नव्हते. कप्तानसिंगाने पुन्हा बंदुकीचा दुसरा बार हवेत उडवला व तोंडाने 'भाग जावो, नहीं तो सबको गोलीसे उडा दूंगा!' असे ओरडत राहिला. इतक्यात कप्तानसिंगाच्या पाठीमागून अंधारातून कुणीतरी पुढे येऊन त्याने कप्तानच्या डोक्यातच लाठी मारली. त्या माराने कप्तानसिंग एकदम तेथेच पाठीवर उताणा जमिनीवर पडला. त्या जागी शेणामुताने जागा ओली होती. तेथेच दोन–चार मिनिटांतच कप्तानसिंग थंडा झाला. पाठीमागून मारणारा माणूस पळून गेला. तो माणूस अंगावर लिहाफ–पातळ रजई लपेटून आला होता. तो कोण होता, हे कळले नाही. कप्तानसिंगाला मी किंवा आमच्या तिन्ही काकांनी किंवा हरकू ढीमरने लाठी मारली नाही. कप्तानसिंगाच्या चबुतऱ्यावर आम्ही मारामारी केली, ही घटना खोटी आहे. घटना आमच्या गोंड्यावरच घडली. ठाणेदारसाहेब लगेच–थोड्याच वेळात गावात आले व त्यांनीच ही घटनास्थळाची फिरवाफिरवी केली. मी पूर्णतः निर्दोषी आहे, वगैरे सांगितले. जोरावरसिंग कोर्टाकडे बघत हात जोडून शांतपणे कोर्टाच्या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देत होता. त्यानंतर जोरावरचे तीन काका व हरकू ढीमरनेही वरच्या गोंड्याच्या घटनेचे जोरावरसिंगाप्रमाणेच जबाब दिले. चार मुलांनी 'आम्ही त्या दिवशी संध्याकाळीच मुरारला जायला गावातून बाहेर पडलो. रात्रीच्या शेवटच्या सिनेमाचा शो श्री सिनेमामध्ये पाहिला. आम्ही गावात पहाटेच्या वेळी परतलो, तर गावाच्या शिवेवरच पोलिसांनी आम्हाला पकडले. आम्हाला घटनेविषयी काही माहीत नाही. आम्ही काही मारामारी केली नाही. आम्ही बेगुनाह आहोत, वगैरे सांगितले. चारी मुले व विशेषतः मुन्ना आपल्या चेहऱ्यावर कोणताही काळजीचा भाव न दाखवता मोकळ्या वृत्तीने उत्तरे देत होता.

मी बचाव पक्षाचा पुरावा म्हणून मुरारच्या श्री सिनेमाच्या मालकांना बोलावून घटनेच्या दिवशीच्या रात्रीच्या तिसऱ्या शोच्या तिकिटांच्या काऊन्टरफॉईलचे कट्टे–पुस्तके घेऊन बोलावले होते. त्यांनी पुराव्यात आलेल्या चार तिकिटांचे नंबर वाचून त्याप्रमाणे त्या त्या तिकिटांची प्रतिप्रत – काऊन्टरफॉईल आपल्याजवळच्या कट्ट्यामधून काढून दाखवली. इतकेच नव्हे तर, त्यांनी सहजच म्हणून 'मी जवळवाडीच्या मुन्नाला व त्याच्या भावांना ओळखतो. मुन्ना फार चांगला मुलगा आहे. चारी भाऊ चांगले आहेत कधी कधी मला त्यांच्या शेतावरच्या मोठ्या विलायती मटारच्या शेंगा, मक्याची दुधाळ कणसे आणून देतात. माझ्याशी पाहिलेल्या सिनेमाबद्दल जाणकार माणसांसारखी चर्चा करतात.' म्हणून सांगितले. हे गृहस्थ संस्थानच्या एका नामवंत व कुळवंत जहागीरदारांचे चिरंजीव होते व फार सज्जन गृहस्थ म्हणून प्रसिद्ध होते. त्यांची साक्ष ऐकून श्रीमान न्यायाधीश महोदयांनी ज्या कौतुकाच्या दृष्टीने मुन्नाकडे व त्याच्या भावांकडे पाहिले होते, ते पाहून कोणालाही विश्वास वाटावा की... पण तसे कशाला सांगू? कहाणीत पुढे कळेलच. बचाव साक्षी म्हणून गावच्या वृद्ध पंडितजीची साक्ष झाली. त्यांनी 'मारामारी कल्याणसिंगाच्या गोंड्यावर झाली. कप्तानसिंगाच्या चबुतऱ्यावर झाली नाही. माझे घर कप्तानसिंगाच्या वाड्याला लागूनच आहे. पुलिसांनी कप्तानसिंगाचे प्रेत कप्तानसिंगाच्या चबुतऱ्यावर आणून ठेवले,' वगैरे सांगितले.

आरोपी–अभियुक्तांच्या जबाबानंतर व बचावपक्षाच्या पुराव्यानंतर मला काही फारसे सांगावे लागलेच नाही. अभियुक्त जोरावरसिंगाचा जबाब हीच न्यायालयात शपथ न घेता सांगितलेली सत्य घटना आहे व तिचे घटनात्मक समर्थन–फॅक्चुअल करोबोरेशन–Factual Corroboration – अभियोगपक्षाच्या पुराव्यानेच व डॉक्टरी रिपोर्टाने होत आहे. पुलिसांची केस खोटी आहे. पुलीसचे साक्षीदार खोटे बोलत आहेत, वगैरे सांगितले. उत्तरादाखल पुलीसकडून गव्हर्न्मेंट अॅडव्होकेटचे भाषण झाले ते रीतसर पण जुजबीच झाले. 'भाचेबाबू' समोर आले नाहीत, की त्यांनी आपली हाय्यर इंग्लिशची व शेक्सपीयरच्या नाटकांची विद्या या केसमध्ये तर्कनिवेदनांकरता पाजळली नाही. निर्णयाकरिता एक आठवड्याची

तारीख लागली.

त्याच्या आठव्या दिवशी श्रीमान सत्रन्यायाधीश महोदयांनी आपला निर्णय लिहून आणला. थोडक्यात निर्णय ऐकवला. 'पुलिसांची केस नितांत खोटी आहे. अभियुक्तांना इरादतन्–हेतूपूर्वक व मयताचे शत्रू म्हणून पकडले आहे. मूळ चूक मयत कप्तानसिंगाची होती. मयत कप्तानसिंगाला कोणी लाठी मारली हे पुलिसांच्या पुराव्यावरून सिद्ध होत नाही. जोरावरसिंगाची लाठी कप्तानसिंगाच्या डोक्यावर पाठीमागच्या बाजूने लागणे संभवत नव्हते. चारी मुले घटनास्थळी हजर नव्हती. मुरारला गेली होती. कल्याणसिंग घटनास्थळी येणे, त्याच्या आजाराचा विचार करता विश्वसनीय वाटत नाही. सर्व अभियुक्तगण निर्दोष आहेत. त्यांना दोषमुक्त व बंधमुक्त केले जात आहे. बंदीगृहात असलेल्या अभियुक्तांना तात्काळ बंधमुक्त करण्यात यावे.' वगैरे लिहून त्यांच्या निर्णयात चौकशी अधिकाऱ्याच्या गैरवर्तणुकीबद्दल तीव्र टीका केली व निणर्याची प्रतिलिपी राज्यशासनाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी, असा स्वतःच्या कोर्ट–अधिकाऱ्याला आदेश दिला.

या कहाणीचे सुफळंसंपूर्ण सांगायचे ते असे की, कप्तानसिंगाच्या मरणानंतर त्याच्या बावळट मुलाचे सर्व तऱ्हेचे संगोपन व त्याच्या सगळ्या शेतीवाडीची चोख व्यवस्था कल्याणसिंगबाबाने स्वतःच्या मुलाच्या आपुलकीने पाहिली व वेळेवर त्याचे लग्न करून देऊन त्याचा संसार थाटून दिला. मुन्ना ऊर्फ मुन्नेसिंग मॅट्रिकची परीक्षा पास होऊन शहरामध्ये गावच्या धान्याच्या विक्रीचे व दलालीचे दुकान चालवीत आहे. श्रीमान सत्रन्यायाधीश महोदयांच्या निर्णयावरून शासनाने पुलीस विभागाविरुद्ध काय कार्यवाही केली हे शासनालाच माहिती! सर्वसाधारण जनतेला असल्या गोष्टी कधीच कळत नाहीत, सांगितल्या जात नाहीत!

कल्याणसिंग दिवसेंदिवस थकला आहे. कधी कधी शहरात आला म्हणजे वकिलांच्या कचेरीत येऊन घटकाभर बसून गावची 'खुशहाली' सांगतो. मी कल्याणसिंगाला पुष्कळदा विचारले की, मयत कप्तानसिंगाच्या डोक्यात रात्रीच्या अंधारात गाडीवाटेने मागून येऊन लाठी मारणारा कोण होता म्हणून? तर तो नेहमीच सांगतो की, 'वकीलसाहाब! ईश्वर के घरका न्याव अजीब है. ईश्वर किसका रूप लेकर न्याय करनेके लिये खडा हो जाता है, हम कैसे जाने? छोडो इन बातों को! 'न्याव हुआ' इसी बात को लेकर आप हम ईश्वर का नाम लेते रहे!' नंतर थोडा वेळ थांबून पुन्हा म्हणतो, 'वकीलसाहाब! उस दिन कप्तानसिंग मारा न जाता, तो मैं इस बुढापे में निसंतान हो जाता! मेरा जोरावर तो मेरा इकलौता बेटा है–मेरा सबकुछ है!' मराठीमध्ये, 'वकीलसाहेब! ईश्वराच्या घरचा न्याय विलक्षण आहे. ईश्वर कोणाचे रूप घेऊन न्याय करायला उभा राहतो कोण जाणे? राहू द्या ह्या गोष्टी. 'न्याय झाला' या गोष्टीनेच आपण ईश्वराचे नामस्मरण करीत राहू या!' नंतर थोडा वेळ थांबून पुन्हा म्हणतो, 'वकीलसाहेब! त्या दिवशी कप्तानसिंग मारला न जाता, तर मी या म्हातारपणात निपुत्रिक होऊन जाणार होतो! माझा जोरावर तर माझा एकुलता एकच मुलगा आहे. माझे सर्व काही तोच आहे!' □



लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये

पुस्तके

## उत्तरे न देणारी म्हणून अस्वस्थ करणारी खानोलकरांची कादंबरी

# असाही एक अश्वत्थामा

नीलिमा दाणी

अगदी अलीकडे म्हणजे मार्च ७७ मध्ये प्रसिद्ध झालेली खानोलकरांची ही कादंबरी ! 'सगळं काही घडत असतं, अटळ असतं, आपण फक्त विचार करतो हे असं का घडलं याचा !' खानोलकरांच्या 'पाषाणपालवी'तील विक्रम असं म्हणतो. त्याचाच अनुभव ही कादंबरी वाचताना येतो. दोष कुणाचाच नसतो. परिस्थितीने वेगवेगळ्या घडणींची माणसं एकत्र आल्याने ते तसं घडणारंच असतं असं वाटायला लागतं; आणि कादंबरीच्या निराशाजनक शेवटाचा कार्यकारणभाव कुठेच लावता न आल्याने वाचक अस्वस्थ होतो. वाचून संपल्यानंतर विचार करायला लावणं हे खानोलकरांच्या सर्वच कादंबऱ्यांचं वैशिष्टय आहे.

खानोलकरांनी जीवन फार जवळून पाहिलंय् ! माणसाच्या मनाचा, संवेदनांचा आणि सहसंवेदनांचा पदर अन् पदर त्यांना गवसलाय्, कळलाय् ! अन् आपल्या कादंबरीतल्या प्रत्येक पात्राला ते असंच व्यवस्थित उघडून दाखवतात. तिथेच खानोलकरांची कादंबरी सर्वांहून वेगळी उठून दिसते. 'विकृतीच्या कुंठीत करणाऱ्या चमत्कारिक वास्तवाचे आकलन करणारे प्रयोग' म्हणून नरहर कुरुंदकर त्यांच्या कादंबरीचे वर्णन करतात. पण त्याहीपेक्षा संज्ञाप्रवाहाच्या साहाय्याने मानवी मनाचा तळ गाठणारे शब्दांकन म्हणून खानोलकरी साहित्याचा विचार व्हावयास पाहिजे. मानसिक विकृती केवळ ते पुढे मांडत नाहीत. अंतर्मनात दबलेले विकार व वासना यांच्या निर्मितीपासूनची प्रक्रिया ते पात्रापात्रांतून सूचित करतात. प्रत्येक कादंबरीत पात्ररेखाटनाची पद्धत ही अशीच सखोल आहे.

वांझपणामुळे पांगळ्यावर अफाट माया करणारी 'अजगर' मधील पावसकरबाई काय, किंवा लग्नाची ओढ लागल्यानें आप्पा सावकाराचा मार खाऊनही पुन्हा त्याच्याकडे जाणारी, राजकुमाराशी लग्न लावायला निघालेली 'चानी' काय त्यांच्या प्रत्येक कृतीतून, त्यांच्या विकृतीचा (craze) चा अर्थ लागत असतो. म्हणूनच त्यांच्या विकृतीचा अन् वास्तवाचा, समाजरचनेचा संघर्ष खानोलकरांच्या प्रत्येक कादंबरीतून प्रभावीपणे मनावर ठसतो.

'असा ही एक अश्वत्थामा'ची गोष्ट 'अश्वत्थामा' पेक्षा 'अश्वत्थाम्या'ने आपल्या पुत्राचा बळी घेऊ नये म्हणून जपणाऱ्या 'विजू'ची अधिक आहे. प्रेमाची उदात्त भावना नको इतकी जपणारी विजू. तिचं हे अफाट प्रेम आणि वात्सल्य हीच तिची विकृती ठरते. प्रियकरावरील प्रेमामुळेच कुमारी अवस्थेतील मातृत्वही ती अभिमानानं सोसते आणि त्या मुलाला जन्म दिल्यानंतर दुसऱ्या कोणालाही देह द्यायला नको म्हणून ऑपरेशन करून घेते. पण मुलाचा सहवास तिला मिळाला नाही. ते मूल तिचे गुरुजी वाढवतात. त्या प्रियकराने छिडकारलं असतानाही त्याच्याशीच प्रामाणिक राहते. तिचं लग्न होतं ते योगायोगाने मंत्री असलेल्या तिच्या प्रियकराच्या पी. ए. शी ! लग्नानंतर आपण वांझ आहोत असं म्हणवून घेत नवऱ्याशी सूडबुद्धीने वागणारी विजू म्हणजे तिच्या प्रियकरावरील प्रेमाची विकृतीच म्हणावी लागेल. तिचा नवरा वेलणकर हा सगळं माहीत असतानाही तसं न दाखवता निमूटपणे तिचा छळ सहन करीत असतो. विजू आतल्या आत धुमसते अन् त्याला छळण्यासाठी नवेनवे मार्ग शोधत असते. पण छळण्यातला आसुरी आनंद तिला मिळू नये म्हणून वेलणकर ते आघात सतत सोशीत असतो. खरा संघर्ष सुरू होतो तो वेलणकराने मंत्री-महोदयांचं चरित्र लिहिल्यानंतर ! ते चरित्र खोटं आहे, ते त्यांचं चरित्र नसून त्यांना व विजूला ओळखणारा त्यांचा बालमित्र पोपटकर याच्या त्यागमय आयुष्याचं, खऱ्या क्रांतिकारकाचं चरित्र असतं. अन् त्यात पोपटकर मेला असं लिहिलं असल्याने त्या खोटेपणाचा जाब विचारण्यासाठी परागंदा झालेला हा क्रांतीवीर पोपटकर परत येतो. वेलणकरनं चरित्र बदलावं म्हणून त्याला आग्रह करतो. त्याला सूड घ्यायचा असतो तो मंत्र्याचा ! पण त्यात बळी जाणार असतो विजूच्या 'ह्या' मुलाचा ! ज्याला आत्तापर्यंत सांगितलं असतं की, तुझे आई-वडील क्रांतीयुद्धात बळी पडले ! अन् त्याला वाचवण्यासाठी धडपडणारी विजू, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकणाऱ्या या खोटारड्या लोकांची खरी स्वरूपं उघडं करायला निघालेला पोपटकर व विजूच्या सर्व कारवाया सहन करणारा वेलणकर ही सर्व एकमेकांभोवती सतत कुंपणं उभी करीत असतात. वात्सल्याची राहिलेली भूक शेजारच्या 'मनू'वर प्रेम करून वेलणकर शमवीत असताना त्या भोळ्या मुलीला वेलणकरचा काहीतरी वाईट हेतू आहे असं सांगून तिलाही त्याच्यापासून तोडण्याचा प्रयत्न म्हणजे विजूच्या विकृतीचा, सूडबुद्धीचा अतिरेक आहे. आणि तेही दुःख एक अपरिहार्य वेदना म्हणून गिळणारा वेलणकर वाचकांच्या मनाला चटका लावून जातो. मनाची ही पराकोटीची अवस्था खानोलकरांनी सहजपणे उलगडली आहे. 'विल्यम जेम्स'ने शोधलेला संज्ञाप्रवाह खानोलकरी प्रतिभेने समर्थपणे आविष्कृत केला आहे असं म्हणतात. त्याचा अनुभव या प्रसंगी येतो. कविमनाच्या या लेखकाची भाषा शब्दांपलीकडचं बरंचसं काही बोलून जाते. एकटेपणा सोसणाऱ्या विजूचा 'एकटेपणा' खानोलकरांच्या भाषेत अतिशय बोचक होतो तो असा-

'अंतरीचे डोळे गहन भूतकाळाच्या वेशीवर रेंगाळत होते. गेलेल्या आयुष्याचे काही तुकडे खोल डोहावर पडलेल्या काळ्याशार सावल्यांसारखे, वेड्यावाकड्या फुटलेल्या काचेच्या तावदानांसारखे, संध्याकालीन

मेघांवरच्या विरत जाणाऱ्या संधिप्रकाशासारखे, फडफडाट करीत कुठल्या तरी रानात वादळ झालंय् म्हणून उडून गेलेल्या पक्षांच्या भेदरलेल्या थव्यासारखे, तुकडे, तुकडे–गतायुष्याचे! विजया एकटीच व्याहाळीत होती, व्याकुळ होत होती. एकटी, एकटी आणि अधिकच एकटी होत होती.'

मनं उकलण्याचं भाषेचं हे सामर्थ्य खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून जाणवतं! 'शब्द बोलतच नाहीत. त्याच्यामागची मनं तशीच्या तशीच आपल्यापुढे उभी राहतात. एक गूढ अशी मनांची गुंतागुंत खानोलकर पुढे ठेवतात.' खानोलकरांची पात्रं वैशिष्टयपूर्ण असतात अन् प्रत्येक कादंबरीत स्वतःला एकटं समजणारं एक तरी पात्र असतंच! 'अजगर'मधील स्वतःचीच पावलं मोजणारे पावसकर 'पाषाणपालवी'तील घड्याळाच्या चाकोरीत आपला एकटेपणा बांधून घेणारा विक्रम अखेर एकटाच उरतो. 'चानी'तील मामी एकटेपणानं स्वतःचं दुःख सोसते आहे तशीच 'अश्वत्थामा'तील ही विजू! ही तर स्वतःचा एकटेपणा जपण्याच्या नादात एका सज्जन माणसाला माणसातून उठवते व एका 'अश्वत्थाम्या'चा (पोपटकर) खून करते. सगळ्या कादंबऱ्यांच्या एकूण पात्ररेखाटनात 'अश्वत्थामा'तील पात्रं कळस गाठतात. एक मूल जिवंत असताना स्वतःच्या पूर्वीच्या प्रियकराशी एकनिष्ठ राहायचं, या प्रयत्नात, स्वतःला वांझ म्हणवून घेताना आलेला कडवटपणा व तिचा तो कडवटपणा अगदी सहजपणे पचवणारा वेलणकर! जुनं वैर साधण्यासाठी आलेला पोपटकर, सगळीच पात्रे विलक्षणच आहेत. संघर्ष होत नाही म्हणून आतल्या आत खचत जाणारी व पुन्हा नव्या दमानं फुत्कारणाऱ्या नागिणीसारखी विजू मनाला जखमा करून जाते. पण विजू दुष्ट आहे, हे आपण कबूल करू शकत नाही. ती एक आदर्श (फार तर अतिरेकी म्हणता येईल) प्रेयसी आहे. आदर्श माता आहे. मुलाला उद्ध्वस्त करायला निघालेल्या प्रत्येकावर ती घाव घालतेय्. वेलणकरला शह द्यायचा म्हणून 'मनू'च्या मनात नाही ते भरवून, तिला येऊ नको म्हणून सांगणारी विजू, 'मनू' तिच्या मुलाच्या प्रेमात पडलीय् असं कळताच तिच्यावर अपार माया करायला लागते. थोडक्यात विजू प्रेमांधळी आहे. स्वतःचा प्रियकर व मुलगा यापलीकडच्या जगाची तिला किंमत नाही. या कादंबरीत वेलणकरनं लिहिलेलं चरित्र खोटं आहे. त्यामागील खऱ्याचा स्फोट करणारा पोपटकर, त्यामुळे विजूच्या मुलाचं आयुष्य उद्ध्वस्त झालं तरी, त्याची पर्वा करणार नसतो. पर्यायानं विजूच्या मुलावर प्रेम करणाऱ्या मनूचंही आयुष्य वाऱ्यावर जाणार असतं. म्हणून या 'अश्वत्थाम्या'ला त्यापासून परावृत्त करण्याचा वेलणकर आटोकाट प्रयत्न करतात. पण शेवटी हार मानून 'मनू'चा बळी द्यायला तयार होतात. पण पोपटकर घराबाहेर पडण्यापूर्वीच विजू त्याच्यावर गोळी झाडते. या शेवटच्या प्रसंगातून वेलणकरची अगतिकता व विजूचा अतिरेकी स्वभावच खानोलकरांनी ठसवला नाही तर, अभिजात वात्सल्य व अभिरूप वात्सल्य यांतील सूक्ष्म छटा, सूक्ष्म भेद समर्थपणे दाखवला आहे. 'मनू' ही वेलणकरची पोटची मुलगी नाही. त्या मुलाला मात्र विजूने जन्म दिला आहे.

एकातून एक अशी पात्रांच्या मनोविकारांची गुंफण सहज साधली आहे! मन, अंतर्मन, संवेदना इत्यादी गोष्टींचे धागेदोरे खानोलकरांच्या प्रतिभावंत कवीला सापडले आहेत. म्हणूनच ते फक्त उलगडून दाखवतात. कुठेही विचार लादत नाहीत. विचारांशी गुंतागुंत सुरू होते ती वाचकांची! विजूचा दुष्टपणा, वेलणकरवरचा अन्याय सगळं पाहूनही विजूबद्दल साहानुभूतीच वाटते. पोपटकरच्या सच्चेपणाबद्दल कौतुक वाटतं. वेलणकरच्या सोशिकतेची कीव येते. एकूण सगळीच पात्रं साहानुभूती घेऊन जातात. नक्की कोण चुकलं, त्याचा निर्णय घेता येत नाही. सगळं असंच घडायचं होतं, अपरिहार्य होतं. यापलिकडे उत्तर नाही. उत्तरं न सापडल्याने कादंबरी मनाचा ठाव घेऊन बसते. प्रत्येक कादंबरीत असंच वाचकांच्या खांद्यावर ओझं टाकून खानोलकर कादंबरी संपवतात. ¤

असाही एक अश्वत्थामा
प्रकाशक
प्रमोद प्रकाशन,
सदाशिव पेठ, पुणे

## सर्वोत्तम लेखक ('टाईम' वरून)

# फ्रान्झ काफ्का

परिचय : जे. एन्. पोंडा
(फिनिक्स लायब्ररी, पुणे)

फ्रान्झ काफ्का (१८८३–१९२४). तुम्ही लहान असताना, तुमच्यापुढे कुणी पारा असलेली बशी पुढे करून, 'घे यातला तुला हवा तेवढा पारा. पण घेताना फक्त तुझी चिमुटच वापर, असे सांगितले होते का? तुम्ही ५–६ वेळा शिकस्तीने प्रयत्न करून आश्चर्यचकित झाला असाल. मोठेपणी तुम्हाला कुणी फ्रान्झ काफ्का वाचायला सांगितले असेल तर, काफ्का वाचून तुमची अवस्था चिमटीने पारा उचलण्यासारखीच होईल!

फ्रान्झ काफ्काने ६–७ च पुस्तके लिहिली आहेत. ती सर्व अपूर्ण आहेत. पण या पुस्तकांनी इंग्रजी साहित्यात इतका धुमाकूळ उडवून दिला आहे की, फ्रान्झ काफ्का व त्याच्या पुस्तकावरच नवीन नवीन साहित्य सातत्याने निघत आहे. फ्रान्झ काफ्काचे साहित्य म्हणजे बहुतेक सर्व रूपककथा (allegorical tales) आहेत. त्यामुळे त्यांतून हवे तेवढे अर्थ काढता येतात.

त्याचे सबंध आयुष्य किती विरोधाभासाने भरले होते ते बघा. काफ्का ज्यू होता आणि त्याची साहित्याची भाषा जर्मन होती! काफ्का स्वतः अंगदी नाजूक व अती संवेदनाशील होता. तो इतका sensitive होता की, काही लोकांना ही संवेदनाशीलता pathological होती की काय असा प्रश्न पडे. याउलट काफ्काचे वडील हे इतके बेरड व भरड होते की, त्याच्या मुलाच्या साहित्यिक महत्त्वाकांक्षांकडे त्यांनी कधी ढुंकूनही पाहिले नाही. असल्या पित्याने फ्रान्झ काफ्काला आयुष्यभर पुरून उरेल इतका न्यूनगंड दिला! काफ्का प्रेमासाठी हपापलेला होता, पण त्याचे कोणतेच प्रेमप्रकरण यशस्वी झाले नाही. प्रेमपत्रे

लिहिण्यात त्याने पोस्टेज स्टॅम्प्स मात्र खूप खपवले ! या प्रेमपत्रात प्रेमाखेरीज इतर भरपूर विधाने पण आहेत व त्यावरून काफ्काची बरीच माहिती मिळते.

काफ्का कधीच अमेरिकेला गेला नव्हता, परंतु अमेरिका व अमेरिकन जीवन टिपणारी कादंबरीच त्याने लिहिली आहे ! काफ्काच्या साहित्यातील वर्णने विलक्षण वस्तुनिष्ठ असतात; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती वाचताना आपल्याला सारखा अवास्तवतेचा, रहस्यमय वातावरणाचा भास होत राहतो. काफ्का एक अत्यंत हुशार, पदवीधर कायदेपंडीत होता, पण उदरनिर्वाहासाठी त्याने साधी कारकुनीच केली. तो सतत साहित्य लिहित असे, परंतु तो त्या साहित्याच्या प्रकाशनाबद्दल नेहमीच नकार देत असे ! 'मी दिवंगत झाल्यावर माझे कोणतेच पुस्तक प्रसिद्ध करू नये' अशा सूचना त्याने दिल्या होत्या. पण त्याचा मित्र Max Brod याने त्यान जुमानता काफ्काची पुस्तके प्रसिद्ध केली. Max Brod नी त्याच्या या अपूर्ण कादंबऱ्या छापून १९३० च्या सुमारास युरोपमध्ये खळबळ उडवून दिली. त्याच्या पुस्तकात कमालीचे गांभीर्य असते, पण ही पुस्तके वाचताना बऱ्याच वेळा आपल्याला हसु आवरत नाही. डॉस्टॉव्हेस्कीची शैलीसुद्धा काहीशी अशीच आहे. दोघांच्या शैलीत वस्तुनिष्ठ वर्णने व एक प्रकारचे रहस्यमय वलय आहे. एकाच जीवनात हे इतके विरोधाभास ! काफ्काच्या कृश देहाने व संवेदनाशील मनाने काय काय यातना सोसल्या असतील ! नियतीने त्याला सावज बनवले होते. हरीणाला हिंस्र सिंह जसा मानगुटीत धरून फरपटत नेतो त्याप्रमाणे कोणतीच दया न दाखवता नियतीने काफ्काला छळले. त्याचे शेवटचे दिवस मात्र सुखात गेले. त्याला डॉरा डायमन्ट नावाची १९ वर्षे वयाची ह्यू मुलगी भेटली. तीच त्याची मुलगी, आई, नर्स व मैत्रीण झाली. काफ्काला अशीच स्त्री पाहिजे होती. त्याला जी प्रसिद्धी मिळाली तीसुद्धा मृत्यूनंतर ! पहिल्या महायुद्धानंतर जो चलनफुगवटा झाला त्यात काफ्काचे हाल हाल झाले. या सुमारालाच त्याला क्षय झाला होता.

काफ्का व डॉस्टॉव्हेस्की हे मोठे लेखक झाले नसते तर, मशहूर मानसशास्त्रज्ञ झाले असते. माणसाचे मन कसे कोलांटउड्या मारते त्याचे निरीक्षण या दोघांनी चांगलेच केले होते. माणसाचे guilt या दोघांच्या साहित्यातून सारखे डोकावत असते. नील आर्मस्ट्रॉंग वगैरे मंडळींनी जसे outer space explore केले होते तसे या दोघांनी inner space explore केले !

आता काफ्काची एक दीर्घ रूपककथा Metamorphosis ( बदललेले रूप ) बघूया. ही कथा अंगावर शहारे आणणारी आहे. या कथेत एक तरुण मिळवता मनुष्य सकाळी उठत असताना, तो एक किडाच झाला आहे असे त्याला आढळते. पण सुरवातीला त्याला ते खरेच वाटत नाही. पण हळूहळू हे काही भयानक स्वप्न नाही हे त्याला पटते. त्याचे आईवडील व घरातील इतर मंडळींना भयानक धक्काच बसतो. पण दुःखापुढे मनुष्याची प्रतिक्रिया कशी बदलत जाते ! त्या बसलेल्या धक्क्यातून आईवडील सावरतात व आपल्या मुलाला या झालेल्या प्रकारामुळे किती दुःख होत असेल याचाच विचार ते करीत बसतात. त्या कपाळकरंट्याला ते अपार प्रेम व माया दाखवतात. थोड्या दिवसांनी मात्र त्यांचे प्रेम आटते व आपले अपत्य एक कीडा झाला आहे या प्रकाराबद्दल व आपल्या मुलाबद्दल त्यांना अत्यंत राग येतो. आणखीन थोड्या दिवसांनी या रागाचे रूपांतर छी – थू मध्ये होते व शेवटी शेवटी त्या कीडा झालेल्या मुलाकडे ते ढुंकूनसुद्धा बघायला तयार नसतात. तो कीडा जेव्हा मरतो तेव्हा झाडणारी बाई हळूच आईवडीलांना सांगते की, त्या त्रांगड्याची विल्हेवाट मी लावली आहे. तुम्हाला काही ( प्रेताची विल्हेवाट लावायची ) काळजी नको. यावर कामात गुंग असलेले त्या 'किड्याचे' आईवडील वर न बघता 'हं' म्हणतात !

किती कमकुवत माणसाचे मन असते ! आपल्याच घरात कुणी दीर्घकाळ आजारी असले तर, आपल्यासुद्धा प्रतिक्रिया अशाच बदलत जातात – हे बऱ्याच लोकांना दिसून आले असेल.

माणसाच्या शरीरात रोगजंतूंनी प्रवेश केला की, त्याचा प्रतिकार antibodies करतात. माणसाच्या मनाचीसुद्धा स्वयंचलीत यंत्रणा (defence mechanism) अशी असते की, आपले मन कसेतरी वळवायला आपण rationalise करीत असतो, इतरांवर खापर फोडत असतो. आपला self-esteem ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.

काफ्काची ही गोष्ट आत्मचरित्रात्मक आहे.

काफ्काला अनुकरण करण्यासाठी father-figure नव्हता. फ्रॉईडच्या म्हणण्याप्रमाणे लहानपणी आईचे प्रेम जिंकण्यासाठी लहान मुलाची बापाशी स्पर्धा होत असते. सर्वसामान्यपणे मुलाची आई बापावर प्रेमाचा वर्षाव करीत असते. लहान मुलाला असे वाटते की, आपणसुद्धा बापासारखे वागावे म्हणजे आई आपल्यावर प्रेमाची खैरात करेल. नॉर्मल सायकॉलॉजिकल डेव्हलपमेंटसाठी याची आवश्यकता असते. पण काफ्काचा बाप कसा होता हे आधीच सांगितले आहे. मुलगा पुढे मोठा झाला की, दुसऱ्या कुणाला father-figure करण्यासाठी धडपडतो आणि त्याला कुणीच तसे मिळाले नाही तर, आयुष्यभर त्याच्या psyche मधल्या जखमा भरून येत नाहीत.

The Castle या काफ्काच्या पुस्तकात नायक K ( काफ्काच्या नायकाचे नाव Joseph K, नुसता K व 'अमेरिकेमध्ये' कार्ल रोझमेन अशी आहेत. ) हा किल्ल्यात प्रवेश घेण्यासाठी धडपडत असतो. असाही एक दृष्टिकोन आहे की, तो किल्ला म्हणजे mother-figure ( incest ) व त्या किल्ल्यात प्रवेश नाकरणारा काऊंट हा father-figure ( authority ) आहे. या दृष्टिकोनानुसार काफ्काचे साहित्य मनोविश्लेषणाच्या प्रतिकाने गुंफलेले आहे.

आता Marxist काफ्काच्या साहित्याचा अर्थ कसा लावतात ते बघा. त्यांचे म्हणणे असे की, काफ्काचे साहित्य म्हणजे लाल फितीवर व जहागीरदारीवर उपहास !

परंतु काफ्काचा मित्र Max Brod व इंग्रजी भाषांतर करणारा एडविन मुइर यांनी काफ्काच्या साहित्यात धार्मिक मुद्दे आहेत असे सांगितले आहे.

काफ्काला सॉरेन किर्केगार्द या अस्तित्ववादी लेखकाची पुस्तके फार आवडत असत. ( इथे असे नमूद करायला हवे की, अस्तित्ववादाचे तीन प्रकार आहेत. सॉरेन किर्केगार्दचा अस्तित्ववाद ख्रिश्चन धर्माला

मानतो. मार्टीन हायडेगर व ज्यॉं पॉल सार्त्र यांचा अस्तित्ववाद देवाला मानत नाही. जॅक्वीस मारीटॅनचा अस्तित्ववाद सेंट थॉमस ॲक्वीनासच्या आदर्शाप्रमाणे देवावर विश्वास ठेवतो. ) The Trial मधील Joseph K ला एके दिवशी कारणाशिवाय अटक केले जाते. हा K म्हणजे originally sinful असलेली सबंध मानवजात आहे असे मॅक्स ब्रॉड व एडविन मुइर यांना वाटते आणि ज्या कोर्टातून K न्याय मिळवण्याची धडपड करतो ते कोर्ट म्हणजे नियतीच.

'द कॅसल' मधला K एका गावात 'लॅंड सर्व्हेअर'चे काम बघायला येतो. परंतु त्याला 'कॅसल' मधून त्याच्या कार्याचे क्षेत्र कोणते व इतर काहीच सूचना मिळत नाहीत. हा K म्हणजेच मानवाचे कार्य काय, अर्थ काय व सत्य काय याचा शोध घेणारी माणसे.

'दी ट्रायल' मध्ये काफ्काचा नायक कोर्टाच्या दारापाशी प्रवेश मागतो परंतु तिथला द्वारपाल त्याला प्रवेश नाकारतो. म्हणून हा नायक आयुष्यभर बाहेर स्टूलावरच बसून राहतो !

फॅलॉइस बॉयलर ही बाई १९१४ ते १९१७ च्या दरम्यान दोनदा काफ्काची प्रेयसी झाली होती. या बाईला काफ्काने भरपूर पत्रे लिहिली. काफ्काच्या सुप्त मनात लग्न करणे शक्यतेवढे पुढे ढकलायचे असे होते. फॅलॉइस बॉयलरशी जर त्याने लग्न केले असते तर, काफ्काचा एक पत्रमित्र हरवणार होता ! एकदा काफ्काने फॅलॉइसला लिहिले होते, 'मी साहित्याचा बनलो आहे. साहित्य माझ्या अणूरेणूत घुसले आहे त्यामुळे मी दुसरे काहीच करू शकत नाही !' फॅलॉइस अंगाने मांसल होती. बटबटीत होती. काफ्का अगदी कृश होता. एका पत्रात त्याने लिहिले होते, 'माझ्यासारख्या सपाट, हाडकुळ्या माणसावर तुला प्रेम करावेसे वाटेल का ? प्रेम आलं म्हणजे शरीराचं वजन आलंच !' या ना त्या कारणाने तो लग्न पुढे ढकलत होता. त्याच्या मनात एक दाट शंका होती. आपले लग्न झाले तर साहित्य बाजूला पडणार तर नाही ना ? साहित्य आणि लग्न याची सांगड मला घालता येणार नाही, असे त्याला वाटे.

कधी कधी त्याच्या मनाप्रमाणे लिखाण झाले नाही तर, काफ्का जमिनीवर कोथळ्यासारखा कोसळून जाई ?

एकदा 'टाईम' मासिकाने एका लढाऊ आगबोटीला U. S. S. Franz Kafka असे नाव दिले होते ! लिटन इंडस्ट्रिजने बांधलेली ही एक लढाऊ आगबोट पुरविण्यासाठी इतक्या अटी आणि नियम आहेत की, याला लालफितीमुळे व bureaucracy मुळे S. S. Franz Kafka असे नाव द्यावे असे 'टाईम'ने सुचवले !

आता शेवटी काफ्काच्या फोटोवरून त्याचे वर्णन करतो. काफ्का अंगाने अगदीच सडपातळ होता. त्याची गालफडे आत बसलेली होती. जीवणी अगदी दोऱ्याच्या रेषेसारखी होती. डोळेही थोडेसे तारवटलेले होते. अरुंद कपाळावर केसाची ठेवण थोडीशी बायकी होती. नाकही पातळ व लांब होते. सबंध चित्र बघून पातळ नाकपुडचा काफ्त आहेत की काय असाच भास होतो. आता कल्पना करा की, एवढ्या sensitive चेहऱ्यावर पातळ पुढे आलेले कान कसे दिसत असतील ? ते कान नव्हेच. जणू भोवतालची वास्तवता अगर अवास्तवता ग्रहण करण्यासाठी ते sensitive antennae च आहेत असे वाटते !

□


**नवीन दाखल झालेली काही पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| १. | डोंगर म्हातारा झाला : ( कादंबरी ) अनिल बर्वे | रु. १०/– |
| २. | पानाआडचे फूल : ( पत्रांद्वारे प्रगट झालेले आत्मकथन ) आशालता सावे. | रु. २०/– |
| ३. | तुलसी रामायण : निवेदक : ग. दि. माडगूळकर | रु. ४०/– |
| ४. | भाकरी आणि स्वातंत्र्य : ( व्याख्याने ) ग. प्र. प्रधान | रु. ८/– |
| ५. | R डॉक्युमेंट : ( अमेरिकेतील आणीबाणीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी ) लेखक–आर्यविंग वॉलेस, अनु–अशोक जैन | रु. १०/– |
| 1. | **Money Whence It Came Where It Went** : ( Management) J. K. Galbraith | Rs. 19/– |
| 2. | **In The Beginning** : ( Bestseller – Novel ) Chaim Pobok | Rs. 20/– |
| 3. | **1876** : ( Bestseller – Novel ) Vidal Gore | Rs. 16/– |
| 4. | **Kinflicks** : ( Bestseller – Novel ) Lisa Alther | Rs. 16/– |
| 5. | **Pather Panchali ! ( Picture Story ) Bibhutibhushan Banerji** | Rs. 12.50 |

● Watching TV will make you a conformist – but book reading will make you an individualist !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

## ☐ मा. यशवंतरावांचे 'ते' भाषण

सध्याचे विरोधी पक्षनेते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामीपणाविषयी कुणाच्याही मनात अगदी तीळमात्रसुद्धा शंका येण्याचे कारण नाही, इतके ते पुरोगामी आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून अगदी आजतागायत सत्तारूढ पक्षात अगदी वरच्या पातळीवर राहून, वेगवेगळ्या मोक्याच्या अन् महत्त्वाच्या जागी सातत्याने काम करून त्यांनी आपली पुरोगामी प्रतिमा आज अगदी पक्की करून ठेवली आहे. गेल्या तीस वर्षांत भारताची विविध क्षेत्रांत जी काही प्रगती झाली, (काही संकुचित दृष्टीची मंडळी याला अर्थातच नकार देतात; पण त्यांची वृत्ती प्रतिगामी असल्याने त्याकडे दुर्लक्ष करणेच बरे!) यामध्ये काँग्रेसचा फार मोठा वाटा होता हे कुणीही मान्य करील. काँग्रेसच्या पुरोगामी नेतृत्वापायीच तर हे सारे शक्य झाले, आणि देशाच्या राजकारणाला हे असले पुरोगामी वळण लावण्यामागे यशवंतरावांचा फार मोठा हात होता. त्यांनी भूषविलेल्या विविध सत्तास्थानांचे ते फळ होते. महाराष्ट्रात जन्माला येऊनही इतके पुढे जाणारे पुरोगामी यशवंतराव चव्हाण हे अजूनही त्यांच्या चाहत्यांचे अतिशय लाडके नेते आहेत.

यशवंतरावांविषयी येथे लिहिण्याचे कारण असे की, परवाच मुंबईत त्यांचे भाषण झाले. जबाबदार विरोधी पक्षनेत्याच्या भूमिकेत त्यांच्या या भाषणाचे महत्त्व विशेषत्वाने जाणवले. ही विरोधी पक्षनेत्याची आजची त्यांची नवी भूमिका त्यांच्या आजवरच्या पुरोगामीपणाशी काहीशी विसंगत वाटली तरी, ह्या भाषणात मात्र त्यांनी ही विसंगती पुरेपूर खोडून काढली आणि काँग्रेसच्या आणि आपल्या पुरोगामीपणाची पुन्हा एकदा तुम्हा आम्हाला याद करून दिली. हे त्यांचे भाषण नेहमीप्रमाणेच अगदी शैलीदार, खोचक वगैरे होतेच, पण याखेरीज त्यात आम्हाला काही थोडे महत्त्वाचे आणि नवीन मुद्देही मिळाले. गेली कित्येक वर्षे सत्तारूढ पक्षात राहिल्याने दुर्दैवाने आम्हाला त्यांच्याकडून नवीन असे काहीच ऐकायला मिळाले नव्हते!

या भाषणात ते म्हणतात, 'देशातील पुरोगामी पक्ष आज जनसंघवासी झाले.' नुकतीच जनता पक्षाची रीतसर स्थापना झाली, त्या संदर्भात हे उद्गार आहेत, हे सुज्ञ वाचकास सांगायला नकोच.

तर हे वाक्य ऐकायला तरी गोड आहेच. एक–दोन जड शब्द त्यात आहेत. शिवाय वाक्यरचनाही बांधेसूद आणि नेटकी आहे. वर 'हे पक्ष जनसंघवासी झाले असे मी म्हणतो, कैलासवासी म्हणत नाही.' अशी एक कोटीही यशवंतरावांनी केली आहे. यशवंतरावांचा स्वभाव मूलतःच साहित्यिक आणि कोटीबाज. नुकतीच त्यांनी साहित्यिकांची 'विदूषक' म्हणून केलेली कोटी आताशा चांगलीच प्रचारात येऊ लागली आहे. पण या बाह्यसौंदर्याखेरीज हे वाक्य खूपच अर्थगर्भ आहे. कितीतरी गोष्टी यातून नव्यानेच उजेडात येतात.

पहिली गोष्ट म्हणजे आपल्या देशात काँग्रेस वजा करता इतरही काही पुरोगामी पक्ष होते, ही एक नवी बातमी या वाक्यातून मिळते. कारण आतापर्यंत आमच्या समजुतीनुसार सत्तारूढ काँग्रेस पक्ष आणि त्याचे मित्र हे अर्थात पुरोगामी आणि विरोधी पक्ष हे प्रतिगामी, जातीयवादी वगैरे वगैरे असे समीकरण घोकलेले. काँग्रेसशिवाय इतर कुणी पुरोगामी असेल, अशी पुसटशी शंकासुद्धा आम्हाला आली नव्हती. पण पुरोगामी विचारवंतांचे अग्रणी मानल्या जाणाऱ्या यशवंतरावांनीच असे म्हटल्यावर आमचा प्रश्नच मिटला. तर अशा रीतीने काँग्रेसव्यतिरिक्त इतरही काही पक्ष पुरोगामी आहेत, हे तरी आता मान्य झाले. पुरोगामी म्हणजे काय, या व्याख्येचा कीस काढण्याची आता काही जरूरी नाही. 'पुरोगामी म्हणजे काँग्रेससारखे' अशी कल्पना सामान्यांमध्ये इतकी रूढ होऊन बसली आहे की, काँग्रेसचा हा असला आणि इतका पुरोगामीपणा बघून, पुरोगामीपणाच वाईट, अशा निष्कर्षाप्रत काही मंडळी आली आहेत. असो. तूर्त आपण अशा मंडळींच्या अज्ञानाकडे दुर्लक्ष करू!

'आता हे पुरोगामी पक्ष जनसंघवासी झाले म्हणजे exactly काय झाले? अगदी खरं सांगायचं झालं तर, याचा अर्थ मलाही अगदी exactly सांगता येणार नाही! ते कैलासवासी झाले नाहीत, असे मा. यशवंतराव म्हणतात, त्यावरून ते जिवंत असावेत. कदाचित नेमक्या याच गोष्टीची त्यांना भीती वाटत असावी. परंतु ते जनसंघवासी कसे झाले, हे मात्र आपल्याला समजू शकत नाही. तरीदेखील यशवंतरावांनी ज्या संदर्भात आणि ज्या भूमिकेतून हे विधान केले, त्या अर्थी हे बरेच वाईट झाले, असे त्यांना सांगायचे असावे असे दिसते. जनसंघवासी होण्यात इतके वाईट काय असावे हे समजत नाही आणि जनता पक्ष आणि जनसंघ यांत काँग्रेसी मंडळींना साम्य का दिसत राहावे, हेही समजत नाही. माझ्या एका मित्राच्या मतानुसार दोन्ही पक्षांची नावे 'जन' अशी सुरू होत असल्याने त्यांचा हा गोंधळ होत असावा. अर्थात ही अगदी पांचट कोटी आहे! पण यशवंतरावांचे हे विधान मात्र विचार करावयास लावणारे आहे हे निश्चित.

या आपल्या भाषणात मा. यशवंतराव पुढे म्हणतात–

'आजच पक्ष स्थापन झाला, तेव्हा त्याच्या रूपाबद्दल मी आजच बोलण्यात घाई करतो असे कुणी म्हणेल, पण मूल जन्मल्यावर कुंडली मांडली जाते म्हणून बोलतो.'

आता कुंडलीवर किती लोकांचा विश्वास आहे या वादात पडण्याचे कारण नाही. पण अशा कुंडल्या मांडण्यात काही काही वेळा गफलत होण्याचा संभव असतो असे दिसते. कारण एकतर यशवंतराव विरोधी पक्षनेते होतील आणि असे त्यांच्या कुंडलीत लिहिले

असेल असे आम्हाला कधीच वाटले नव्हते. आणि स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा काँग्रेसची कुंडली लिहिली गेली तेव्हादेखील, त्यावरून कुणालाच आजच्या आणीबाणीचे आणि त्यातल्या अत्याचारांचे भविष्य वर्तविता आले नव्हते. कदाचित ही तेव्हाच्या ज्योतिषांची चूक असेल; पण अशी चूक यशवंतरावांकडून होऊ नये असे मात्र वाटते. अशी भविष्ये वर्तविण्यात कित्येक वेळा धोका संभवतो.

आपल्या या भाषणात मा. यशवंतरावांनी सत्तारूढ पक्षाला एक जालीम सवाल केलेला आहे. 'दीड वर्षात काँग्रेसच्या हातून झालेल्या चुकांची यादी किती दिवस वाचणार ?' असा हा सवाल आहे.

आता या प्रश्नाच्या संदर्भात एक थोडी जुनी आठवण येते. गांधी हत्या होऊन तीस वर्षे होत आली तेव्हा हा प्रश्नही आता जुना झाला असे मानायला हरकत नसावी. परंतु निवडणुकीच्या आधीच काही दिवस पुन्हा एकदा त्याची तीव्र आठवण तेव्हाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना झाली होती आणि जनसंघाला उद्देशून तेव्हा त्यांनी 'ज्यांनी गांधीहत्या केली ते काय गांधीवाद अंमलात आणणार ?' असा करडा प्रश्नही विचारला होता. तेव्हाही कदाचित हा प्रश्न यशवंतरावजींच्या मनात उभा राहिला असण्याची शक्यता आहे. त्यातून हा आरोप तर कधीच शाबीत न झालेला आहे. पण निवडणुकांच्या गडबडीत असल्याने यशवंतरावांना याबाबत विचार करण्यास आणि बोलण्यास सवड झाली नसावी.

एकंदरीत दीड वर्षातल्या आपल्या चुकांना सगळेच काँग्रेसवादी कंटाळलेले दिसतात. पण असे कंटाळून चालणार नाही. दीड वर्षातल्या चुकांना जर एवढ्यातच कंटाळाल तर अजून तीस वर्षातल्या चुका वाचायच्या आणि सुधारायच्या आहेत. या कामाचा तर त्यांना फारच कंटाळा येण्याची शक्यता आहे.

अशा रीतीने मा. यशवंतराव चव्हाणांचे हे भाषण विचाराला चालना देणारे आहे याविषयी शंकाच नाही. जाता जाता एकच गोष्ट सांगावीशी वाटते ती ही की, हे भाषण एक मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त माथाडी कामगारांच्या मेळाव्यासमोर झाले होते. तेव्हा या भाषणाचे प्रासंगिक औचित्य आणि त्याचा संदर्भ माथाडी कामगारांना पूर्णपणे समजला असेल असे वाटते. □

# अवती-भवती

पृष्ठ ४ वरून

राहिले. आणि परिस्थितीही अशी होती की संसदीय काँग्रेस पक्षाचे नेतृत्व चव्हाणांकडे जावे. आता काँग्रेस अध्यक्षपदी के. ब्रह्मानंदजी येणे म्हणजे घरी बसलेल्या बाईंना समाधान मिळणे, आणि के. ब्रह्मानंद रेड्डी यांचा आत्मा शांत होणे या दोन्ही गोष्टी आल्या. काँग्रेस पक्षाला काय किंवा साहेबांना काय या विशिष्ट परिस्थितीमध्ये आणखी काय हवे होते ? महाराष्ट्रामधील नाराज मंडळींची समजूत घालून साहेब, के. ब्रह्मानंदजींच्या मागे जाऊन उभे राहिले त्याची कारणमीमांसा ही अशी आहे. ¤

## चौधरी–चरणसिंह

विधानसभा विसर्जन प्रकरणी सगळ्यांत महत्त्वपूर्ण भूमिका केंद्रीय गृहमंत्री नामदार चरणसिंह यांनी बजावली. उत्तरेतील नऊ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिण्यापूर्वीच त्यांनी या प्रकरणातून केवढी वावटळ निर्माण होऊ शकेल याचा अंदाज घेतला असावा. त्यांनी प्रत्येक पाऊल आत्मविश्वासाने टाकले आणि अखेरीस सर्वोच्च न्यायालयाकडून शिक्कामोर्तब करून घेऊन नऊ राज्यांच्या विधानसभा पाण्यात बुडवल्या. चरणसिंह हे महाराष्ट्राला तसे फारसे परिचित नाहीत. उत्तर प्रदेशामध्ये त्यांनी जे राजकारण खेळले त्याचे साद पडसाद इकडे उमटत असत. परंतु आग्रही मताचा जाट नेता एवढाच त्यांचा आणि आपला परिचय. एक सिंह: चौधरी चरणसिंह या नावाने प्रसिद्ध केलेल्या लेखामध्ये 'धर्मयुग'ने त्यांचा परिचय करून दिला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची जडणघडण होत असतानाच चरणसिंह ही एक जबर शक्ती आहे याची जाणीव येऊन चुकली होती. प्रथम बाबुजींचे पंतप्रधानपद आणि नंतर उपपंतप्रधानपद गेले याचे कारण चौधरी–चरणसिंह. बाबुजींच्या बाबतीत त्यांनी इतकी टोकाची भूमिका घेतली होती की, केवळ मंत्री होण्यासाठी मी काँग्रेस सोडली नाही अशी कडवट प्रतिक्रिया बाबुजींनी नोंदवली. जनतेचे प्रचंड दडपण आल्याने बाबुजी प्रथम मंत्रिमंडळामध्ये आणि नंतर परिस्थितीमुळे जनता पक्षात आले तो भाग वेगळा. पण एखादा निर्णय घेतला की, त्याबाबत कोणतीही तडजोड न करता, त्याला घट्ट चिकटून राहण्याचे अजब धाडस चौधरीसाहेबांमध्ये आहे.

एक्याऐंशी वय असलेल्या पंतप्रधानांच्या मंत्रिमंडळामध्ये शोभून दिसेल असा चांगला पंचाहत्तरीचे वय असलेला हा गृहमंत्री आहे. एम्. ए. एलएल. बी. होऊन वकिली करत असतानाच चौधरी राजकारणामध्ये ओढले गेले. ब्रिटिश अमदानीमध्ये १९३७ साली झालेल्या निवडणुकांपासून ते सतत निवडून येत आहेत. आतापर्यंतचे त्यांचे राजकारण हे प्रांतिक पातळीवरचे होते. लोकसभेमध्ये ते १९७७ साली प्रथमच आले; आणि आले ते थेट गृहमंत्रिपदी बिराजमान झाले. उत्तर प्रदेशाच्या राजकारणाला देशाच्या राजकारणामध्ये असाधारण महत्त्व असतेच. जनता पक्षाचा उत्तर प्रदेशामधील सगळ्यांत मोठा नेता असे त्यांचे सध्याचे स्थान आहे. लोकसभेमध्ये येण्यापूर्वी उत्तर प्रदेशाच्या प्रादेशिक राजकारणामध्ये त्यांनी दीर्घकाळ अनुभव घेतला आहे. उत्तर प्रदेश विधानसभेमध्ये ते मेरठ जिल्ह्यामधील छपरौली मतदारसंघामधून सतत निवडून येत असत. तोच त्यांचा कायमचा मतदारसंघ. १९४६ साली कै. गोविंद वल्लभ पंत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असताना चौधरीजींची संसदीय सचिव म्हणून नेमणूक झाली. १९४८ पासून ५६ पर्यंत त्यांनी उत्तर प्रदेश विधान मंडळाच्या पक्षीय सचिवाची कामगिरी पार पाडली. आणि हे काम करत असतानाच १९५१ मध्ये ते उत्तर प्रदेशाच्या मंत्रिमंडळामध्ये दाखल झाले. डॉ. संपूर्णानंद मंत्रिमंडळामध्ये ते कृषी मंत्री होते. निर्भिड व स्पष्टवक्ता मंत्री म्हणून त्यांची ख्याती होती. मुख्यमंत्र्याबरोबर मतभेद होताच राजीनामा देऊन

ते बाहेर पडले. कै. पंडित नेहरू यांच्यासमोर बोलताना मी मी म्हणणारांची फॅफॅ उडत असे. पंडीतजी ऐन तेजामध्ये असताना १९५७ साली नागपूर येथे जे अधिवेशन झाले त्यावेळी जवाहरलालजींची सहकारी शेती संबंधीची मते ज्ञात असूनही चौधरीजींनी त्याविरुद्ध आवाज उठवला. व्यक्तिगत हितसंबंधांना बाधा येत असल्याने सहकारी शेतीमुळे उत्पादन घटेल असा विचार त्यांनी मांडला. स्वतःची जमीन आणि उत्पादित मालावर स्वतःचा अधिकार या गोष्टीच शेतकऱ्याला उन्हातान्हात कष्ट करण्यासाठी प्रेरणा देत असतात असे त्यांनी आग्रहाने सांगितले. आपल्या विधानाच्या समर्थनार्थ— त्यांनी महत्त्वपूर्ण आकडेवारी दिली. त्यांच्या या भाषणाला दाद मिळू लागताच ते म्हणाले; 'माझे विचार आपल्याला पटतात' असे दिसते परंतु मी ज्याप्रमाणे माझे विचार मोकळ्या मनाने मांडतो तसे मांडण्याचे धाडस आपल्याजवळ नाही. चौधरींच्या मतांशी कोणी सहमत होईल, कोणी होणार नाही, पण जवाहरलालजींना भर सभेमध्ये— वेगळा विचार ऐकवण्याचे धाडस त्यांनी केले -हे कसे नाकारता येईल.

१९६० साली चंद्रभानु गुप्ता यांच्या मंत्रिमंडळामध्ये ते गृहमंत्री होते. पुढे श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांनी पुन्हा शेती खाते सांभाळले. १९६७ साली मुख्यमंत्रिपदाची सूत्रे जेव्हा पुन्हा गुप्तांच्या हाती जाणार असे दिसू लागले त्या वेळी सी. बी. गुप्ता यांच्याविरुद्ध लढत देण्याची तयारी त्यांनी चालवली. वरतून दडपण आले. त्यांनी तात्पुरती माघार घेतली. आपली शक्ती एकत्र केली आणि गुप्ता मंत्रिमंडळाला सुरुंग लावला. एप्रिल १९६७ मध्ये त्यांनी कॉंग्रेसचा राजीनामा दिला आणि संयुक्त विधायक दलाचे नेतृत्व स्वीकारून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रिपद त्यांनी स्वीकारले. संयुक्त विधायक दलाचा कारभार फार काळ चालू शकला नाही. वर्षभरातच त्यांनी राजीनामा दिला. लागोपाठ विधानसभा बरखास्त झाली. १९६९ साली विधानसभेच्या फेरनिवडणुका झाल्या. चौधरीसाहेबांनी 'भारतीय क्रांती दल' नावाचा नवीन पक्ष स्थापन केला. कॉंग्रेसमधून फुटून निघालेला नेता, संयुक्त विधायक दलाचा राज्यकारभार यशस्वी करू न शकलेला मुख्यमंत्री, अशी त्या काळी त्यांची व्यक्तिगत प्रतिमा होती. पण जनसंघाची पीछेहाट घडवून आणून आपल्या नवीन पक्षाचे ९९ सदस्य त्यांनी त्या वेळी उत्तर प्रदेशमध्ये निवडून आणले. चौधरी चरणसिंह ही काय मोलाची शक्ती आहे, याचा पहिला प्रत्यय त्या वेळी आला. अपेक्षेप्रमाणे चरणसिंह फेब्रुवारी १९७० मध्ये मुख्यमंत्री झाले आणि 'आयाराम–गयाराम' राजकारण खेळले जाऊन केवळ सहा महिन्यांतच त्यांना पुन्हा राजीनामा द्यावा लागला. लोकशाही यशस्वी होण्यासाठी राजकीय विचारांच्या ध्रुवीकरण प्रक्रियेला चालना मिळाली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच १९७४ च्या ऑगस्टमध्ये त्यांनी भारतीय क्रांती दल, स्वतंत्र पार्टी, उत्कल कॉंग्रेस, संसोपा, राष्ट्रीय लोकतांत्रिक दल, किसान मजदूर पार्टी व पंजाब खेतीबाडी युनियन या सात पक्षांचे एकत्रीकरण घडवून आणले. नवीन पक्षाचे नाव ठेवण्यात आले 'भारतीय लोकदल!' पक्षाचे निवडणूक चिन्ह होते नांगरधारी शेतकरी!! याच चिन्हाचा स्वीकार करून आता जनता पक्षामध्ये सामील झालेल्या, परंतु तेव्हा घटक पक्ष असलेल्या विविध पक्षांनी नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुका लढवल्या. क्रांती घडवून आणणारा हा 'नांगरधारी शेतकरी' जनता पक्षानेही स्वीकारला आहे. भारतीय लोकदल, जनसंघ आणि संघटना कॉंग्रेस यांच्या एकत्रीकरणासाठी चौधरीजींची खटपट चालूच होती. आणीबाणीचे महाभारत घडले आणि त्यातून पुढे नवीन पक्ष आकाराला आला.

२५ जून १९७५ रोजी चौधरी चरणसिंह यांना अटक करण्यात आली. दिल्लीच्या तिहार जेलमध्ये त्यांची रवानगी झाली. पुढे मार्च ७६ मध्ये निवडणुका घोषित झाल्यानंतर त्यांची सुटका झाली. ज्या वेळी त्यांची सुटका झाली त्या वेळी ते उत्तर प्रदेश विधानसभेमध्ये विरोधी पक्षाचे नेते होते. २३ मार्च १९७६ रोजी त्यांनी उत्तर प्रदेश विधानसभेमध्ये घणाघाती भाषण केले. दोन अडीच तास गृहाला मंत्रमुग्ध करून टाकणाऱ्या या भाषणाचा विषय होता, आणीबाणीतील अत्याचार!! पुढे निवडणुका झाल्या आणि लखनौला प्रभावशाली असलेले चौधरी बागपत लोकसभा मतदार संघातून दिल्लीमध्ये येऊन पोहोचले. देशाचे गृहमंत्री म्हणून आज ते परिचित असून त्यांच्या कामाला शुभारंभ तर चांगला झाला आहे.

आपण 'जाटवादा'चा प्रसार करतो किंवा आपण जाटांचे नेते आहोत, असे विचार व्यक्त केले जातात तेव्हा, ते विलक्षण नाराज होतात, संतापतात. भारतीय लोकदलाची सूत्रे त्यांच्या हाती असताना हे आरोप त्यांच्यावर केले गेले तेव्हा, ते चिडून म्हणाले—मी निवडलेल्या उमेदवारांच्या जाती तर पाहा, त्यांमध्ये सगळे आहेत. ब्राह्मण, रजपूत, मुसलमान, बनिये, हरिजन आणि जाटसुद्धा!! सगळ्यांना बरोबर घेऊन मी काम करतो. बडौत या त्यांच्या मेरठ विधानसभा मतदारसंघामध्ये असलेल्या एका महाविद्यालयाचे नाव होते जाट महाविद्यालय. महाविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळाला जाट महाविद्यालय हे जातिवाचक नाव बदलावे, अशी सूचना चौधरींनी केली. अनेक मंडळींनी विरोध केला तेव्हा चौधरी म्हणाले, हे पाहा; मी याबाबतीत कसलीही तडजोड करू शकत नाही. माझी मते तुम्हाला मान्य नसतील तर, माझे आणि संस्थेचे संबंध संपले. व्यवस्थापन मंडळाने लगोलग ठराव पास केला आणि महाविद्यालयाचे 'जनता महाविद्यालय' असे नामाभिकरण झाले. स्वातंत्र्यसंग्रामामध्ये चौधरीजींनी १९३० साली व पुढे १९४० साली तुरुंगवास भोगलेला आहे.

चौधरीजींच्या तापट स्वभावाचे एक उदाहरण देता येण्यासारखे आहे. मंत्री म्हणून दौऱ्यावर असताना त्यांनी जिल्हा उद्योग प्रमुखाला विचारले, या जिल्ह्यामध्ये प्रमुख उद्योग कोणते? अधिकारी म्हणाला, तसा म्हणण्यासारखा उद्योग येथे कोणताच नाही. त्यावर संतप्त चौधरी म्हणाले, फिर आप किस कारण अपनी फौजके साथ यहाँ वर्षोंसे जमे हुए है!' आणि त्यानंतर तो संपूर्ण उद्योग विभाग जेथे त्याची गरज होती अशा विभागामध्ये हलवला गेला.

चौधरीजी हिंदीच्या बाबतीतही आग्रही आहेत. जोपर्यंत राष्ट्रभाषा हिंदी ही राजभाषा होत नाही तोपर्यंत आपल्या स्वातंत्र्याला पूर्णत्व येणार नाही, अशी त्यांची धारणा

आहे. १९४८ साली मेरठ येथे झालेल्या अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. हिंदी पत्रकारांच्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन विशेष सहानुभूतीचा आहे.

चरणसिंहांचे व्यक्तिगत आयुष्य स्वच्छ आणि सात्त्विक आहे. छंद म्हणाल तर, वाचनाचा आणि पोहण्याचा. बिडी–काडीचे-सुद्धा त्यांना व्यसन नाही. ते क्रियाशील आर्यसमाजी आहेत. आर्य समाजाच्या साप्ताहिक सत्संगामध्ये ते नेहमी भाग घेतात. आर्य समाजाचे प्रसिद्ध विद्वान पंडित रामचंद्र देहलवी यांच्याशी त्यांचा निकटचा संबंध आहे. ते स्वत: आर्यसमाजी असले तरी, त्यांचा दृष्टिकोन आग्रही नाही. स्वत:च्या घरामध्ये ते काहीशा कर्मठ वृत्तीने राहत असले तरी, एकदा घराबाहेर पडल्या-वर धार्मिक विचारांचे जू त्यांनी बाळगले नाही. त्यांच्या घाहत्यांमध्ये सर्व जातींच्या, धर्मांच्या लोकांचा समावेश होतो. अगदी मिया–मौलवींशीसुद्धा ते मनमोकळचा गोष्टी करू शकतात.

त्यांच्या पत्नी गायत्रीदेवी सुगृहीणी तर आहेतच, पण पतिलाही त्या भरपूर साहाय्य करतात. सभा संमेलनातून भाषणेही करतात. उत्तर प्रदेशच्या विधानसभेच्या त्या सदस्य आहेत. त्यांचे एकमेव पुत्र अमेरिकेमध्ये असतात, तर सुशिक्षित कन्या आपल्या पिताजींना साहाय्य करत असतात. राष्ट्रीय पातळीवर आल्याबरोबर आपल्या अस्तित्वाची चुणूक दाखवणाऱ्या चौधरी चरणसिंह यांचे श्रद्धास्थान आहे – कै. वल्लभभाई पटेल ! !

□

## गुप्तहेर खात्याचा कारभार

बातमी तशी चार ओळींचीच होती. पंत-प्रधानांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली अस-लेल्या संशोधन आणि विश्लेषण विभागाचे प्रमुख श्री. आर. एन्. काओ यांनी राजीनामा दिला असून तो स्वीकारण्यात आला आहे. नावावरून अत्यंत साधे वाटणारे हे खाते प्रामुख्याने गुप्तहेरीचे काम करते. विशेषत: परदेशामधील–आपली हेरगिरी, आणि आपल्या देशामध्ये घुसलेले परदेशी हेर याबाबत काम करण्यासाठी हा विभाग उघडण्यात आला. ज्याच्या खर्चाला संसदेची मान्यता लागत नाही असा अफाट पैसा यासाठी उपलब्ध करून देण्यात येतो. या विभागाची स्वत:च्या मालकीची विमाने आहेत. या वस्तुस्थितीवरून या विभागाचा पसारा केवढा प्रचंड असावा याची कल्पना यावी. वर ज्यांच्या राजीनाम्याचा उल्लेख केला आहे ते श्री. काओ हे या विभागाचे सर्वेसर्वा. त्यांचा दर्जा – एखाद्या खात्याच्या चिटणीसाच्या पातळीचा. यंत्रणेची संपूर्ण सूत्रे त्यांच्या हाती. या काओ महाराजांचे नावही कुणाला माहीत नाही. कारण हे कधीच सभारंभामध्ये भाग घेत नसत. अथवा लोकां-मध्ये मिसळत नसत, त्यामुळेच त्यांच्या निर्गमनाची बातमी चार ओळींच्या पुढे सरकू शकली नाही. आता या खात्याची संपूर्ण पुनर्रचना होत आहे. काओ महाराजांनी आणीबाणी पर्वामध्ये जी कामे केली, त्या बाबतही चौकशी होत आहे. त्याचा तपशील अर्थातच लोकांपर्यंत पोचणार नाही. कारण ही चौकशीही गुप्त स्वरूपाची आहे. आणि ते योग्यही आहे. असा विभाग असणे काहीही गैर नाही. अगदी लोकशाही देशातही अशी यंत्रणा असते आणि तिचे कार्यही सतत चालू असते. मग भारतीय गुप्तहेर यंत्रणे-बाबतच ओरड का झाली ? त्याचे कारण असे की, कोणतेही कारण नसताना श्री. काओ यांनी ही यंत्रणा देशांतर्गत बाबींसाठी राबवली. ते पंतप्रधानांचे विश्वासू साहाय्यक बनले आणि काओ आणि कंपनीची माणसे बाबुजींकडे कोण येऊन गेले ? सर-दार स्वर्णसिंगांच्या दारामध्ये कोणाच्या गाड्या लागल्या ? यशवंतरावांना कोणकोण भेटायला येते ?– या गोष्टींच्या नोंदी काओ आपल्या खात्यामार्फत ठेवू लागले. पंत-प्रधानांच्या आशीर्वादाने आणि सल्लाम-सलतीने ही यंत्रणा देशांतर्गत हेरगिरीचे कामही करू लागली. त्यासाठी अवाढव्य पैसा उपलब्ध करून देण्यात आला. असे सांगतात की, या यंत्रणेकडून जी माहिती मिळाली ती आधारभूत मानून बाईंनी निवड-णुका घोषित केल्या. प्रत्यक्ष निवडणुका घोषित करण्यापूर्वी त्यांनी स्वत: देशव्यापी दौरा काढला आणि स्वत:चीही निवडणूक जिंकू अशी खात्री पटल्यावर मग निवड-णुकांची घोषणा केली. दोघांचेही अंदाज चुकले हे खरे. पण निवडणुका झाल्या. वाता-वरण मोकळे झाले म्हणून हे खाते कशा-प्रकारे काम करत होते हे उघडकीला आले. आता या खात्याची पुनर्बांधणी चालू आहे. आणि परराष्ट्रमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या सल्ल्याने ही गुप्तहेर यंत्रणा ज्या हेतूने निर्माण करण्यात आली त्याच हेतूसाठी राब-वली जात आहे.

□

## पत्रांचा ढीग– न सुटणारे प्रश्न ! !

आपण जनता पक्षाला निवडून दिले तेव्हा शासनासमोर आपले प्रश्न मांडण्याचा आणि त्याचबरोबर शासनाला सल्ला देण्याचा आपला अधिकारच आहे असे सर्वसाधारण जनतेला वाटते. जुन्या पंतप्रधानांना रोज सरासरी पाच हजार पत्रे येत असल्याची माहिती अमृतबझार पत्रिकेने दिली असून विद्यमान पंतप्रधानांना रोज जवळजवळ आठ हजार पाचशे पत्रे येत असल्याचे नमूद केले आहे. या पत्रांचे होते काय ? पंतप्रधानांनी त्यांच्या कचेरीला याबाबत खास आदेश दिले असून सर्व पत्रांची किमान दखल तरी घ्यावी, आणि विशेष महत्त्वाची पत्रे मला दाख-वावीत असे आदेश दिले आहेत. चार चाळ-ण्यांतून जाऊनही रोज सुमारे चारशे पत्रे पंतप्रधानांना प्रत्यक्ष पाहवी लागतात. मंत्र्यां-पैकी जॉर्ज फर्नांडिस, राजनारायण, मोहन धारिया आणि अटलजी हे विशेष लोकप्रिय आहेत या सर्वांकडेही पत्रांचा प्रचंड ओघ वाहतो आहे. मंत्रिमंडळाबाहेर असलेल्या मान्यवरांपैकी मधु लिमये आणि नानाजी देशमुख यांच्यावर सल्ला देणाऱ्या पत्रांचा भडिमार होतो आहे. न सुटणाऱ्या प्रश्नां-बाबत सल्ले व्यक्तिगत अडचणी, नोकऱ्यांची मागणी यासारख्या गोष्टी असलेल्या पत्रांच्या ढिगाऱ्यात मंत्रिमंडळ अडकलेले आहे.

□

कुप्रसिद्ध " फ्रीडम अॅट मिडनाइट ' च्या लेखक–प्रकाशकांवर नागपूर न्यायालयात मानहानीसाठी हानी भरपाईचा अभियोग दाखल !

# राष्ट्रीय संरक्षण निधीला ५० हजार रुपये द्या !

## श्री. विश्वास सावरकर आणि श्री. विक्रम सावरकर यांच्या वतीनें अधिवक्ता मनोहर केळकर यांची मागणी

नागपूर, दिनांक २४ एप्रिल, १९७७

कुप्रसिद्ध 'फ्रीडम अॅट मिडनाइट' या पुस्तकाचे परदेशी लेखकद्वय लारी कॉलिन्स आणि दॉमिनी लापिरी, तसेच प्रकाशक श्री. नरेंद्रकुमार आणि श्रीमती शारदा चावला, त्यांची मेसर्स विकास पब्लिशिंग हाऊस प्रा. लि. ही दिल्लीची प्रकाशन संस्था यांचेवर स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांचे चिरंजीव श्री. विश्वास सावरकर आणि पुतणे श्री. विक्रम सावरकर, सरचिटणीस, अ. भा. हिंदुमहासभा यांनी सीनिअर डिव्हिजन नागपूर न्यायालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मानहानीची रु. ५०,०००/- भरपाई मागणारा अभियोग दि. २२ एप्रिल १९७७ ला दाखल केला. सावरकर बंधूंच्या वतीने सुप्रसिद्ध अधिवक्ता मनोहर केळकर काम चालवीत असून अधिवक्ता ए.ए.बडे व ए. एन्. नंदापूरकर त्यांना साहाय्य करीत आहेत.

### अभियोगाची पार्श्वभूमी

कुप्रसिद्ध 'फ्रीडम अॅट मिडनाईट' पुस्तकातील पृ. ३६१ ते ४९२ मध्ये कै. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंबंधी सर्वस्वी असत्य, मानहानिकारक आणि खोडसाळ मजकूर प्रकाशित झाला आहे. या मजकुरात योग्य ती सुधारणा करावी आणि प्रकट क्षमायाचना करावी अन्यथा न्यायालयीन कार्यवाही करण्याची चेतावणी (कायदेशीर नोटीस) अधिवक्ता म. पु. केळकर यांनी दि. २३ जुलै १९७६ ला पुस्तकाच्या लेखक आणि प्रकाशकांना दिली होती. ही चेतावणी पोचल्यानंतर लेखक–प्रकाशकांच्या वतीने मुंबईचे सॉलिसिटर्स मुल्ला अॅंड मुल्ला कंपनीनें उत्तरादाखल काही अवधी मागून घेतला होता.

परंतु बराच कालावधी झाल्यानंतरही लेखक-प्रकाशकांकडून अपेक्षित कार्यवाही न झाल्याने उपयुक्त दिवाणी अभियोग नागपूर न्यायालयात दाखल करण्यात आला.

☐ वाचकांच्या स्मरणात असेलच की, उपरोक्त कारणासाठीच मुंबई येथील न्यायालयात श्री. अशोक सावरकर आणि श्री. गोपाळ गोडसे यांनी पुस्तकाच्या लेखक-प्रकाशकांवर भरलेला फौजदारी अभियोग चालू आहे. सुप्रसिद्ध अभिवक्ता माधवराव पाठक त्याचे काम चालवीत आहेत.

☐ पुस्तकाच्या मराठी भाषांतर प्रकाशकांविरुद्ध प्रसिद्धीपूर्व बंदी घालण्याची मागणी करणारा अभियोग श्री. विक्रम सावरकर आणि गोपाळ गोडसे यांनी पुणे न्यायालयात भरला होता. न्यायालयाने मराठी भाषांतराच्या प्रकाशनास आणि वितरणास तात्पुरती मनाई केली होती. पुढे प्रकाशकांनी आक्षेपार्ह मजकूर भाषांतरातून गाळण्याचे न्यायालयात मान्य केले.

☐ 'इलस्ट्रेटेड वीकली'. या इंग्रजी साप्ताहिकात 'फ्रीडम अॅट मिडनाइट' या पुस्तकाची ओळख करून देणारा सचित्र लेख प्रकाशित झाला होता. या लेखातही कै. स्वातंत्र्यवीर सावरकर आणि नथूराम गोडसे यांचेविषयी असत्य, खोडसाळ मजकूर होता. म्हणून सोलापूर येथील डॉ. म. वि. फडके इत्यादी स्वातंत्र्यवीरांच्या अनुयायांनी 'वीकली' चे संपादक श्री. खुशवंतसिंग यांचेवर सोलापूर न्यायालयात अभियोग भरला. संपादक श्री. खुशवंतसिंगांनी दि. ६ ते १२ मार्च १९७७ च्या अंकात बदनामीकारक मजकूर प्रकाशनाबद्दल संपूर्ण क्षमायाचना प्रकाशित केली. इतकेच नव्हे तर, 'फ्रीडम अॅट मिडनाइट' पुस्तकातील संबंधित निवेदनाशी आपण सहमत नसल्याचे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांचेविषयी आपणास नितांत आदर असल्याचे श्री. खुशवंतसिंग यांनी उपरोक्त क्षमायाचनेत लिहिले आहे.

### अभियोगाचा तपशील

नागपूर न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यात पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांचे प्रतिपादन केले आहे फ्रीडम अॅट मिडनाईट पुस्तकातील पृष्ठे ३६१ ते ४९२ मध्ये लेखकांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चारित्र्यहनन करणारा असत्य आणि मानहानिकारक मजकूर प्रकाशित केला आहे. पुस्तक सनसनाटीपूर्ण व्हावे, या हेतूने काल्पनिक मजकूर कादंबरीच्या शैलीत लिहिला आहे. 'वास्तविक इतिहास' असे या पुस्तकाचे स्वरूप नाही. देशातील विविध प्रचार-प्रणालीच्या लक्षावधी लोकांना स्वातंत्र्यवीर सावरकरांच्याबद्दल नितांत आदर वाटत असल्याची स्पष्ट कल्पना लेखक आणि प्रकाशक यांना होती. पुस्तक सनसनाटीपूर्ण व्हावे, या हेतूनेच उपरोक्त बदनामीकारक मजकूर लिहिला असून लेखकांना त्या द्वारे आर्थिक लाभ व्हावा, हाच उद्देश आहे.

खळबळ माजविणारे अश्लील पिवळे साहित्य निर्माण करण्याची प्रवृत्ती जनहिताची ठरत नाही. म्हणून हा अभियोग केवळ व्यक्तिगत अन्याय निवारण दूर करण्याकरताच नसून व्यापक जनहिताच्या दृष्टीने भरण्यात आला आहे.

पुस्तक उठावदार करण्यासाठी त्यात लैंगिक, अश्लील मजकूर लिहिण्याच्या प्रवृत्तीने पाश्चात्य लेखक पछाडलेले दिसतात. अशाच प्रवृत्तीतून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चारित्र्यहनन करणारा वैषयिक मजकूर आकसपूर्वक आणि द्वेषमूलक वृत्तीने पुस्तकात लिहिण्यात आला आहे. सार्वजनिक हितासाठी अशा विकृत लिखाणाविरुद्ध कार्यवाही करणे उचित ठरते.

पुस्तकाचे एक लेखक श्री. दामिनी लापिरी फेब्रुवारी १९७६ मध्ये भारतात होते. त्यांना जेव्हा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ घातल्याची जाणीव झाली तेव्हा ते संभाव्य कार्यवाहीला विलंब व्हावा म्हणून घाईने भारत सोडून निघून गेले.

अभियोजकांनी, अभियोग पूर्ण होईपर्यंत सोसावा लागणारा कायदेशीर खर्च तेवढा स्वतःसाठी मागितला आहे. परंतु मुख्य हानीभरपाई म्हणून सुमारे पन्नास हजार रुपयांची रक्कम मात्र पुस्तकाच्या लेखक आणि प्रकाशकांनी राष्ट्रीय सुरक्षा निधीला द्यावी, अशी अभियोजकांनी वैशिष्टयपूर्ण मागणी केली आहे.

नागपूर न्यायालयात भरलेला हा अभियोग केवळ अखिल भारतीय महत्त्वाचाच नसून, भारताबाहेरील साहित्य जगतातही महत्त्वाचा ठरणार आहे. ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १४।५।७७ ते २०।५।७७

**मेष : धनलाभ आहे**

केतू बारावा आला आहे पण त्याची काळजी नको. दुसरा गुरू, दुसरा रवी व चवथा शनी असे. ग्रहमान आहे. शत्रूस्थानी राहूसारखा खलग्रह बसला आहे. आगामी-काळात महत्त्वाच्या घटना घडणार असून तुमच्याभोवती निर्माण झालेल्या त्रासदायक घटना इतिहासजमा होणार आहेत. आता तुम्हाला मनस्वास्थ्य नाही. काही होत नाही असे म्हणून चालणार नाही. तुम्हाला धनलाभ घडवणारा असा हा आठवडा आहे. व्यापार असो, धंदा असो किंवा नोकरी असो, तुमची पैशाची गरज यावेळी भागणार आहे. एखादी श्रीमंत व्यक्ती तुमच्या सहवासात येणार आहे व त्याची तुम्हाला खूपच मदत मिळणार आहे. तुमच्यापैकी कुणी बेकार असेल तर, त्याची बेकारी संपली म्हणून समजावे. शुभ दिनांक १४–१७.

**महिलांना :** नोकरीत स्थित्यंतर घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक क्षेत्रात बदल घडेल.

**वृषभ : महत्त्वाचा काळ**

पहिला रवी, पहिला गुरु व तिसरा शनी या ग्रहांमुळे तुमचे महत्त्व फारच वाढणार आहे. आजवर जे स्वप्न तुम्ही मनात रचत होता ते स्वप्न साकार होणार आहे. उद्योगात भरपूर मदत मिळणार आहे. नव्या योजना प्रत्यक्षात आणल्याला आवश्यक ते साहाय्य मिळणार आहे. तुम्ही जर प्रेस, प्रकाशन संस्था असे काही तरी नव्याने उभारणार असाल तर, त्याला भरपूर अनुकूलता आहे. नोकरीत त्रास नाही. वरिष्ठ लोक तुमच्या-बरोबर आस्थेने वागतील. तुमच्यापेक्षा जे कमी बेकार असतील त्यांना नोकरी मिळेल. व्यापाराची परिस्थिती उत्तम राहील. मंदीचा काळ संपला आहे. सोने-चांदीचा व्यवहार करणाऱ्यांना लाभ होणार आहे. तुम्ही कलावंत असाल तर, तुम्हाला खूपच अनुकूलता आहे. शुभ दिनांक १५–१६

**महिलांना :** संसारात खूपच आकर्षकता व सुख निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना :** संगीताचा अभ्यास करावा,

**मिथुन : प्रगतीला उपकारक**

कन्या राशीत राहू आल्यापासून तुम्ही उगाचच घाबरून गेला आहात. ग्रहस्थानी राहू असला तरी तो केवळ तुम्हाला शंकेखोर बनवणार आहे. प्रत्यक्षात तुमचे कोणतेच नुकसान करणार नाही. बारावा गुरुदेखील तसा वाईट फळे देणार नाही. आजच्या परिस्थितीत खर्च एरवीच फार वाढत आहे. त्यामुळे बाराव्या गुरुमुळे तुम्हाला त्रास होईल असे समजण्याचे कारण नाही. मागच्या आठवड्यापेक्षा हा आठवडा प्रगतीच्या दृष्टीने अधिक उपकारक आहे. तुम्ही धंद्यासाठी ज्या काही गाठीभेटी घेतल्या असतील त्या यावेळी फलदायी ठरतील. व्यापारात फार मोठी उलथापालथ झाली नाही तरी तोटा थांबणार आहे. पडून राहिलेला माल खपणार आहे. तो एखादे दुकान अगर धंदा एक करण्याच्या दृष्टीने प्रयत्नास वेग येईल. नोकरीत समाधान राहील. वरिष्ठांच्या मर्जीत राहाल. शुभ दिनांक १४–१७.

**महिलांना :** माहेरचा प्रवास घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** धंद्याच्या शिक्षणाला उपकारक आहे.

**कर्क : प्रवास होईल**

भाग्यात मंगळ, तिसरा, राहू, अकरावा रवी अशी फार छान ग्रहांची परिस्थिती आहे. अंतरिक्षातील ग्रह तुमच्यावर कृपा करणार आहेत. यावेळी तुम्हाला अनुकूल काळ आहे. नोकरी असो की धंदा असो प्रगतीचे पाऊल पडणार आहे. स्वतंत्र धंदा करावयाला हा फार छान काळ आहे. योजना प्रत्यक्षात आणू शकाल. मदत मिळेल. पैसा कमी पडणार नाही. चालू धंदा सुधारणा आहे. तुम्ही एखादे वाहन खरेदी करणार असाल तर, तुमची इच्छा पुरी होईल. राजकारणात पुढे पाऊल पडेल. प्रतिष्ठा मिळेल. लेखक म्हणून तुम्हाला लोकप्रियता मिळेल. पत्रकारांना नवी संधी मिळेल. नोकरीत धनलाभ होईल, चालू नोकरीत वरिष्ठांचा त्रास कमी होईल. बदलीचा बेत फसेल. त्रासदायक स्थिती सुधारेल. शुभ दिनांक १५–१७.

**महिलांना**–घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**विद्यार्थ्यांना**–शाळा अगर शिक्षणाचे माध्यम बदलता येईल.

**सिंह : प्रवास घडेल**

तुमची सारी सूत्रे सध्या गुरूच्या हाती आहेत. त्याची कृपा हेच तुमचे खरे भांडवल आहे. दुसरा राहू आला आहे. त्याची हवी तेवढी मदत मिळणार नाही तरीपण हा आठवडा प्रत्येकाला तापकारक ठरणार आहे. तुम्ही परदेशी जाण्याचे स्वप्न बाळगत असाल तर ते स्वप्न यावेळी साकार होणार आहे. सार्वजनिक कार्यात तुमची प्रशंसा होणार असून राजकारणात तुमच्या सल्ल्याची गरज भासणार आहे. कौटुंबिक संबंधात काहीतरी अनपेक्षित घटना घडू शकतील. धंद्याची बाजू अनिश्चित व अस्थिरता यांतून बाहेर पडणार आहे व घडी बसणार आहे. नोकरीत फारसा बदल संभवत नाही. जुने हितसंबंध पुन्हा प्रस्थापित होऊ शकतील. कामाचा ताण मात्र फार वाढणार आहे. स्थावराची कामे आताच उरकून घ्या. कोर्टकचेऱ्या फारशा करू नये. शुभ दिनांक १६–१७.

**महिलांना**–नोकरीत हितकारक घटना घडेल.

**विद्यार्थ्यांना**–शिक्षणाचे स्थान बदलण्यांची शक्यता आहे.

**कन्या : नोकरीत चांगले**

राशीत चंद्राबरोबर राहू आला आहे व त्याचा भाग्यातील गुरूबरोबर योग येत आहे ही गोष्ट तुम्हाला उपकारक ठरणार आहे. नोकरीच्या दृष्टीने महत्त्व वाढेल. वरिष्ठांच्या मर्जीचा अनुभव येईल. दुय्यम धंदा सुधारू शकाल. सार्वजनिक कार्यात पुढाकार मिळणार आहे. स्वतंत्र धंदा करायला परिस्थिती तशी अनुकूल आहे. परंतु त्यांत मन लागणार नाही. प्रवासाचा बेत आयत्यावेळी तहकूब करावा लागेल. मित्र व कुटुंबातील इतर मंडळी यांच्याबरोबरचे संबंध ताणू नका. आर्थिक बाजू भक्कम नसली तरी, गरज भागेल. पत्रव्यवहार करताना काळजी घ्या. बेकारांना हितकारक असे काही तरी घडेल. शुभ दिनांक–१४–१६.

**महिलांना**–तब्येतीची काळजी नको.

**विद्यार्थ्यांना**–परिक्षेतील यश आनंद मिळवून देईल.

**तूळ : अनपेक्षित खर्च**

सध्या तुम्हाला शनीचेच मोठे पाठबळ आहे. त्याची मदत आहे म्हणून अनेक क्षेत्रात तुमचे पाऊल प्रगतीकडे पडेल. नवा धंदा अगर व्यापार सुरू करायला हरकत नाही. कर्जाची मदत मिळू शकेल. शेतीकडे पाऊल टाकायला हरकत नाही. नव्याने शेतीची सुरुवात करावयाची असेल तर हरकत नाही. रेस व लॉटी यापासून फायदा मिळू शकेल. तुमच्या कुंडळीत मूळचे ग्रह जर बलवान असतील तर तुम्ही श्रीमंत होणार आहात. प्रवास घडणार आहे. देशातील अगर परदेशातील प्रवास घडण्याची शक्यता आहे. मात्र तुम्ही पैसा जरी मिळवला तरी तो हाती टिकेल कितपत हे सांगणे कठीण आहे. अनपेक्षित खर्चाचे एखादे प्रकरण निर्माण होईल. नोकरीत चुका होऊ देऊ नका, वरिष्ठांची मर्जी चंचल होण्याची शक्यता वाटते. शुभ दिनांक १७–१८.

**महिलांना** : प्रामुख्याने तब्येतीकडे लक्ष द्यावे.

**विद्यार्थ्यांना** : सध्या कोणत्याही गोष्टीला अनुकूलता नाही.

**वृश्चिक : त्रास संपला**

सातवा गुरू ही एक अतिशय तेजस्वी-बाजू आहे. त्याखेरीज अकरावा राहू हीदेखील शुभघटना आहे. तुमचा त्रास संपलेला आहे याचा अनुभव येणार आहे. मनाची नाराजी कमी होईल. नैराश्य दूर होऊन उत्साह येऊ लागेल. प्रत्येक कामात यापूर्वी अडचणी वा अडथळे येत होते तसे आता होणार नाही. प्रत्येक बाबतीत पाऊल पुढे पडणार आहे. धंद्यात, नोकरीत सारे ठाकठीक घडणार आहे. नोकरीत कष्टाचे चीज होईल. कामाचे श्रेय तुमच्या पदरात पडेल. बेकारांना आता निराश होण्याचे कारण उरणार नाही. सावकराचे व शेतीचे काम होणार आहे. धंद्यासाठी पैशाची मदत मिळणार आहे. उच्च लोकांच्या गाठीभेटी सफल होतील. ज्यांची लग्ने झालेली नसतील त्यांची लग्ने होतील. शुभ दिनांक १८–१९

**महिलांना** : कौटुंबिक इच्छा पुऱ्या होतील.

**विद्यार्थ्यांना** : व्यक्तिमत्त्व उंचावेल.

**धनु : व्यक्तिमत्त्व उंचावेल**

राहू हा कन्या राशीत स्वगृही आला आहे ही एक अभूतपूर्व अशी घटना आहे. या राहूमुळे तुमच्या धंद्यात व व्यावसायिक जीवनात अनपेक्षित घटना घडण्याची शक्यता नाकारू नका. एखादा धंदा सुरू करण्याचे प्रयत्न यापूर्वी जर विफल झाले असतील तर, यावेळी त्याला यशाची खात्री बाळगता येईल. नोकरीत काही तरी प्रतिष्ठा करवणारे घडेल. कदाचित थोडाफार कामाचा बदल होऊ शकेल व तो बदल इष्ट ठरेल. गुरू म्हणावा तसा ठीक नाही. त्यामुळे उपासनेत मानसिक अडथळे येऊ शकतील. तरीपण कोणतेही चालू कार्य लांबणार नाही. बेकारांना आता फार दिवस रिकामे फिरावे लागणार नाही. रेस अगर लॉटरी पैसे मिळवून देईल. शुभ दिनांक १५–१९

**महिलांना** : नोकरीत अनपेक्षित अनुकूल बदल घडेल.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासात मन रमणार आहे.

**मकर : यशाकडे वाटचाल**

भाग्यस्थानी राहू ही चांगली घटना म्हणावी लागेल. पण गुरू पाचवा हादेखील एक उत्तम योग आहे. असे असले तरी, तुम्हाला जे काही मिळवायचे ते प्रामाणिक राहून व मन स्वच्छ ठेवून मिळवणे आवश्यक आहे. गुरूची तुम्हाला आज्ञा आहे की, डावपेच खेळू नका. मनात एक व बाहेर एक असे वर्तन ठेवू नका. त्यामुळे होणारा लाभ हुकण्याची शक्यता आहे. नोकरीत अजून तुम्हाला सावध राहावे लागेल. तुम्ही कोणत्याही स्थानावर असा, वरिष्ठांची तुमच्यावर मर्जी आहे अगर ते तुमच्या तंत्राने वागत आहेत, ही समजूत चुकीची ठरणार आहे. चालू नोकरीत कामदेखील बदलण्याची शक्यता आहे. आर्थिक परिस्थिती थोडीफार समाधान देईल. मात्र हिशोबाचे व्यवहार अत्यंत काळजीपूर्वक हाताळा. आडमार्गाने पैसा मिळवण्याचा मोह टाळा. शुभ दिनांक १६–१८.

**महिलांना** : तब्येतीची कुरकूर राहणार नाही.

**विद्यार्थ्यांना** : केलेल्या परिश्रमाचे चीज होईल.

**कुंभ : अनपेक्षित लाभ**

आठवा राहू व दुसरा केतू ही तशी अगदी अनुकूल परिस्थिती नव्हे. तरी पण तुम्ही जर पैशाच्या अडचणीत असाल तर, ती अडचण दूर होणार आहे. तुम्ही रेस अगर लॉटरीत भाग घेऊन स्वतःच्या नशिबाची परीक्षा पाहायला हरकत नाही. जन्मतः ग्रह जर उच्चीचे असतील तर, यावेळी तुम्ही भरीव मदत मिळवणार आहात. नोकरी कायम झाली नसेल तर, ती कायम होईल. सेवानिवृत्तीचे वय झाले असले तरी, मुदत मिळेल. बेकारांना फिरतीची नोकरी मिळू शकेल, एजन्सी, विक्रेता वगैरे उद्योग उपकारक ठरेल. तुम्ही व्यापारी असाल तर, व्यापारातील अडचणी दूर होऊन नव्या योजना अंमलात आणू शकाल. शेअर्समध्ये भांडवल गुंतवा. सिमेंट, लोखंड व तेल यांसारखे उद्योग करून आर्थिक बाजू सावरू शकाल. राजकारणात बदल करणे फायदेशीर ठरेल. प्रामुख्याने सहकारी संबंधांत असे राजकारण पथ्यावर पडेल. शुभ दिनांक १४–१७.

**महिलांना** : माहेरचा प्रवास घडेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : मन चंचल राहील पण यश मिळेल.

**मीन : प्रभाव पडेल**

पहिला केतू व दुसरा गुरू ही ग्रहरचना तशी वाईट नाही. तुम्ही उपेक्षित राहत होता ती उपेक्षा आता संपणार आहे. आजवर सार्वजनिक कार्य असो की राजकारण असो, तुमच्यावर दुर्लक्ष होत होते ते आता होणार नाही. तुमच्या सल्ल्याचीच गरज भासेल. राजकारणात पाऊल पुढे पडेल. अपुरे लेखन यावेळी मार्गी लागेल. प्रकाशन व्यवसाय सुधारेल. तुम्ही स्वतःची प्रकाशन संस्था काढणार असाल तर, त्याला अनुकूलता आहे. पडून राहिलेली पुस्तके चांगल्या प्रकारे विकली जातील. तुम्ही नवीन लेखनाला सुरुवात करीत असाल तर यश मिळेल. सरकारदरबारी वजन वाढेल. उपासना अपेक्षेप्रमाणे पुरी होईल. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरत नव्हते अगर लांबणीवर पडत होते त्यांचे विवाह ठरतील. संसारात नवचैतन्य निर्माण होईल. निरुत्साह कमी होऊन काहीतरी हातून घडावे, असे वाटत राहील. प्रवासाची इच्छा पुरी होईल. अनेकांचे आशीर्वाद मिळवू शकाल. शुभ दिनांक १७–१८.

**महिलांना** : व्रतवैकल्ये व्यवस्थित पार पडतील. नोकरीत समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : मनात काळजी राहणार नाही. यश मिळेल. □